साप्ताहिक

# माणूस

५ जानेवारी ८५ / २ रूपये



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे

अंक : बत्तिसावा

५ जानेवारी १९८५

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०.

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

# लाट

## वाहून जाणार की तोंड देणार ?

लाटेनं पुन्हा एकदा सत्ताधारी कॉंग्रेसपक्षां-बद्दलचा विरोध पूर्ण धुवून काढला आणि शिल्लक राहिल्या वेगानं कोसळणाऱ्या अनुकूल लोकमताच्या प्रचंड लाटा. या लाटेला जात, धर्म काही व्यक्तींबद्दलचे पूर्वग्रह ,काही काही थोपवू शकलं नाही. उत्स्फूर्त जनमताच्या लाटा उसळतच राहिल्या. इंदिरा गांधींचा मृत्यू ते आठव्या लोकसभा निवडणुकीची घोषणा या काळातल्या घटना काय घडणार हे सूचित करत होत्या. दूरदर्शन माध्यमानं फार प्रभावीपणे पसरवलेली इंदिरा-सहानुभूती लाट, राजीव गांधींच्या भोवती असलेलं नेहरू–गांधी घराण्याचं वलय, राजकारणाच्या खेळात नव्यानं उतरलेली बिनचौकटीतली ताज्या दमाची नवी तुकडी आणि ऐंशीच्या निवडणुकीपासून सर्वसामान्य लोकांच्या मनात कायम राहिलेली विरोधी पक्षाबद्दलची कडवट चव. यातून काय होणार होतं ?

कॉंग्रेसला बहुमत ?

निर्विवाद बहुमत ?

की

विरोधी पक्षांना उन्मळून टाकणारं झंझावाती बहुमत ?

इच्छा तरी अशी होती की, सरकार बनवण्याइतकं बहुमत कॉंग्रेस पक्षाला मिळावं; पण विरोधी पक्षांना पालापाचोळ्यासारखं दूर सारणारं झंझावाती बहुमत मिळू नये. असं का वाटलं ? एका बाजूला स्थिर सरकारची गरज आणि दुसरीकडे भारताच्या लोकशाहीला घराणेशाही – हुकुमशाहीचा काळीमा लागू नये आणि लोकसत्तेचा अंकुश राजसत्तेवर रहावा ही अपेक्षा पण 'स्थिर सरकार' या गोंधळात टाकणाऱ्या कल्पनेच्याच बाजूनं लोकांनी मतदान केलं आणि पुन्हा एकदा लाट उसळली.

ही लाट फक्त भावनिकच होती का ? तशी नसावी. ज्या शांतपणे फक्त मतपेटीतूनच, कोणतीही अगाऊ कल्पना न देता लोकांनी आपलं मत निश्चित केलं त्यात भावनेमागे विचारही असावा. म्हणूनच गेल्या दोन लाटांपेक्षा ही लाट जास्त विचार करण्याजोगी आहे.

लाटेनं दाखवून दिलं की, आम्हाला जुनी नैतिक राजकीय मूल्यं, आदर्शवाद, समाजसेवेची-त्यागाची बिरुदं मिरवणारं कोणी नको. सत्ता शर्यतीच्या रिंगणात उतरल्यानंतर त्यांची ससेहोलपट होते आणि शिल्लक रहातो फक्त 'पॉवरगेम' हे त्यांना आता कळून चुकलंय. म्हणून कोल्ह्याचं कातडं पांघरलेला लांडगा त्यांना नकोय, त्यापेक्षा प्रत्यक्ष लांडग्याशी सामना करणं त्यांना जास्त सोपं वाटतंय. लांडग्यांना खाली उतरवण्यासाठी मतपेटीचा निर्णायक उपयोग होऊ शकतो हे त्यांनी ७७ साली अनुभवलंय. वेळ आलीच तर पुढेही लोक त्यांची शक्ती दाखवून देतील. आज तरी त्यांना नव्या तरुण रक्ताकडे सरकार सोपवायचंय.

२८ तारखेला निकाल जाहीर व्हायला लागले. लोक टिव्हीसमोर कानाला रेडिओ लावून बसले, फटाक्यांचे आवाज सुरू झाले. जसजशी संध्याकाळ व्हायला लागली तसतसा 'इलेक्शन फीव्हर' चांगलाच चढला. जल्लोश सुरू झाला. रात्र झाली तशा लोकांच्या झुंडी वाढू लागल्या. टेलिफोन भवनवर माणसांची प्रचंड गर्दी उत्साहानं ओथंबली होती. आनंदाच्या घोषणा, विजयाच्या टाळ्या–शिट्या आणि उंचावलेले कॉंग्रेसचे ध्वज मस्तीत फडकत होते. रस्त्यांवर अमिताभाच्या मोठमोठ्या छायाचित्रांभोवती विजेच्या माळा चमकत होत्या आणि त्याच्यासमोर गल्लीबोळातली उत्साही टारगट मुलं हवी तशी नाचत होती. साडेअकरा–बारा वाजले तरी बायकांच्या एकत्र झुंडी रस्त्यावर मोकळेपणानं फिरत होत्या. कॉंग्रेसला निर्विवाद बहुमत मिळवून देणारी लाट ही होती. या लाटेला अभ्यास शिबिरं नकोत, तात्त्विक चर्चा नकोत, मूल्यांबद्दलची पोकळ बडबड तर त्यांना अजिबात नको. त्यांच्या संथ आयुष्यात त्यांना काही तरी 'सेन्सेशनल' हवं आहे, म्हणून त्यांनी कॉंग्रेसला उचलून धरलं आहे.

या गर्दीमध्ये थोडे हताश सुस्कारे, थोडा

चिडचिडाट, 'कशाला निवडणुकी घ्यायच्या, लोकांना एक राजा हवा आहे,' अशी थोडी कडवट धारही होती. नाही असं नाही; पण अशा विचारसरणीचा गट तरी तुलनेने किती असेल? बहुधा दुर्लक्षिण्या इतकाच. नाही तर पाच-पाच वर्षांनी अशा लाटा कशा उसळल्या असत्या?

कधी आणीबाणीतला अत्याचार, अराजक दडपशाहीबद्दलची तीव्र निषेधाची लाट कधी विरोधी पक्षांना धडा शिकवण्याची नेस्तनाबूत करण्याची हट्टी लाट.

तर कधी हे सगळंच झुगारून देणारी ८४ ची बेफिकीर लाट.

तेव्हा लाटा या येणारच आहेत. त्या लोकशाही मार्गानं येत आहेत तोवर त्याबद्दलच्या पसंती नापसंतीचा प्रश्नच येत नाही. फक्त 'भावनिक' म्हणून सोडून न देता या लाटांचे बदलते रंग आता जरा विरोधी पक्षांनीही ओळखायला पाहिजेत.

आताच्या निकालानंतर विरोधी पक्षांचे मोठमोठे मोहरे गळून पडल्यानंतर विरोधी पक्षकार्यकर्त्यांचं मनोधैर्य खचण्याची खूपच शक्यता आहे आणि या खच्चीकरणाचे धोके लोकशाहीला तुम्हाला-आम्हाला आता स्पष्टपणे दिसायलाच हवेत विरोधी पक्षांचं खच्चीकरण म्हणजे एकाच गटाची निरंकुश अनिबंध सत्ता आणि सर्वसामान्यांचा केरकचरा हे संयमानं ओळखण्याची ही वेळ आहे. लोकशाही हवी की नको हे ठरवण्याची ही वेळ आहे. लोकशाही नको असेल तर प्रश्नच नाही; पण जर हवी असेल तर जिवंत, सळसळत्या स्वतंत्र लोकशाहीसाठी सत्ताधारी पक्षासमोर ताठ उभा राहू शकेल असा समर्थ रसरशीत विरोधी पक्षही असावा लागतो. तसा तो निर्माण होण्यासाठी विरोधी पक्षांमध्ये नव्या युगाशी जवळीक निर्माण करतील अशा ताज्या दमाच्या तडफदार तरुण नेत्यांची जितकी आवश्यकता आहे, तितकीच विचारपूर्वक मतदान करणाऱ्या नव्या स्वतंत्र मतदाराचीही गरज आहे. यालाटेनं उद्याच्या राजकारणाचं बरचसं स्पष्ट चित्र उभं केलं आहे.

निवडणुका आल्या, निकालही कोसळले, आता प्रश्न आहे तुम्ही-आम्ही आणि विरोधी पक्ष या लाटेत वाहून जाणार की, समोरासमोर खंबीरपणे तोंड देणार? कॉंग्रेसमधल्या नव्या तरुण वर्गाशी सामना देतील असे नवतरुण विरोधी पक्षात आले तरच पुढचा सामना तुल्यबळ होईल आणि मरगळ संपेल!

—मेधा राजहंस

# अनुरूप ध्येयं-धोरणंच हवीत

—वि. शं. पारगावकर

आज सकाळपर्यंतच्या (दि. २९-१२-८४) निवडणूक निकालाच्या बातम्यांवरूनच चित्र स्पष्ट झालेले आहे. कॉंग्रेस (आय)ला मिळालेले प्रचंड बहुमत हे कोणीही नाकारू शकत नाही या यशाविषयी निरनिराळ्या कारणमीमांसा देण्यात येत असल्या तरी त्यामध्ये फारसा अर्थ नाही हे समंजसपणे मान्य करावयास पाहिजे. याचा अर्थ एवढाच समजावयास पाहिजे की, भारतातील जनतेला कॉंग्रेसची दिशा आणि ध्येय धोरणे मान्य आहेत, विरोधी पक्षांनी या गोष्टीचा अत्यंत गंभीरपणे विचार करण्याची वेळ आलेली आहे.

विरोधी पक्षाला सतत येत असलेल्या अपयशाची छाननी करून, त्यामधूनच त्यांनी मार्ग काढला पाहिजे. कॉंग्रेसच्या आजच्या प्रचंड यशाच्या बाबतीत असे म्हटले जाते की इंदिरा गांधींच्या हत्येचा हा भावनात्मक परिणाम आहे; परंतु आता अशा रीतीने स्वतःची आणि जनतेचीही दिशाभूल करून काहीही साध्य होण्यासारखे नाही. यामुळे मतदारांवर भावनात्मकतेचा बिनबुडाचा आरोप केला जातो व त्यांच्यावर तो एकप्रकारचा अन्यायच आहे हेही या प्रसंगी लक्षात घ्यावयास हवे.

या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचा पूर्णपणे नायनाट झाला याचे मूळ काही इंदिरा गांधींच्या हत्येमधून उगवलेले नाही. तसेच जनता पक्षाने, त्याच्या नेत्याने भारतयात्रा केली आणि जनतेचे दर्शन घेतले, तरीही जनतेची नाडी, तिच्या आशा आकांक्षा स्वतःच्या भवितव्यतेविषयी तिच्या मनात असलेली स्वप्ने, तसेच या देशाच्या अखंडतेविषयीची कळकळ या साऱ्या गोष्टींचे दर्शन चंद्रशेखर यांना झाले नाही याचे वाईट वाटते. विरोधी पक्षात असलेले; परंतु जनतेला त्यांच्या कार्याची, प्रामाणिकपणाची आणि निष्ठेची चांगली ओळख आहे असे शरद पवार, मधु दंडवते आणि दि. बा. पाटील यांना जनतेने निवडून दिले आहेच.

आज आपल्या देशात विरोधी पक्ष फार आणि त्याचे अनुयायी थोडे आणि त्याहीपेक्षा त्यांचे जनतेतील काम अगदीच थोडे अशी परिस्थिती आहे. विरोधी पक्षाचे पाठीराखे पत्रकार देखील त्यांच्यामधील त्रुटींचा सतत उल्लेख करीत आलेले आहेत, हे तरी कशाचे द्योतक आहे? मोरारजीभाई सारखा वयोवृद्ध नेता दर वर्षी, 'इंदिरा गांधींचे सरकार सहा महिन्यात कोसळेल' असे म्हणत आलेला आहे. हे त्यांचे भाकित त्यांच्या राजकीय ज्ञानाचे दिवाळे निघालेले आहे हेच सिद्ध करीत नाही काय? गेल्या पंधरा-वीस दिवसांपासून त्यांनी तर सारखा घोशा लावलेला होता की, केंद्रात संमिश्र सरकार येणार. आता त्यांच्या या विधानाचे काय करावयाचे?

ज्या लोकशाही देशात विरोधी पक्ष तुल्यबळ नाही त्या देशाचे भवितव्य नेहमीच धोक्यात असते; परंतु एवढी साधी गोष्ट देखील आज छत्तीस वर्षे विरोधी पक्षांना उमगलेली नाही. अनेक विरोधी पक्षांचा मिळून जेव्हा एक पक्ष होतो तेव्हा काय होते याची चुणूक विरोधी पक्षांना १९७७ साली लागलेली आहे आणि विरोधी पक्ष जेव्हा सत्तेसाठी आपसातच लठ्ठालठ्ठी करू लागतो तेव्हा त्याचा परिणाम काय होतो हे ही अनुभवानेच विरोधी पक्षांना कळलेले आहे! या देशात असे कोणते धोरणविषयक तीव्र मतभेद आहेत की ज्यांचा परिणाम म्हणून प्रत्येक धोरणासाठी एक एक विरोधी पक्ष जन्माला यावा? मला तर हे सारे थोतांड वाटते. केवळ महासत्तेची आकांक्षा आणि वैयक्तिक दर्प यांचा शाप आजवर विरोधी पक्ष भोगीत आले आहेत.

कॉंग्रेस पक्षात मतभेद आणि भांडणे काही थोडी नाहीत परंतु महासत्तेच्या केंद्रस्थानावरून त्यांच्यात कधीही भांडणे झालेली नाहीत. अगदी नेहरूंच्या काळापासूनचा हा इतिहास ताजा आहे; परंतु विरोधी पक्षात

जगजीवनराम, चरणसिंग, चंद्रशेखर, मोरारजी देसाई यांच्या वृत्ती आणि हात या बाबतीत स्वच्छ नाहीत.

आज पुन्हा या निवडणुकांच्या संदर्भात मला सहा आंधळे आणि एक हत्ती यांची गोष्ट आठवते. प्रत्येक राजकीय आंधळा पक्ष हत्तीच्या एकएका अवयवालाच संपूर्ण हत्ती समजत आहे. हत्ती म्हणजे भारत अशी कल्पना आणि काँग्रेस पक्ष मात्र त्या हत्तीवर सवार होऊन आपल्या हातातील अंकुशाने त्याला दिशा देत आहे.

आता तरी हे विरोधी पक्ष केव्हा डोळस होतील हे पाहाणेच आणि भारतीय नागरिक म्हणून त्याने लवकर डोळस व्हावे अशी आशा मनात बाळगणे आपल्या हातात आहे.

महात्मा गांधी म्हणत असत की खरा भारत खेड्यात आहे; परंतु विरोधी पक्षांपैकी किती पक्षांचे कार्य खेड्यात आहे ? कोणता एक अखिल भारतीय (!) विरोधी पक्ष सर्व देशभर आपले उमेदवार उभे करू शकतो ? म्हणजे त्याचे कार्य किती सर्वव्यापी आहे ? या शिवाय आधुनिक ध्येयधोरणे यांचा प्रश्न येतोच. आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जगाची जी परिस्थिती आहे तिला अनुरुप आपली ध्येयधोरणे आधुनिक असलीच पाहिजेत. नाहीतर धर्माच्या नावावर चालणारी इराण, इराक, अरब, अमिराती, पाकिस्तान अशासारखी राष्ट्रे आजही जगाच्या पाठीवर आहेतच. या गोष्टींचा खोलवर विचार करून देशाच्या जडणघडणीला अनुरुप अशी ध्येय धोरणे आणि जनताव्यापी धर्मनिरपेक्ष कार्य हाती घेऊन पुनःश्च हरि ॐ करण्यासाठी विरोधी पक्षाने सिद्ध झाले पाहिजे असे वाटते. □

---

# आम्ही बसलो नाही, आम्हाला घुसवलं

—मंगला गोडबोले

---

राजकारण हा माझा विषय नाही. गेल्या दोन निवडणुकांमध्ये काही ना काही अडचणीमुळे मला मतदानही करता आलं नव्हतं. पण यंदाची निवडणूक आणि संबंधित वातावरण ( किंवा त्याचा अभाव ) कुणाही शहाण्यासुरत्या माणसाला विचार करायला लावणारं होतं. कुठल्याही बदलाला माणूस निसर्गतःच कचरतो आणि तो बदल जर असा लादलेला असेल तर एकतर अगदी लीनपणे त्याच्या आधीन व्हावं लागतं नाही तर बलदंडपणे त्याच्यासमोर उभं ठाकावं लागतं. या खेपेला बलदंडपणे उभं राहण्याचं साहस एकट्या राजीव गांधींनी दाखवलं आणि आपण सगळे लीनपणे त्यांच्या आधीन झालो असंच काहीसं दृश्य दिसतंय.

राजीव गांधींनी निवडणुका लांबवल्या असत्या तर 'लोकशाहीची अनास्था' म्हणून लोक ओरडले असते. त्यांनी आत्ताच निवडणुका घेतल्या तर 'भावनिक पिळवणूक' 'emotional blackmailing' म्हणून लोक तक्रार करतात. आता इतक्या प्रचंड मतांनी निवडून आल्यावर, 'हे इलेक्शन नव्हतेच, नुसता रेफरेण्डम होता' असा शेरा TV वरच्या एका तज्ज्ञानी दिला. या सर्वांवरून राजीव गांधींना कशी तारेवरची कसरत करावी लागली असेल एवढंच दिसतं. काँग्रेस आय जिंकेल असं पहिल्यापासूनच वाटलं होतं. पण एवढ्या प्रचंड बहुमतानं जिंकून येईल असा अंदाज नक्कीच नव्हता. 'इंडिया टुडे'ने मार्गच्या मदतीने घेतलेला जनमताचा कानोसा काँग्रेस आयची अभूतपूर्व आघाडी दाखवत होता तर बरोबर निकालाच्या दिवशीच्याच 'टाइम्स ऑफ इंडियाने हा कानोसा चुकीच्या गृहीतांवर आधारलेला आहे असं म्हटलं होतं. व्यक्तिशः मला सुनील दत्त किंवा वैजयंतीमाला बाली निवडून येतील असं कधीही वाटलं नव्हतं ! आता निकाल बघता वाटतंय की या खेपेला काँग्रेस आयच्या तिकिटावर कुत्रीमांजरं उभी केली असती तरी निवडून आली असती.' 'जेठमलानींनी कॅन्सरवॉर्डमध्ये कधी पाय ठेवलाय का ?' असा प्रश्न म्हणे सुनीलदत्त प्रचारसभेत विचारत, हा का प्रश्न झाला ? स्वतः सुनीलदत्तनी कशाकशात, कधी कधी पाय ठेवलेत हा संशोधनाचा विषय व्हावा. 'मी अलाहाबादची सून आहे. मला मुंहदेखी ( सुनेला पहिल्यांदा बघितल्यावर देण्याची भेट ) द्या.' असं जया भादुरीही म्हणत असे. या खेपेचा निवडणूक प्रचार मला सर्वात रंजक वाटला. दूरदर्शनवरच्या निवडणूक प्रचारासाठी—पक्षनिहाय प्रसारणासाठी एक धड वक्ता आपल्या विरोधी पक्षांना उभा करता आला नाही. कोण कुजबुजतोय, कोण पुटपुटतोय, कोण अडखळत वाचतोय, कोण वाघ मागे लागल्यासारखा शब्दांची स्टेशनं ओलांडतोय. ह्यांच्याकडून आपण अपेक्षा तरी काय करायची ? अर्थात आज निवडून आलेल्या अनेकांकडे 'हे आमचे नेते' म्हणून बोट दाखवायला लाज वाटते. माणसांना आपल्या लायकीचं सरकार मिळतं म्हणतात. आम्ही निवडलेली माणसं अशी आहेत मग आम्ही काय असू ?

पुन्हा वाटतं, आम्ही माणसं निवडलीच नाहीत. पुण्यापुरतं बोलायचं तर गाडगीळ काय, धारिया काय आणि जोशी काय, ह्यांच्यातल्या कोणीच आमच्यासाठी काही केलं नाही. या एका बाबतीत त्यांच्यात विलक्षण साम्य ! कराडसारख्या अर्धनागरी ठिकाणी गेल्या १५ वर्षात प्रेमलाबाई चव्हाण यांच्याखेरीज उभं राहायला जवळजवळ कुणी नाहीच. युनुस कच्छी हा काय त्यांचा प्रतिस्पर्धी म्हणायचा ? उलट काँग्रेस आयने आपला डाव फारच चलाखीने खेळला हे माधवराव सिंदियांसारख्या एखाद्या खेळीवरून स्पष्ट व्हावी. इतके दिवस भ्रष्टाचाराबद्दल टोकलं की इंदिराबाई म्हणायच्या, 'जगात सगळीकडेच तो असतो. मी काय करू ?' तर राजीव गांधी पहिल्या दिवसापासून म्हणताहेत, 'अक्षमता, आळस भ्रष्टाचार आम्ही खपवून घेणार नाही.' ही होकारात्मक भूमिका लोकांना नक्कीच आवडली असणार. स्वप्नाळूपणा, भाबडा ध्येयवाद, स्वप्नरंजन, खोटे आदर्श आणि भ्रम यांचा जमाना संपल्याचं सर्वत्रच जाणवतंय. साधं आपल्या साहित्यात बघा. स्वप्नरंजनात्मक कथा—कादंबऱ्यांपेक्षा थेट जीवनाशी भिडणारं आत्मपर लेखन लोकांना दिवसेंदिवस आवडतंय. इतर अनेक कलाप्रकार जीवनवादाकडे वळताहेत. याच पार्श्वभूमीवर 'आम्ही राजकारणात नवे आहोत. आम्हाला काही कळत नाही. पण आम्ही समजून घेण्याचा प्रयत्न करू.' असा राजीव प्रभृतींचा पवित्रा लोकांना आवडला असावा. तरुणांना ते तरुण म्हणून आवडले. स्त्रियांना आईविना पोरकं मूल म्हणून आवडले, पारंपरिकांना काँग्रेस परंपरेचे पाईक म्हणून आवडले, उद्योजकांना तंत्रयुगाचे प्रणेते म्हणून आवडले, स्थैर्य हवं त्यांना

( पृष्ठ ५ वर )

# स्वातंत्र्याचा आभास

धर्माची बंधने तुटली. त्या जागी अन्य श्रद्धा आली नाही. शास्त्रही कळत नाही अशी अवस्था आली. बोलण्याचे स्वातंत्र्य आले म्हणजे काय तर बडबडण्याचे स्वातंत्र्य आले. विचारशक्ती गमावल्यामुळे पुस्तकातले बोलायचे अशी वेळ आली. पूर्वीच्या जबरदस्ती करणाऱ्या बाहेर दिसणाऱ्या शक्ती गेल्या; पण त्यांची जागा प्रच्छन्नपणे जुलुम करणाऱ्या शक्तींनी कधी घेतली ते माणसाला कळलेच नाही.

ज. शा. देशपांडे

राजकीय, आर्थिक, सामाजिक, वैचारिक अशा नाना तऱ्हेच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी शतकानुशतके माणूस धडपड करीत आला. या प्रयत्नात अनेकांनी लढे दिले व अनेकांनी प्राणाहुती देऊन, त्यात आत्मसमर्पणाचे समाधान मानले. या लढ्या-मुळे धर्म, एकतर्फी राजेशाही इत्यादी बाह्य बंधने तुटली. या धामधुमीत माणूस बुद्धि-वादी आहे हे मान्य झाले. आता काय लढाया संपल्या, लोकशाही आली, आता सर्व उत्तम होणार असे सर्वांना वाटले; पण ते अल्पा-वधीत मृगजळ ठरले. जसा माणूस इतिहास घडवतो तसा इतिहासही माणसांची घडण करून त्यांच्यात नाना प्रवृत्ती निर्माण करतो. त्यातूनच अलीकडच्या काळात अनेक अप-प्रवृत्ती निर्माण झाल्या व त्यांनी माणसाच्या सामाजिक व वैयक्तिक जीवनाचा कब्जा मिळवला. त्यामुळे आपण मिळवले तरी काय असे विचारण्याची माणसावर पाळी आली. मिळालेले स्वातंत्र्य लोक आपणहून देऊन टाकतात. असा चमत्कार नाझी राजवटी-पासून पहावयास मिळत आहे.

## स्वातंत्र्य आणि व्यक्तिमत्त्व

लहान मूल जन्मल्यानंतर परावलंबी असते. त्यावेळी त्याला आपण जगापेक्षा निराळे आहोत हे कळत नाही. त्याला हळूहळू व्यक्ति-मत्व येऊ लागते तेव्हा त्याला ही गोष्ट कळते. या व्यक्तिमत्वाच्या उदयानेच त्याच्यात एकाकीपणाची भावना निर्माण होते व तो सुरक्षिततेचे स्थान शोधू लागतो. त्यासाठी त्याला बाहेरच्या जगाशी नाते जोडून सहकार करावा लागतो. या प्रक्रियेतून त्याला काळजी निर्माण होऊन त्याला कुठल्यातरी अधि-काराला शरण जावे लागते. मग त्याला एकीकडे स्थान मिळते; पण स्वातंत्र्य जाते व अधिकाराविरुद्ध बंड करावेसे वाटते. त्यातून पुन्हा असुरक्षिततेची भावना वाढते. हे विरोध टाळण्यासाठी, व्यक्तिमत्व तयार होण्याच्या क्रियेबरोबर जगाशी विरोध होणार नाही असे नाते जोडता आले तर व्यक्तिमत्वाचा विकास होईल, संघर्ष होणार नाही. पहिली क्रिया आपोआप होते; परंतु दुसरीत अनेक कारणांनी अडथळे येतात. त्यामुळे घोटाळे होतात. हा प्रकार होत नसता तर मानव-जातीची मोठी प्रगती झाली असती.

मनुष्याच्या खालच्या पातळीवरील प्राण्यांच्या क्रिया विचारशक्तीपेक्षा प्रेरणेवर जास्त चालतात. फक्त माणूस परिस्थिती-नुसार निरनिराळ्या तऱ्हेने वागू शकतो. निसर्गाची हुकमत त्याच्यावर कमी चालते व त्या दृष्टीने तो स्वतंत्र असतो. मात्र जन्मतः तो काही काळ अन्य प्राण्यांपेक्षा जास्त दुर्बळ असतो. ही अडचण निसर्गानेच निर्माण केली आहे. हळूहळू माणसाला आपण इतरांहून निराळे आहोत हे कळते. जगात मृत्यू कोणा-लाही टळत नाही याची जाणीव शेवटी होऊन जीवन पोकळ आहे असे त्याला वाटू लागते व तो कष्टी होतो.

## जुन्या चौकटी व नव्या चौकटी

माणसाला एकीकडे निसर्गापासून स्वातंत्र्य मिळत गेले; पण दुसरीकडे कुटुंब, समाज इत्यादी बंधने निर्माण झाली. तरी त्याला त्यात एक निश्चित स्थानही प्राप्त झाले. माणूस समाजाच्या चौकटीत बांधला गेला तरी त्याला त्यातच एक प्रकारचे स्वातंत्र्य होते व त्याची परिणती उत्तम काम, कला-कुसरी यांच्या स्वरूपात तो करून दाखवू शकत असे. पुढे व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना आली. नंतरच्या काळात दळणवळण वाढले, जुनी बंधने गेली, स्वातंत्र्य मिळालेसे वाटले, पण जीवनसंघर्ष वाढून माणूस एकाकी व असहाय्य होत चालला. जीवनात अर्थ तरी काय हा प्रश्न त्याला अधिकाधिक पडू लागला व त्याला वैफल्याची भावना येऊ लागली. नावलौकिक मिळवण्याची हौस वाढत्या प्रमाणात दिसते याचे कारण माणूस कुठेतरी जीवनात अर्थ शोधत असतो. नाव मिळाले तर जीवनाला अर्थ येतो.

जुन्या चौकटी गेल्या पण नवीन आल्या हे माणसाला कळले नाही. समाजात नवीन गट निर्माण होऊ लागले. कार्यक्षमता, पैसा, नाव यश इत्यादी गोष्टींना जास्त महत्व येऊन ती ध्येये बनल्याबरोबर वाङ्मय, कला आदी सांस्कृतिक गोष्टींचे अवमूल्यन झाले. विविध गटांच्या प्रभावामुळे व्यक्ती दुर्बल होऊन एकाकी पडली व असुरक्षिततेची भावना वाढली. व्यक्तीच्या किंवा गटांच्या पिळव-णुकीच्या नवीन पद्धती तयार झाल्या. स्पर्धा आल्या. वैयक्तिक गुणांचे महत्त्व नष्ट झाले. समाजाचा कणा असलेला मध्यमवर्गही निष्प्रभ व क्रियाशून्य झाला.

पूर्वीचा दुकानदार गिऱ्हाईकांना ओळखे. तो गिऱ्हाईकांची व्यक्तिशः विचारपूस करी आणि चार गप्पा मारी. त्यातून एक नाते निर्माण होई. त्याला वैयक्तिक चातुर्य असावे लागे. तो योग्य आणि संयुक्तिक गोष्टीच गिऱ्हाईकाला सांगे. ज्यावर त्याचा ताबा नाही अशा गोष्टींवर आधुनिक दुकानदार अवलंबून राहतो. वस्तुतः तोच स्वतंत्र नसून अनेकांचा नोकर असतो. मोठमोठी स्टोअर्स आता छोट्या दुकानदारांची जागा घेत आहेत. तेथे गिऱ्हाईक आले म्हणून आनंद वाटणारा दुकानदार नसतो व माल घेणारा माणूस अनेकांपैकी एक गिऱ्हाईक असतो. पूर्वीचे वैयक्तिक नाते जाऊन बाजारी नाती आली.

धर्माची बंधने तुटली, त्या जागी अन्य श्रद्धा आली नाही. शास्त्रही कळत नाही अशी

अवस्था आली. बोलण्याचे स्वातंत्र्य आले म्हणजे काय तर बडबडण्याचे स्वातंत्र्य आले. विचारशक्ती गमावल्यामुळे पुस्तकातले व वर्तमानपत्रातले बोलायचे अशी वेळ आली. पूर्वीच्या जबरदस्ती करणाऱ्या बाहेर दिसणाऱ्या शक्ती गेल्या; पण त्यांची जागा प्रच्छन्नपणे जुलुम करणाऱ्या शक्तींनी कधी घेतली ते माणसाला कळलेच नाही.

## भांडवलशाही व कामगारशाही

नवीन यांत्रिक युगात भांडवलशाहीचा उदय होऊन माणूस मोठमोठ्या कारखान्यात यंत्रासारखाच पण कमी किमतीचा क्षुद्र घटक बनला. आता मालक व नोकर यांचे वैयक्तिक नाते नष्ट होऊन नोकर मालकाला पाहूही शकत नाही. भांडवल गुंतवून फायदा मिळतो या तत्त्वापासून काही प्रगती झाली खरी पण त्यामुळे स्वार्थ उफाळला. ज्यांचेजवळ भांडवल नाही ते कामगार झाले. ते व्यक्तिशः दुर्बल झाले व त्यामुळे त्यांनी संघ केले. पण त्यात स्वतःची पोळी पिकवणारे पुढारी निर्माण होऊन त्यांनी सत्ता काबीज केली. येथेही कामगार व्यक्तिशः दुर्बल ठरला व मनात नसले तरी पुढाऱ्यांच्या आदेशानुसार संपावर जाऊन त्याला स्वतःचे नुकसान करणे भाग पडू लागले. त्यातूनही अनेकदा समाजाचे हित विसरून फक्त स्वार्थासाठी तो भांडवलदारासारखा झगडतो. असे होईल हे समाजवादाच्या महर्षींना कळलेच नाही.

## गुदमरणारा माणूस

नवीन चौकटीत बेकारीची भीती अधिकच वाढली. युद्धाचे धोके, नाशाचे प्रकार, युद्धात मारले जाणाऱ्या लोकांची संख्या हे सर्व वाढत आहे. जाहिरातबाजीचे युग आल्याने माणसांच्या भावना सहज चाळवता येतात. आधुनिक चौकटीमधील भव्य इमारती, शहरे, रेडिओ, वर्तमानपत्रे, जाहिराती इत्यादींच्या तडाख्यात छोटा माणूस गुदमरतो आणि शेवटी तो विचारशक्तीच गमावतो.

हल्लीच्या गुंतागुंतीच्या युगात तज्ज्ञ निर्माण होऊन त्यांनाच कळते असा एक भास निर्माण केला जातो. हे बरेचसे खोटे आहे. अभ्यास केला तर सामान्य माणसालाही अनेक गोष्टी कळू शकतात. तज्ज्ञही त्याला लुटत आहेत.

याशिवाय नवीन जमान्यात सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत नाना कटकटी असतात. त्यांनी तो अधिकच हैराण होतो. नवीन औषधांनी व वैद्यकीय प्रगतीने त्याचे आयुष्य वाढले आहे, पण तो इतका गुदमरतो की, नको हे आयुष्य असे त्याला वाटते. तो प्रवास, सहलीत विरंगुळा शोधतो पण तो तात्पुरताच. मेला नाही म्हणून जिवंत म्हणायचे अशा अवस्थेत आयुष्य कंठीत बसतो.

## लोकशाही

लोकशाहीची कथा पहा. पूर्वी प्रत्येक मतदाराला उमेदवार माहीत असे. नावलौकिकावर पैशाने गरीब असलेले लोकही निवडून येत. आता मोठमोठे राजकीय पक्ष निर्माण होऊन पक्षाची यंत्रे उमेदवार ठरवतात. बहुसंख्य मतदार उमेदवाराचे तोंडही पाहात नाहीत. निवडणुकीत घोषणा, प्रचार इत्यादीचा गदारोळ उठतो, त्यात मतदाराची विचारशक्ती नष्ट होते. मतदार अडाणी असले तर, पक्षाच्या फायद्याचे असल्याने मतदार शिक्षित सुबुद्ध असावा याबद्दल ते प्रयत्नही करत नाहीत. निवडणुका पैशाच्या जोरावर लढवल्या जातात व त्यात गुंड, गुन्हेगार निवडून येतात. मग राज्ययंत्र त्यांच्या हातात जाऊन व्यक्ती आणखीनच क्षुद्र होते. लोकशाहीत स्वातंत्र्य कोणाला मिळाले, तर नाना तऱ्हेचे गुन्हेगार, काळाबाजारवाले इत्यादिकांना मिळाले असे दिसून येते. या लोकशाहीत राज्ययंत्राची सत्ता वाढून प्रच्छन्न दडपशाही वाढली व स्वातंत्र्याचा आभास तेवढा राहिला. या लोकशाहीचा उपयोग काय असे आता लोक विचारू लागले आहेत.

## माणूस एक क्षुद्र गुलाम

माणसाला आपण कोणीतरी आहोत असे वाटते. निदान कुटुंबात तो कोणीतरी असतो. त्याच पद्धतीने गावाचा, जमातीचा, राष्ट्राचा घटक म्हणून त्याला अभिमान उत्पन्न होतो. हा प्रकार लुप्त होऊन आधुनिक जगात माणूस हा त्याचा अधिकार किंवा मालमत्ता यांनीच ओळखला जातो व तो त्यापासून निराळा होऊ शकत नाही. या दोन गोष्टी ज्या माणसाजवळ नसतील त्याची किंमत शून्य. बुद्धिवादावर आधारित नवीन समाजरचना करताना माणसाने सामाजिक गोष्टीत विसंगतता ठेवली. त्यामुळे माणसाने जी यंत्रे व यंत्रणा निर्माण केल्या त्यांचा तो एक क्षुद्र गुलाम होऊन बसला व वैफल्यग्रस्त झाला.

## पळवाटा

वैफल्यग्रस्त माणूस पळवाटा शोधतो. मग तो अधिकारी, गुन्हेगार इत्यादिकांपुढे मान तुकवतो. दुसरी गोष्ट म्हणजे तो समाजाशी तडजोड करू पाहातो. ही तडजोड किती करायची? तत्त्वेच गुंडाळायची का? हे ठरवावे लागते.. शिवाय पुष्कळदा आपण आपली मते म्हणतो ती खरी आपली नसून वर्तमानपत्रे, फलके इत्यादींची असतात, ते विचारशक्तीच्या अभावामुळे कळत नाही. विचार दडपण्याची क्रिया लहानपणापासून चालते. मुलांना आईबापांच्या बोलण्यातली, वर्तनातली विसंगती उघड दिसते; पण त्यांना बोलता येत नाही. पुढे पुढे तेही रुळून तसेच वागतात.

## सत्यान्वेषण

व्यक्ती आपले खरे विचार स्पष्टपणे मांडू शकली तरच व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाही यांना अर्थ येईल; पण तसे होत नाही. शिक्षणपद्धतीत स्वतः विचार करण्याची सवय लावणे बाजूला राहून दुसऱ्याचे विचार लादल्याने कृत्रिम मेंढरणा तयार केला जातो. सामाजिक चालीरीती लादल्या जातात. वेळीअवेळी खोटे हसले पाहिजे, नाहीतर तुम्हाला व्यक्तिमत्त्व नाही. अगदी वरच्या थरात किंवा खाली मात्र ही बंधने कमी असतात. सहृदय माणसाची भावनाप्रधान म्हणून हेटाळणी होते; पण माणसाच्या भावना साफ जाणे शक्य नाही. मग विरंगुळा म्हणून सिनेमा, गाणी लागतात. वस्तुतः लहानपणी खरे समजून घेण्याची इच्छा असते; पण शिक्षणात हजारो असंबद्ध गोष्टी मुलांच्या डोक्यात भरवल्या जाऊन त्यांची विचारशक्तीच नष्ट होते. त्यात सत्यान्वेषणाला वाव नसतो. सत्य नष्ट झाले तर न्याय, स्वातंत्र्य इत्यादी शब्दांचा अर्थ जातो व दुर्बलांचा आधार नष्ट होतो.

## मी कोण?

आता माणसाला मी कोण याचा विचार करण्यास वेळ नसतो. गरजा इतक्या वाढल्या आहेत की त्या भागवण्यातच सर्व वेळ व

मलपृष्ठ १ वर

निवडणूक प्रतिक्रिया : पृष्ठ २ वरून

स्थैर्यासाठी आणि नाविन्य हवं त्यांना नाविन्यासाठी त्यांनाच मत द्यावंसं वाटलं. थोडक्यात म्हणजे प्रत्येकाच्या चौकटीत कुठून ना कुठून ते फिट्ट बसू शकले. काही गुण हलवायचा, काही मिठाईचा. पाककृती मात्र तूर्त तरी सर्वांनाच जमल्यासारखी वाटत असल्यास नवल नाही.

पुढे काय होईल ? एकदम एवढं बहुमत, एवढी जबाबदारी त्यांना कशी पेलेल ? असं ऐकलं आहे की जगात कुठेही इतक्या बहुमतानं जेव्हा एखादं सरकार निवडून येतं. (उदा. थॅचरबाईचं एकदा आलं होतं. ) तेव्हा त्याच्याही समस्या असतात एकतर इतक्या ४०० च्या आसपास विजयी उमेदवारांना अंतर्गत संघर्ष करू न देता, एकत्र नांदवणं. दुसरं म्हणजे त्यांना चांगल्या प्रकारे कार्यरत ठेवणं आणि हे सारं कोणत्याही धड विरोधी पक्षाचं आव्हान किंवा टोचणी नसताना. तेलगू देसमला विरोधी पक्षाच्या भूमिकेत बघणंसुद्धा कठीण जातंय. उद्या आपला एखादा शिवसैनिक दिल्लीत नेऊन बसवला तर त्याला त्या स्तराचा, त्या प्रश्नांचा, त्याच्या प्रतिनिधित्वाचा आवाका तरी समजेल का ?

ह्या सगळ्या प्रचारधुमाळीत कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री हेगडे यांची एक उपमा मला फार आवडली होती. एका प्रचारसभेत ते बोलत असताना शेजारून रस्त्यावरून एक बस धडधडत गेली. त्या बसकडे बोट दाखवून ते म्हणाले होते, ' मंडळी, आता अचानक या बसचा ड्रायव्हर मेला तर तुम्ही त्याच्या मुलाला त्या जागी बसू द्याल का ?' लोक ओरडले; ' नाही, नाही, तो गाढवपणा होईल. ' हेगडे पुढे म्हणाले, आणि समजा बळजबरीने त्याचा मुलगा ड्रायव्हरच्या सीटमध्ये बसला तर तुम्ही त्या बसमध्ये बसून आपला जीव धोक्यात घालाल का ? यावर लोकांनी टाळ्याशिट्ट्यांचा गजर केला होता. गेल्या काही दिवसांमधल्या घडामोडी बघता म्हणावंसं वाटतंय, हेगडेसाहेब, बसमध्ये बसण्या न बसण्याचा सवाल तरी येतो कुठे ? या देशातल्या ६०–७० टक्के मतदात्यांच्या लोंढ्यानं आम्हाला ढकलत या बसमध्ये घुसवलंय. त्यांचाही नाइलाजच होता म्हणा. दुसरं वाहन होतंच कुठे ? नवशिका ड्रायव्हर मोठ्या आत्मविश्वासानं गाडी चालवायला निघालाय. आता ही बस आपल्या भल्याच्या दिशेने प्रवास करेल अशी आशा आम्ही करतोय. दुसरं आमच्या हातात आहेच काय ? ☐

# च्यायला

—संजय पवार

सरकारी माध्यमातून जो पहिला विजयी निकाल जाहिर होईल तो काँ. (आय) चाच असणार हे ढोबळ अपेक्षामान पुढचे अठ्ठेचाळीस तास ' काँ. आय विजयी ' हे ऐकण्यात जातील या तयारीत नव्हते आणि त्यामुळेच जे जे अनपेक्षित घडत गेलं त्यात ' अपेक्षित ' काही घडलं तरच आता अनपेक्षित म्हणावं अशी पाळी आली. २८ ता. दुपारी ' आघाडीवर ' अशा बातम्या येऊ लागल्या तेव्हाच अटलबिहारी ' पिछाडीस ' ही बातमी ऐकली आणि यापुढे काय ऐकावे लागणार याची कल्पना आली. पण त्यातून निराशा, फारच अपेक्षाभंग वगैरे काही झाला नाही. कारण ' इंदिरा हटाव ' या गर्जनेने सत्तासंपादनाच्या ईर्षेत असलेले विरोधी पक्ष ३१ आक्टो. ८४ नंतर १० वर्ष मागे गेले. निवडणुका जाहिर झाल्या तरी ' घोषणा ' सापडेना. जाहिरनामा नाही. काँ. आयने ' अखंडतेची ' घोषणा दिली आणि मग विरोधकांना ' हेच देशद्रोही ' अशी घोषणा सापडली ! माझ्यं किंवा माझ्यासारख्या अनेक तरुणांची या देशातल्या राजकारणाबद्दलची काही पूर्वग्रहदूषित मतं असतात. उदा. काँग्रेस म्हणजे भ्रष्टाचार, दांडगाई, पैसा. भाजप म्हणजे शिस्त, हिंदू, स्वच्छ माणसं. जनता, समाजवादी म्हणजे करतात्यत काम, आहे अभ्यास पण दळिद्री. कम्युनिस्ट म्हणजे आगडोंब, नास्तिक वगैरे. प्रादेशिक पक्ष म्हणजे अपनी गली में शेर व ते तसं हवच... आणि मग या मतावरून आम्ही बिनदिक्कत झोपेत सांगतो महाराष्ट्रात काँग्रेस, बंगाल केरळमध्ये कम्युनिस्ट, यु. पी. एम. पी. दिल्लीत भाजप. वगैरे वगैरे... आम्ही कुणाचाच जाहिरनामा वाचत नाही इंदिरा गांधी ही ग्रेट बाई होती, अटलबिहारी चांगले वक्ते आहेत, जगजीवनबाबू हरामखोर आहे, चंद्रशेखर मेंगळट आहे आणि मोरारजीला शिवांबूत बुडवायला पाहिजे. एवढीच आमची राजकीय जाण त्यामुळे आज जे काही घडलं तसं घडल की ' च्यायला ' ही आमची सर्वात पहिली व उत्स्फूर्त प्रतिक्रिया म्हणून नोंदवता येईल. कारण आज सर्वच राजकीय पक्षात तरुणांचे स्थान आहे. त्या अर्थाने त्यांना राजकीय शिक्षण, अभ्यास यांची सोय आहे का ? तरुण म्हणजे सभांना गर्दी करा, रात्री जागून पोस्टर लावा, भिंती रंगवा, आरडाओरडा करा, विरोधकांना बडवा बस. या व्यतिरिक्त त्यांना स्थान नाही. त्यामुळेच बहुतांश तरुण वर्ग हे सारं आपल्या बाजूला घडत असून सुद्धा आपण त्यात कितपत पडावं असं ठरवूनच लक्ष घालतो. आणि आजची एकूण राजकीय परिस्थिती बघता कुणी वडीलधारे अथवा मित्र ' राजकारणात जा ' असा सल्ला देणार नाहीत, देत नाहीत. या अशा अपुऱ्या राजकीय जाणीवेमुळेच ' ही लाट आहे ' असं म्हणून सारं संपवता येतं. पण मला मात्र इथंच संपवायचं नाहीये. मी यातल्या प्रमुख पक्षांच्या व्यक्तिवरोबर विचारसरणीबरोबर काही संवाद साधला आहे, बोललो, पाहिलं व नुस्तं बघितलं तेव्हा बऱ्याच गोष्टी जाणवल्या. त्यातली एक म्हणजे इथले विरोधी पक्ष आपण कायम विरोधी पक्ष राहणार या भावनेने कामं करतात, आंदोलन करतात, डावपेच आखतात. आणि त्यामुळेच ७७ ला सत्ता मिळवूनही फर्नांडिस फार काळ उद्योगमंत्री राहिले नाहीत, दंडवते रेल्वेमंत्री होऊनसुद्धा कोकणात रेल्वे पूर्ण झाली.. नाही मोरारजी कुशल प्रशासक असून राज्य टिकवू शकले नाहीत. ' सरकार ' ही एक वेगळी गोष्ट आहे ती चालवताना काही वेगळे संकेत असतात. त्याचा विसर पडला की सत्ता जाते. मग ती कुशल मोरारजींची असो की भ्रष्टाचारी अंतुलेंची. दुसरी गोष्ट सातत्य आणि संघटन, या देशात शिस्तशीर संघटन म्हणून भाजपचा उल्लेख होतो; नुस्ती शिस्त

काय कामाची ? सत्ता हवी असेल तर तसे काही डावपेच लागतात.
काँग्रेस या बाबतींत वरचढ आहे.पार तालुका, गाव पातळीवरल्या कारभारात लक्ष, सहकारी बँक, बाजार समित्या, महामंडळ, साखर कारखाने यातून सत्ता व पैसा यांची प्रचंड साधने उपलब्ध करून ठेवून त्यातून माणसं बांधून ठेवण्याची कला फक्त काँग्रेसवाल्यांनाच जमते.आणि म्हणूनच त्याच मुशीतून तयार झालेले शरद पवार १०/१२ आमदारांसह विरोधी पक्षात येऊन मुख्यमंत्री होतात व थोड्याच दिवसात 'नॅशनल लिडर' होतात.
दुसरीकडे एकता, अखंडत्व, समानता याचे ठेके आम्हीच घेतले आमचं काम ते असं म्हणून छाती फुगवणारे विरोधक उमेदवार निवडीच्या वेळी एवढे स्वच्छ निकष लावतात का ?
अगदी स्त्री मुक्तीवर आमचा पक्ष भूमिका घेतो असे म्हणणारे विरोधीपक्ष सुद्धा किती स्त्री उमेदवार देतो ? त्या मानाने काँग्रेसचे स्त्री उमेदवार मुस्लिम, दलित उमेदवार नजरेत भरणारे.
यामुळेच काँग्रेस म्हणजे पैसा, दांडगाई भ्रष्टाचार असा विचार येतो; पण काँग्रेस म्हणजे अमुक वाद, तमुकवादी असे विचार येत नाहीत पण सगळ्यांची मोट बांधून राज्य हाकणारे एकच 'काँग्रेस' हा समज काँग्रेसने ठसवलाय.
जो पक्ष अंतुले निर्माण करतो तो पक्ष अंतुले संपवतोही. चरणसिंग, बहुगुणा, राजनारायण यांच्याबाबतीत असं होतं ? स्वामींचं त्रांगडं किती दिवस लटकावलं ? पंतप्रधानपदाची उतारवयातली भांडणं एकीकडे आणि राष्ट्रीय आपत्ती असताना राजीव गांधींची निवड करून काँग्रेसवाल्यांनी दाखवलेला शहाणपणा या साऱ्यांची पावती काँग्रेसने या निवडणुकीत मिळवली.
शंभर वर्षांची पुण्याई, राज्यकारभारातले सातत्य, विरोधकांची तीन पायांची शर्यंत या साऱ्यातून एकसंघ पक्षाची निवड अटळ व अपरिहार्य होती.
'प्रमाणाबाहेर बहुमताने सत्ताधारी माजतील.'
अशा विधानांचा सामान्यांवर प्रभाव पडत नाही.
भ्रष्टाचारी अंतुले ५० हजारांनी पराभूत होतात.
आणि अंतुलेंना उखडणाऱ्या बुद्धिवाद्यांच्या आवाहनाला ठोकरून सुनीलदत्त लाखानी विजयी होतात. मुंबई शहरात याचा बुद्धिवाद्यांनी पुनः एकदा विचार करावा. सर्वसामान्यांपासून आपण किती दूर आहोत व तसं असावं का ?
या निकालाने 'च्यायला' ही प्रतिक्रिया एवढीच ताणली जाते आणि शेवटी नोंदवावेसे वाटते की, 'शरद पवारांनी लाज राखली, अटल बिहारी पडायला नको होते.' अशा सहानुभूतीच्या पातळीवर आमचे विरोधी पक्ष मतदारांच्या मनात उतरतात. तेव्हा या देशातील विरोधी पक्षांना 'राजकारण' किमान तरी कळतं का ? का तेही आमच्यासारखेच ? असंच वाटत राहतं. □

# नवे युग येणार अशी रोमॅंटिक पण खरीखुरी अपेक्षा आणि विश्वास

—स. शि. भावे

शुक्रवार २८ डिसेंबर, दुपारी ४॥ : पहिल्या ५ पैकी ४ जागा काँग्रेस (आय) ला. त्याच दिवशी सायंकाळी : घोषित ५४ पैकी ३९ जागा. काल शनिवार, सायंकाळ : घोषित ४६९ पैकी ३८० जागा... शिवाय अखिल भारतीय अण्णा द्रमुकचे १२ खासदार काँग्रेस (आय) बरोबर. आज रविवार, सकाळ : ४९८ पैकी ३९२ जागा. तीन चतुर्थांशापेक्षा अधिक जागांचा विक्रम... उद्या पक्षनेत्याची निवड. उद्याच नवे मंत्रिमंडळ अधिकारपदी— सारे ठरवलेल्या वेळापत्रकाप्रमाणे. विविधतापूर्ण आणि भव्य अशा आपल्या देशाने निवडणुका अशा शिस्तीने घ्याव्यात याचा रास्त अभिमान वाटतो.

काल शनिवारपासून कानावर येणाऱ्या काही तज्ज्ञ आणि सामान्य मीमांसा : 'मोठी नाही, पण छोटी लाट होती.'...'लाट ओसरली असं वाटत होतं; पण तशी ती ओसरली नव्हती असं दिसतं.'...'नानाजी देशमुखांचा आदेश हिंदुत्ववाद्यांनी मानलेला दिसतो.' ...'सुवर्णमंदिर कारवाईपासून हिंदू मतदारांना भाजपपेक्षा काँग्रेस (आय) जास्त जवळची वाटू लागलेली दिसते.'...'मतदारांनी पुरा विचार केला नाही. भावनेच्या भरात मतं दिली.'...'फारच अनपेक्षित. मोठा धक्का.'

ऐकताना—वाचताना माझ्या मनात शंका येते : हा एवढा अनपेक्षित धक्का म्हणता येईल का ? पंधरा दिवसांपूर्वी मित्राशी बोलताना, 'कमीतकमी ३२०' असा माझा अंदाज मी त्याला सांगितला होता. मुंबईस श्री. मुरली देवरा यांनी आजच्या सनसनाटी विजयाचे भविष्य पूर्वीच केले होते. तसे कशाला ? माझ्या समोर आता 'इंडिया टुडे' चा ३१ डिसेंबर तारखेचा, पण २१ ला प्रसिद्ध झालेला अंक आहे. त्यात ३६६ चा अंदाज दिला आहे. आधार म्हणून बऱ्याच पहाण्या आणि त्यांचे विश्लेषण दिले आहे... बहुसंख्यांनी असे अंदाज केले असणार. त्यांना हा धक्का कसा ?

मतदारांना भोळे, अडाणी, भावनेच्या आहारी गेलेले असे म्हणणेही बरोबर होणार नाही. काश्मिर व आंध्र येथील मतदारांनी काँग्रेस (आय) कडे पाठ फिरवली ती काय याच भूमिकेतून ? अनुकूल झाले की मतदार शहाणे, प्रतिकूल झाले की तेच अडाणी असे बरेच उच्चभ्रू म्हणतात; पण असे म्हणणे बरोबर नाही.

मतदारांनी स्वतःचा विचार करून मते दिली आहेत, असे मला वाटते. १९५२ पासून भारतीय मतदार असे सुजाण मतदान करीत आले आहेत. माझ्या मते, आज त्यांचा मोठा विरोध खालील बाबींना प्रकट झाला आहे.

—वयाने, तसेच वृत्तीने, वृद्ध व सनातनी नेतृत्व.

—आत्मकेंद्रित, महत्त्वाकांक्षी, कारस्थानी नेते.

—फुटीर आणि अतिरेकी यांच्याशी जमवून घेऊ या असे म्हणणारे—सुचवणारे 'मनधरणी—वादी' ( appeasers )

—खऱ्या अर्थाने 'अखिल भारतीय' वजन आकार व कार्यक्षमता नसलेले पक्ष.

—१९८० च्या पराभवातूनही काहीच

शहाणपण न शिकलेले नेते आणि तरीही त्यांच्याच मागे पारंपारिक आंधळेपणाने जाणारे अगतिक अनुयायी.

यंदाचे मत ठामपणाने यांचे विरोधात आहे.

शेवटचा प्रश्न : मग मतदारांनी कशाला मत दिले आहे ?

माझ्या मते, मतदारांनी एका मोठ्या अपेक्षेला मत दिले आहे. चाळीस वर्षांचे तरुण पंतप्रधान राजीव गांधी यांचेसंबंधी मतदारांनी ही अपेक्षा प्रगट केली आहे. आधुनिक शास्त्रीय दृष्टिकोन, तडफदार निर्णयक्षमता व कार्यक्षमता, जुन्याचे ओझे न बाळगणारा कोरा ताजेपणा–हे सारे राजीव गांधींच्या व्यक्तित्वात आहे, असा त्यांना विश्वास वाटतो आहे. काँग्रेस (आय) पक्ष शासन आणि देश यांत त्यांनी नवे मोठे बदल, घडवून आणावे अशी मतदारांची अपेक्षा आहे. असे बदल ते घडवून आणतील असा मतदारांना विश्वास वाटतो आहे.

ही अपेक्षा व हा विश्वास 'रोमँटिक' आहे, 'विशफुल' आहे; पण तो फार खरा आहे. एकीकडे काँग्रेस (आय) ची जुनी यंत्रणा आणि दुसरीकडे विरोधी पक्षांची वांझोटी धावपळ यांनी मतदार पुरते विटले आहेत. त्यांना आज नव्या, ताज्या रोमँटिक आश्वासनाची गरज आहे, ३१ ऑक्टोबर रोजी इंदिराजींची क्रूर हत्या झाल्यापासून पंतप्रधान राजीव गांधींचे झालेले वागणे पाहून त्यांच्या मनात हा नवा विश्वास तयार झाला आहे. त्यांचा दुःखातील संयम, ठाम, तडफदार निर्णय, झंझावाती अथक प्रचार, त्यांचे विरोधी पक्षांवरचे ठोस आरोप, इंदिराजींचे नाव व वारसा सारखासारखा न आळवण्यातील त्यांचे औचित्य या विशेषांनी मतदार प्रभावित झाले आहेत. त्यांच्या मनात कमालीच्या उत्तुंग अपेक्षा निर्माण झाल्या आहेत या अपेक्षा पूर्ण होणार असा विश्वास बाळगायला त्यांना आवडते आहे. ती त्यांची आजची मानसिक गरज आहे.

ही फक्त भोळी भावना आहे असे समजण्याची चूक विचारवंतांनी करता कामा नये. मतदारांचा हा शहाणा 'फील' आहे. त्यांचे मतदान म्हणजे या फीलमधून केलेली 'कॅल्क्युलेटेड इन्व्हेस्टमेंट' आहे. असा फील देता येणे राजकारणात फार महत्त्वाचे असते. विरोधी पक्षांना हे जमले नाही. त्याबाबत त्यांना आत्मपरीक्षण करावे लागेल.

स्वतःवरील प्रचंड विश्वासाचे ओझे काँग्रेस (आय)लाही आत्मपरीक्षणाच्या वृत्तीनेच लक्षात घ्यावे लागेल. पंजाब व आसाम या सीमावर्ती राज्यांत निवडणूक झालेली नाही. काश्मीर व प. बंगाल काँग्रेसबरोबर नाहीत. हे ध्यानी घेऊन काँग्रेसला सर्व जास्तीतजास्त भारतीयांना बरोबर घेऊन जाण्याचे, महासमन्वयाचे धोरण ठेवावे लागेल. तरच हा विजय त्यांना पचेल आणि भारताच्या कारणी लागेल.

याचा एक परिणाम अटळ आहे या रोमँटिक विश्वासाला थोडा जरी तडा गेला तर हेच मतदार, याच आवेगाने, नव्या नेतृत्वाच्या विरोधी जातील. या शक्यतेचा अंकुश नव्या नेतृत्वावर राहील. मिळालेल्या अभूतपूर्व विश्वासाचा उचित, गंभीर आदर नवे नेतृत्व करील, तसेच, विरोधी पक्षही हा अंकुश तीक्ष्ण राखतील, अशी आपण आज आशा करू या. □

---

# आता आमचीच सत्ता

## –नितिन ठाकूर

---

'काय मग ? काय म्हणते इलेक्शन ?'

'काय राव, पार बोलतीच बंद करून टाकली. राजीव गांधी अगदी अजिबात हिअरिंग नॉट बरं का.'

'राजीव गांधींचं सोड रे. म्हणजे ते आहेच. पण लेका बच्चन ? सुनीलदत्त ? लाखालाखाने पुढे ? आपण तर जाम खुष आहे या इलेक्शनवर. बच्चन आला आणि आपला इलेक्शनमधला इंटरेस्टच संपला. बोललो आता काय वाटेल ते होऊ दे. गंगा किनारेवाला छोरा दिल्लीत आला ना बस्स !'

'काय नाय आता आमचीच सत्ता. आता दाखवतो. विधानसभेला बघ कुणालाही उभा करून निवडून आणतो. मीच रहातो उभा.'

'बरं का अटलबिहारी होईल तुझा. फुकट शहाणपणा करू नको. आता क्लिअर पॉलिटिक्स येणार. राजीव गांधी म्हणजे जंटलमन आहे.'

'नाही पण हे चंद्रशेखर, अटलबिहारी, जॉर्ज वगैरे पडायला नको होते राव. हे म्हणजे काहीतरीच झालं. आता बघू ना, सगळं तुमचंच आहे ना, बघूच काय करता ते. दोन महिन्यात फुटाफूट नाही ना झाली तर बघ.'

'अरे, आता तरी बोध घे. इलेक्शनच्या आधीपासून हेच म्हणत होतात. मोठे राष्ट्रीय पक्ष. २ जागा मिळाल्या फक्त दोन.'

'ए, ३ आहेत.

'बरं बाबा ३. पण आता पुरे हं. ३ पेक्षा जास्त नको.'

'आत्ता बोला, पण एक इलेक्शन गेली म्हणून काही होत नाही. इंदिराजी पण एकदा पडल्या होत्या. ते आठवतंय ना ?'

'हं, आता तेच आठवा, कारण पुढे काहीच उरलं नाही.'

'पण राजीव गांधीला पण एवढी खात्री नसेल की आपल्याला एवढ्या सीट मिळतील.

'विसरा. विसरा. त्याशिवाय नाही त्याने अमिताभ, सुनीलदत्त उभे केले. काही म्हणा, पण एक नक्की राजीव गांधी जबरदस्त माणूस आहे. लेका, स्वतः ३ लाखांनी आणि बाकीचे लाखाने निवडून आणलेत ते काय कल्पना असल्याशिवाय ?'

'नाही, पण हे असंच व्हायला पाहिजे होतं. तुला माहितीये, डोक्यावरचे केस जर नीट यायला हवे असले तर आधी सगळे केस साफ भादरावे लागतात. तसं झालंय आता. नामोनिशाण नाही ! आता जरा आशा आहे.'

'पक्ष वगैरे जरा राहू दे पण तुला वाटतं का की आशा आहे ?'

'नक्कीच. नक्कीच आशा आहे. कारण बघ ना, ना राजीवला पैशाची हाव आहे, ना अमिताभला सुनीलदत्त पण तसाच. ह्यांच्याकडे आधीपासून पैसे असल्यामुळे हे विकले जाणार नाहीत. त्यामुळे भ्रष्टाचार कमी होण्याची शक्यता आहे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे हे तरुण आहेत रे. खुर्चीपेक्षा नावासाठी धडपडतील. त्यामुळे काही तरी करतील, तरी त्यामुळे नुसती आशा आहे असंच नव्हे तर खात्री आहे.

'पण ही एवढी गेम कशी काय पडली असेल रे ?'

'एक तर इंदिराजींची हत्या. दुसरं म्हणजे विरोधी पक्षांची एकत्र येण्याची केविलवाणी धडपड. त्यात तत्त्व, जागा ह्याच्यावरून मारामारी. त्याहीपेक्षा महत्वाचं म्हणजे लोक कंटाळले होते रे. त्यामुळे बघू या हा नवीन आहे. हा तरी करेल काही तरी म्हणून दिली मतं.'

'हे बघ ए, यावेळी काँग्रेस आयचा प्रचार पण जबरी झाला.'

'हट् कसला जबरी ? लेका, पण बाईंच्या हत्येच्या वेळी ते काय धुपले असतील ? सगळं केलेलं वाया गेलं असेल.'

'असेल ना, पण नंतर फक्त बूंद बूंद से रक्षावर फुल इलेक्शन. पण एक कमाल आहे राव. संजय गांधींचं नाव नाही कुठं.'

'हो, राव हे खरं आहे. राष्ट्रीय संजय मंच सोडलं तर नाव नाही.'

आता अमिताभला नभोवाणी मिळेल नाही ?'

'सरळ आहे. पण काही सांगता येत नाही हं राजीव गांधीचं. नाही तर करून टाकेल गृहमंत्री.'

'विरोधी पक्षनेता कोण ?'

'प्रश्नच आहे राव. सगळेच फुडारी. पण शरद पवारनं लाज राखली राव. एखाद वेळी त्यांनाच करतील.'

'तेलगू देसमवाले करतील ते खरं.त्यातल्या त्यात त्यांनाच जास्त जागा आहेत.'

तर अशा ह्या चर्चा निवडणुकीवरच्या. खरं तर सगळ्यांनाच प्रश्न पडलाय एवढं कसं काय ? □

## विधायक चळवळी हव्यात

—प्रा. व्ही. डी. देशपांडे

पं. नेहरू आणि श्रीमती इंदिरा गांधी यांच्या काँग्रेसपेक्षाही राजीव गांधी यांच्या काँग्रेसला भारतीय जनतेने अधिक भरघोस पाठिंबा दिलेला आहे. निवडणुकांची आकडेवारी कुरतडून, त्यातून काही समाधान मिळवण्याचा प्रयत्न विरोधक करू शकतील; परंतु त्याला आता फार अर्थ नाही.

निकाल कोणाला आवडोत न आवडोत. कोणत्याही लोकशाही व्यवस्थेच्या प्रेमिकाला एक गोष्ट समाधानाची वाटेल. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले होते. भारतातील लोकशाही संपुष्टात येते की काय अशी भीती अनेकांच्या मनात डोकावत होती; परंतु फार थोड्या काळात सुरळित सत्तांतर झाले. अपेक्षेपेक्षा आधीच निवडणुका जाहीर झाल्या आणि काही अपवाद सोडल्यास, प्रचार आणि मतदान शांतपणे पार पडले. बहुसंख्य लोकांनी मतदान करून आपण लोकशाहीत जागृत आहोत हे दाखवून दिले. या सगळ्या घटनांचा अर्थ एवढाच की, लोकशाही येथे रुजलो आहे. तिचा आदर आपण सर्वांनी राखला पाहिजे.

आज प्रश्न आहे तो हा की, या निरंकुश सत्तेवर अंकुश निर्माण करण्याचा. नको एवढे बहुमत कांग्रेस (आय) ला मिळाल्याने काही धोका निर्माण होऊ शकेल. सत्तेवर जनतेचे दडपण सतत हवे. त्याशिवाय प्रगती नाही. सत्ताधारी पक्षाने आणि इतर पक्षांनीही काही पथ्य पाळावयास हवे. सत्ताधारी पक्षात आता तरुण कार्यकर्त्यांचा गट प्रभावी राहील. त्यांनी लाळघोटेपणा सोडून, पक्षाच्या आणि सरकारच्या धोरणावर परखड टीका केली पाहिजे. मंत्रिमंडळात स्थान मिळवण्याचा मोह टाळून, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाची प्रक्रिया पुढे रेटण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. मी याबाबत फारसा निराश नसलो, तरी फारशी आशाही वाटत नाही. म्हणून विरोधी पक्ष आणि त्याहीपेक्षा राजकीय पक्षाबाहेर राहून कार्य करणाऱ्या संघटनांकडे अधिक अपेक्षेने पाहतो. येथून पुढे सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत अधिक लक्ष घालणे आवश्यक आहे. प्रामुख्याने धर्मपिसाटपणा, अंधश्रद्धा, शोषण आणि विषमता यावर मोठ्या प्रमाणावर आघात करायचा असेल, तर तो अशा चळवळी आणि विधायक कामाचे प्रकल्प यातूनच पार पडेल. लोकशाहीच्या चौकटीत याला फार महत्त्वाचे स्थान आहे. सत्ताधारी पक्षातील तरुण कार्यकर्त्यांना आणि शासनातील अधिकाऱ्यांना मी एवढेच सांगेन की, या चळवळींचा आणि विधायक कार्य करणाऱ्या संघटनांचा मान राखणे तुमचेही कर्तव्य आहे.

विरोधी पक्षांना आपण काय सांगणार ? ते या घटनातून काही धडे शिकतील असे आज तरी दिसत नाही. आंध्र आणि प. बंगाल मध्ये लाट थोपवली ती तेथील पक्षांनी. त्यांना थोडंफार यश आले, ते त्यांनी सामान्य जनतेमध्ये काही कार्य केले म्हणून. उत्तर प्रदेश, बिहार इ. प्रांतात गरीब जनतेपर्यंत कोणताच राजकीय पक्ष पोहोचलेला नाही. चंद्रशेखर यांनी देशभर पदयात्रा काढली; परंतु ठिकठिकाणी विधायक आणि संघर्षात्मक कार्याचे अड्डे तयार करण्याकडे दुर्लक्ष केले. मग या पदयात्रेचा उपयोग काय ? परंतु कोणी काय करावे, हे सांगणे येथे अप्रस्तुत आहे. आज तरी असे दिसते की, निरंकुश सत्ता योग्य कारणासाठी वापरावयाची असल्यास, योग्य त्या दिशेने जनतेमध्ये जागृती आणि गरीब लोकांच्या संघटना यांकडे अधिक लक्ष द्यावयास हवे. □


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला निसटलंच पाहिजे !

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# मतदार अप्रगल्भ ? ही काय थट्टा आहे ?

## –शिरीष सहस्रबुद्धे

शुक्रवार अठ्ठावीस डिसेंबर. संध्याकाळपासनं मी आलटूनपालटून रेडिओला कान नि टीव्हीला डोळे लावून बसलेलो आहे. आघाडीवरचे अन् पिछाडीवरचे उमेदवार, मिळालेली मतं, फरक, पक्षवार बलाबल अशी आकडेवारी उतरवून घेण्यात हात गुंतलेले असले तरी मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात एकोणिसशे सत्त्याहत्तर सालच्या वीस-एकवीस मार्चची आठवण हलकेच घोळते आहे. देहभान हरपून निकाल ऐकले ते खरे त्या दिवशी. संजय गांधी पराभूत आणि इंदिराजी पंचावन्न हजाराच्या पिछाडीवर ही अधिकृत बातमी दिल्लीवरनं ऐकली तेव्हा कुठं रात्रीचा दीड वाजून गेल्याचं भान आलं होतं.

आज संजय आणि इंदिराजी दोघेही हयात नाहीत, तेव्हा सत्त्याहत्तरच्या आठवणी चघळणं गैरलागू होईल. त्यानंतर जेमतेम पावणेतीन वर्षातच पुन्हा निवडणुका आल्या; पण त्यात जीव रमला नव्हता. स्वप्नभंगाची कडवट चव तोंडात घोळवतच लोकांनी आसूड फटकावल्यागत मतदान केलं निकाल ऐकायची उत्सुकता बेताची होती. त्यानंतरच्या उण्यापुऱ्या पाच वर्षांच्या मुदतीअखेरीला ज्या घटना घडल्या त्यांची गडद सावल्यांसारखी पार्श्वभूमी यंदाच्या निवडणुकीला लाभलेली होती. अर्थात निकाल ऐकायचे होते ते राजकारणातला जुना इन्टरेस्ट स्मरूनच. एरवी त्यात अनपेक्षितता फारशी नव्हतीच.

माझ्यासमोर टीव्हीवर चुनावविश्लेषण वगैरे चालू आहे. दोघे कॉम्प्युटरतज्ज्ञ त्या यंत्राला वाचा नसल्याचा फायदा घेऊन त्याच्या नावावर आपले गोलमाल अंदाज खपवताहेत. भरीला प्रोकाँग्रेस स्विंग, ऑपोझिशन इन्डेक्स वगैरे परिभाषेची सजावट. हळूहळू ऑपोझिशन इन्डेक्सची चर्चा बंद पडते आणि फक्त स्विंगची टक्केवारी मोजायचं काम बाकी उरतं. काहीही असलं तरी हा प्रकार टीव्हीवर पहिल्यांदाच आलाय. या यांत्रिक मेंदूच्या कर्तृत्वावर राजीव गांधींची बरीच श्रद्धा आहे असं ऐकलंय. टीव्हीवरचा हा कार्यक्रम हे या बदलत्या राजकीय शैलीचंच प्रत्यंतर म्हणावं का ?

कॉम्प्युटरतज्ज्ञांच्या पाठोपाठ राजकीय तज्ज्ञ हजेरी लावतात. त्यांचीही एक खास परिभाषा आहेच. लॅन्डस्लाइड व्हिक्टरी, मॅसिव्ह मॅन्डेट अशा शेलक्या शब्दात ते काय घडतंय ते व्यक्त करायला बघतात. त्यातले बहुतेक पत्रकार आहेत, आणि बहुतेक कुणालाच काँग्रेसच्या अशा जबरदस्त विजयाचा अंदाज आलेला नव्हता. त्यांनाच नव्हे तर बाहेरच्याही अनुभवी पत्रकारांना एवढं यश अपेक्षित नव्हतं. किंबहुना त्यामुळेच ते मतदारांचा खरा कल समजूही शकले नाहीत आणि प्रोजेक्टही करू शकले नाहीत. याचा दोष जातो तो त्यांच्या बनचुकेपणाकडे आणि कोत्या समजदारीकडे. उदाहरणार्थ, इंदिराजींविषयीच्या सहानुभूतीची लाट ओसरली अशी एक आवई उठली. विरोधी नेत्यांना ती तशी उठवणं आवश्यकच होतं; पण त्यांच्या ओंजळीन प्यायलं तरच पाणी गोड लागतं अशा थाटात बहुसंख्य पत्रकारांनीही तोच घोशा धरला. वस्तुस्थिती तशी नव्हती हे आता उघड झालंच; पण जाणत्यांना आधीही एवढं जाणवायला हरकत नव्हती की या सहानुभूतीच्या लाटेचं मूर्त स्वरूप सतत जाणवत नव्हतं याचा अर्थ ती ओसरली असा होत नाही. मतदार काय एकतीस ऑक्टोबरपासून ते थेट चोवीस डिसेंबरअखेर इंदिराजींच्या नावानं टाहो फोडत राहणार होते ? आणि असा काही बटबटीत आविष्कार झाला तरच का लाट आहे म्हणणार ? हा हिशेब भलताच ढोबळ झाला. आमच्या पत्रकारांकडून आम्हा वाचकांच्या अपेक्षा निश्चितच याहून वरच्या दर्जाच्या होत्या. त्या पुऱ्या झाल्या नाहीत, हे नमूद केलंच पाहिजे. अर्थात ज्यांनी एखादी बाजू शभर टक्के घेऊन उघडच प्रचार केला, त्या वृत्तपत्रांची गोष्टच वेगळी.

निरनिराळ्या पक्षांची स्थिती टीव्हीवर दाखवली जातेय ती पाहिली की आता विरोधी पक्षांबद्दल सहानुभूतीची किंवा दयेची लाट येणं आवश्यकच वाटतं. तेलगू देसम् वगळला तर बाकीच्यांची अवस्था बिकट आहे. जे निवडक विरोधक जिंकले आहेत, त्यातही श्री. चरणसिंग, श्री. जगजीवनराम यांच्यासारखे निकामी, अतिवृद्ध आणि डॉ. दत्ता सामंत, श्री. शरद पवार, श्री.साहेबराव पाटील डोणगावकर यांच्यासारखे राष्ट्रीय राजकारणातले नवखे भिडू यांचाच भरणा जास्त आहे. संसदीय कामकाज एकतर्फी आणि मिळमिळीत व्हायचा धोका यात जरूर आहे. विरोधकांमधले श्री. मधू दंडवते वगळता इतर सगळे प्रभावी संसदपटू आणि खंदे वक्ते इंदिरानामाच्या महापुरात झाडोऱ्याझुडुपासारखे वाहून गेले आहेत. इंदिरा काँग्रेस खालोखाल उमेदवार उभे करणाऱ्या भाजपाची दशा सगळ्यात दयनीय आहे. त्यांचे अध्यक्ष आणि तीन उपाध्यक्ष किमान दीड–दोन लाखांच्या फरकानं हरले आहेत. पाचशेचव्वेचाळिसांच्या सदनात आता भाजपाचे प्रतिनिधी दोन. आणि हा पक्ष राष्ट्रीय पर्याय म्हणून उभा राहू इच्छितो ! इतक्या मोठ्या राजकीय कारकीर्दीत ज्यांना आपल्या साठी एक हुकमी मतदारसंघ जोपासता आला नाही ते श्री. वाजपेयी यांचे पंतप्रधानपदाचे उमेदवार !

श्री. चंद्रशेखर यांचाही दारुण पराभव झाला आहे; पण निदान त्यांचे अनुयायी 'पंतप्रधानकी आगली बारी' त्यांचीच असल्याच्या कंठाळी घोषणा तरी करीत नव्हते.

तडजोड, लवचिकपणा अशी लेबलं लावून ज्या ज्या विरोधी पक्षांनी तत्वहीन चुंबाचुंबी आणि हुंगेगिरीचा हातखंडा चाळा केला त्या सगळ्यांना लोकांनी फटकारलं. अपवाद फक्त चरणसिंग–जगजीवनराम या जातीच्या आधारे हमखास निवडून येणाऱ्या जोडगोळीचा. यांना मात्र आता फक्त काळच दुरुस्त करू शकेल. एरवी विरोधक जणू अशा भ्रमात वावरले की आपण जमेल त्याच्याशी आघाडी करायचा अवकाश, मतदार विजयमाला घेऊन तिष्ठत उभेच आहेत. या भ्रमाचा मतदारांनी साफ निचरा केला आणि विरोध-

कांची विश्वासार्हता आपल्यालेखी किती घसरली आहे, हेच दाखवून दिलं. विरोधक यातनं काही धडा घेतील का हा खरा प्रश्न आहे आज त्यांचा जसा खात्मा झाला आहे, तसाच सत्त्याहत्तर साली कांग्रेसचा झाला होता. इंदिराजींना त्यातनं सावरायला फक्त अडीच वर्षं पुरली आणि तो सारा इतिहास ताजाच आहे. मात्र आडमुठे म्हातारे आणि झुंजारपणा विसरलेले प्रौढ अशा नेत्यांच्या विळख्यातून विरोधी पक्षांची सुटका व्हायला हवी.

## लोकशाही जिवंतच

विरोधी पक्षांना लोकांनी झिडकारलं असलं तरी तेवढ्यामुळे हे मतदान ऐंशी सालाप्रमाणे प्रतिक्रियात्मक होतं किंवा नकारात्मक होतं असं म्हणता येणार नाही. विरोधकांना नाकारायची प्रक्रिया हा एक 'साइड-इफेक्ट' होता, मूळ उद्देश नव्हे. मूळ उद्देशाचा विचार केला तर हे स्पष्ट 'पॉझिटिव्ह मॅन्डेट' आहे. दूरदर्शनवर वारंवार सांगितलं गेलं त्याप्रमाणे लोकांनी श्री. राजीव गांधींवर विश्वास व्यक्त केला आहे आणि त्यांना भक्कम संधी द्यायचीच या भावनेनं त्यांच्या प्रत्येक उमेदवारावर, त्याची वैयक्तिक योग्यता सहसा न बघता मतांचा पाऊस पडला आहे. मतदारांना स्थैर्य आणि सातत्यही हवं होतं आणि स्वातंत्र्यकाळापासून चालत आलेल्या राजकीय शैलीत बदलही हवा होता. या दोन्ही गरजा राजीव गांधीच पुऱ्या करु शकतील असा भरवसा वाटल्यामुळेच हा उजवा कौल त्यांना मिळाला.

अर्थात इंदिराजींच्या निधनामुळे निर्माण झालेल्या सहानुभूतीचा फायदा त्यांना जरूर मिळाला आहे. पण केवळ तेवढ्या एकाच सहानुभूतीपोटी मतं मिळाली असं म्हणणं हा आम्हा मतदारांचा अपमान आहे. सत्त्याहत्तर साली विरोधकांना धोधो मतांनी सिंहासनावर बसवणारे प्रबुद्ध मतदार सात वर्षांनी राजीवजींना तसंच यश दिल्याबरोबर अप्रगल्भ आणि लाटेत वाहून जाणारे ठरतात ही काय थट्टा आहे? विरोधी पक्ष आत्मपरीक्षण न करता नैराश्यापोटी असे आरोप करून समाधान करून घेतील,तर मार्च-एप्रिलमधल्या विधानसभा निवडणुकाही गमावतील.

निव्वळ निवडणुका म्हणजे लोकशाही नव्हे, हे आपण नेहमीच म्हणतो, नि ते खरंही आहे. मात्र लोकशाहीची जाणीव समाजाच्या सगळ्या थरांमध्ये पोचवण्याचं हे एक प्रभावी साधन आहे हे निश्चित. निदान सत्त्याहत्तरच्या पासूनच्या तीन सार्वत्रिक निवडणुका अभ्यासणाऱ्यांना हे जाणवेल की भारतीय मतदार अधिकाधिक 'डेव्हलप' होतोय. आपल्या सामर्थ्याची जाणीव त्याला होत्येय आणि ते कसं वापरायचं याच्या काही खूणगाठीही तो मनाशी बांधत चाललाय. पैशाची उधळपट्टी, वाहनं, जातिनिहाय मतपेढ्या (व्होट बँक्स) याचं महत्त्व संपलं नसलं तरी निव्वळ त्यांच्या आधारे बांधलेले पारंपरिक आडाखे हल्ली चुकायला लागलेत. आपलं अपयश झाकण्यासाठी मग पत्रकार, राजकीय निरीक्षक नि पराभूत राजकारणी, 'मतदार लाटेत वाहून गेल्याचा' गवगवा करतात. लाटा नसतात असं नाही, पण कोण त्या उठवतो? आम्ही मतदारांनीच त्या निर्माण केलेल्या असतात. दुसऱ्या कुणी नव्हे. म्हणून तर हे पत्रकार, निरीक्षक नि राजकारणी ह्यांना फार उशीरा– म्हणजे बहुधा त्या लाटेत गुदमरल्यानंतरच– त्यांचा पत्ता लागतो. एखाद्यानं लाट उठवावी आणि तीसचाळीस कोटींना वाहवून न्यावं इतकी कुणा एखाद्याची पुण्याईही नाही आणि आमची दुर्बलताही नाही. आमचं मत शस्त्र म्हणून कसं वापरावं हे आम्ही हळूहळू शिकतोय. सत्त्याहत्तर नि ऐंशी सालात आम्ही स्वतःच निवडलेली बहुमतातली सरकारं खालसा करून टाकली तर आता घराणेशाही वगैरेंचं भय न बाळगता लायक वाटली त्या व्यक्तीला भरघोस बहुमत बहाल केलं. हा जागरुकपणाचा निर्णय आहे अन् त्याच्यामागे हा आत्मविश्वास आहे की, या नव्या राजवटीनं नवं आणि चांगलं काही केलं नाही तर पाच वर्षांनी आम्ही त्यांनाही नारळ देऊ शकतो.

निवडणूक निकालाची खास वार्तापत्र आता मालमसाला संपत आल्यानं तितकीशी एक्सायटिंग वाटत नाहीत. राज्यवार परिस्थिती स्पष्ट झालीय. बंगालचा अपवाद सोडला तर सगळा उत्तर भारत आणि आंध्रचा अपवाद वगळता सबंध दक्षिण भारत कांग्रेसच्या मागे एकमुखानं उभा आहे. बंगाल नि केरळात कम्युनिस्टांची पडझडही कमी नाही. तेलगू देसम् मात्र पाय रोवून उभा. प्रथमच संसदेत एका प्रादेशिक पक्षाचे अठ्ठावीस खासदार बसणार आहेत. गंगायमुनांच्या खोऱ्यात मात्र विरोधकांना जेमतेम सुईच्या अग्रावर मावेल एवढीच जमीन मिळाली आहे. खुद्द दिल्लीत सरदारजींच्या कांग्रेसविरोधी मतांमुळे पारडं फिरेलसं काहींना वाटलं होतं, तसं झालेलं नाही. निव्वळ हिंदू मतावर कांग्रेसला दिल्लीत काय किंवा इतरत्र काय, एवढा विजय मिळाला नसता. अल्पसंख्याकांनी कांग्रेसची साथ सोडलेली नाही हे नक्कीच. त्याचबरोबर हेही खरं की हिंदूंचा कैवारी ही भाजपाची प्रतिमा कांग्रेसनं पूर्वी जम्मूत तशी आता देशभर साफ पुसून टाकली आहे. ऐंशी सालीसुद्धा जनता पक्षामागं उभ्या राहिलेल्या मुंबईनेही टोपी फिरवली आहे. आंध्रातलं अपयशसुद्धा ओढवून घेतलं म्हणूनच. रामारावांना स्थानभ्रष्ट करायची इतकी घाई इंदिराजी नि अरुण नेहरूंनी केली नसती, तर एवढा फटका बसला नसता, शिवाय रामाराव सरकार एव्हाना आपल्याच वजनानं मोडकळीला आलं असतं. हा विचार मनात यायला नि कर्नाटकच्या हेगडे मंत्रिमंडळानं राजीनामा दिल्याची बातमी फ्लॅश व्हायला एकच गाठ पडते. राजीव गांधींचं एक काम हलकं झालं! त्यांचा नि त्यांच्या पक्षाचा विजय अभूतपूर्व नि ऐतिहासिक आहे हे सिद्ध करायला आता संख्याशास्त्रज्ञांनी अस्तन्या सरसावल्या आहेत. कांग्रेसला एवढ्या सीट्स् प्रथमच मिळताहेत, तशी एकूण मतांची टक्केवारीही कधी नव्हे इतकी बाळसेदार आहे. टी. व्ही. वरच्या कॉम्प्यूटरवाल्या इंटेलेक्युअल्सची आपापल्या कौतुकाची शेवटची मैफल चालू आहे.

शेवटी निवडणूक ही लोकशाही प्रक्रियेची फक्त सुरुवात आहे. नव्या वर्षाची नवी सुरुवात होताना एवढंच समाधान आहे की, दारिद्र्य, अज्ञान, लोकसंख्यावाढ यासारख्या अरिष्टांनी विळखा घातलेला असूनही आमच्या देशातली लोकशाही जिवंत आहे. तिसऱ्या जगात इतरत्र लोकसत्तेचे दिवे मंदावत असतानाही आमच्या खंडप्राय देशातला दिवा तेवतो आहे, हा दिलासा कमी मोलाचा नाही.

□

## जबाबदारीचं ओझं

—निरंजन आगाशे

इंदिरा कॉंग्रेस पक्ष हे बहुमत मिळवणार हे अपेक्षित होते तरी ज्या प्रमाणात या पक्षाने यश मिळवले ते धक्कादायक होते. केवळ विरोधकांनाच नव्हे तर सत्ताधारी पक्षालाही धक्का देणारा हा निकाल आहे.

इंदिरा गांधींच्या निधनानंतर एक मोठी सहानुभूती लाट अस्तित्वात आली होती हे नाकारता येणार नाही; पण इं. कॉं. ला मिळालेले प्रचंड मताधिक्य हे केवळ त्या लाटेतून आलेले नसून नवे पंतप्रधान राजीव गांधी यांच्याबद्दल एक प्रकारचा आशावाद मध्यमवर्गातही निर्माण झाला होता. सहानुभूती लाट+राजीवबद्दलचा आशावाद यामधून हे विक्रमी मतदान इंदिरा गांधींच्या पक्षाला झाले आहे.

मतदानाच्या दिवशी पर्वती मतदारसंघात हिंडत असता एक झोपडपट्टीत राहणारी महिला मतदारयादीत आपले नाव २ तास शोधत होती, तरीही तिचे नाव सापडले नाही. तेव्हा काहीशा व्यथेने ती महिला म्हणाली, 'देशासाठी बाई गेली, तिला मत द्यायला पाहिजे!' ही भावना या मतदारांची, तर राजीव गांधींचे भाषण ऐकून प्रभावित होणारा मध्यमवर्गातील फार मोठा मतदार-वर्ग, या दोघांनीही आपला कौल इंदिरा पक्षाच्या बाजूने दिला. सुशिक्षित वर्गात तर राजीव गांधींबद्दल आशावादाची लाटच उसळली होती. लोकप्रियतेचे वलय निर्माण होण्यासाठी नेत्याला आपल्याइथे जास्त कष्ट घ्यावे लागत नाहीत याचे हे निदर्शक होय. त्यामुळेच 'राजीव तरुण आहे', 'देश-स्थितीत आता आमूलाग्र परिवर्तन होईल', 'भारतात नवे विज्ञानयुग अवतरेल' अशा प्रतिक्रिया ऐकायला मिळत होत्या. अर्थात हे लोक इं. कॉं. राजवटीचेही तात्त्विक समर्थन करण्याचा जो हास्यास्पद प्रयत्न करत होते त्यापेक्षा अशिक्षित मतदारांची 'सहानुभूती' जास्त प्रामाणिक वाटली.

एकंदरीत, राजीव गांधींवर फार मोठ्या अपेक्षांचे ओझे भारतीय मतदारांनी टाकले आहे तर विरोधी पक्षांची कधी नव्हती एवढी दारूण स्थिती या निवडणुकीत झाली आहे. या पुढील काळात देशाच्या राज्यकार-भारात लोकसभेचे स्थान काय राहील हे स्पष्ट आहे. इंदिरा पक्षातील खासदारांचे महत्त्वही फारसे राहणार नाही. (अर्थात पूर्वीही ते फारसे नव्हतेच!) एकीकडे लोकांच्या भावना तीव्र आहेत तर त्याच वेळी राजीव गांधींच्या कारकिर्दीत राजकारणाचे व्याव-सायिकीकरणही मोठ्या प्रमाणावर चालू आहे. सत्ता, सवलती आणि संपत्तीचे साधन म्हणून इंदिरा पक्षाकडे पाहिले जात आहे.

इं. कॉं. राजवटीची फार मोठी झळ बस-लेले पंजाब आणि आसाममधील लोक आपले मत नोंदवू शकले नाहीत, ह्याचीही जाणीव या विजयाच्या जल्लोषात ठेवली पाहिजे. पाशवी बहुमत मिळाले म्हणून पंजाबमधील अकाली, शीख आणि आसामचे आंदोलक यांना दडपण्याचा प्रयत्न केला तर देशाच्या एकात्मतेच्या प्रश्नावर मते मागणारा पक्षच विघटनाला कारणीभूत होईल.

सतवंतसिंग आणि बेअंतसिंगने लोकशाही भारताला अनेक वर्षे मागे नेले आणि घराणे-शाहीची मनोवृत्ती आणखी प्रबळ झाली. इंदिरा पक्षाच्या खासदारांनाही एखाद्या 'बॉसची' गरज असतेच त्याप्रमाणे त्यांना राजीव गांधींच्या रूपाने तो मिळाला. □

## 'बदला' संस्कृतीचे भव्य यश

—वि. ग. कानिटकर

इंदिरा गांधींची हत्या होऊन पुरते चोवीस तासही उलटलेले नव्हते. इंदिराजींचा मृतदेह अंत्यदर्शनासाठी ठेवलेला होता आणि दूरदर्शनच्या पडद्यावर दर्शनासाठी लागलेल्या हजारो तरुणांच्या लांबचलांब रांगा दाख-विण्यात येत होत्या. एकही शीख त्यात औषधालाही दिसत नव्हता आणि अंत्य-दर्शनासाठी बेहोषपणे पुढे घुसणाऱ्या तरुण मंडळींच्या चेहऱ्यावर नशा होती ती सूडाची. मध्येच आरोळी उठत होती— 'खूनका बदला खूनसे लेंगे...' आरोळी स्पष्ट होती. एक नवी झिंग वातावरणात मिसळत होती.

दोन अतिरेकी शीख तरुणांनी इंदिराजींची हत्या केली होती. आता याचा बदला घेतला जाणार होता. बदला घ्यायचा म्हणजे काय करणार होते हे तरुण? दिल्लीतल्या निरप-राध शिखांची हत्या त्याला अभिप्रेत आहे का? किती निरपराध मारले की बदला पुरा होणार होता? अनेक निरपराध हिंदू अतिरेक्यांनी पंजाबात मारले होते, तरी आतापर्यंत हिंदूंनी प्रतिक्रिया व्यक्त केली नव्हती. मग आताच हा बदला घेण्याचा पवित्रा का उसळत होता? इंदिराजींच्या भीषण हत्येचे हे हिंदू अतिरेकी एक नवे अपत्य होते का?

मृत्यूनंतर दोन दिवसांनी, इंदिराजींच्या चितेच्या ज्वाळा उफाळत असतानाच दिल्ली-तल्या शिखांच्या संहाराच्या हकिगतींनी, भारताचे राजकीय क्षितिज काळवंडत चालले होते. अखेर हिंदू अतिरेक्याचा जन्मसोहळा पार पडला होता. त्यांनी आपला तथाकथित बदला घेतला होता. निःसंदिग्धपणे पत्र-कारांनी माहिती पुरवली होती की, बदला घेणाऱ्यात इंदिरा कॉंग्रेसचे कार्यकर्ते अग्र-भागी होते!

निवडणुका जाहीर झाल्या. दिल्लीतील हत्याकांडाबद्दल अगदी सुबुद्ध म्हणवणाऱ्यांशी बोलतानाही असा अनुभव येई की, अनेक-जणांना— 'झाले हे ठीकच झाले—शिखांनी पंजाबात निरपराध हिंदू मारले त्याचा निषेध कधी दिल्लीतल्या शिखांनी केला का?' वगैरे युक्तिवाद सहज सुचतो हे लक्षात येत होते.

आधीच भारतीय संस्कृतीत मातेचे अस-लेले ओतप्रोत गुणगान, पोरक्या झालेल्या राजीवचा सतत दहा—बारा तास दूरदर्शनवर दाखवला गेलेला 'भावडा' चेहरा आणि इंदिरा कॉंग्रेसच्या परिवारात नव्याने जन्माला आलेला हिंदू अतिरेकीवाद, या सर्वांच्या समन्वयापोटी, आतापर्यंत हिंदूहिताच्या राजकीय पवित्र्यासाठी इतर पक्षांकडे आशाळभूतपणे पाहणारा बहुसंख्य हिंदू मतदार हा कॉंग्रेसलाच आपली मानणार, हे स्पष्ट दिसू लागले होते. फाळणीच्या पूर्वकाळात अनेक विचारी, समतोल वृत्तीचे मुसलमान पुढारी हयात असतानाही, सर्व मुसलमानांनी सुडाची भाषा बोलणाऱ्या धर्मांध मुस्लिम लीग व महम्मद अली जिना

यांनाच आपले मानले, तोच प्रकार यावेळी घडणार होता. हिंदू अतिरेक्यांनाही आपले म्हणणारी आणि हिंदूहिताचेच तथाकथित राजकारण पुढे रेटणारी 'इंदिरा काँग्रेस' ही सर्व हिंदूंनी सध्या आपली मानली आहे. ख्रिस्ती बांधवांनी काँग्रेसला कधीच दूर लोटलेली नाही आणि जिथे मुस्लिम लीगच्या तिकिटावर मुसलमान निवडून येण्याची सुतराम शक्यता नसते, त्या त्या ठिकाणी मुसलमानांनी काँग्रेसलाच मते दिलेली आहेत. आणि याचे कारण जिथे (केरळात) मुस्लिम लीगच्या तिकिटावर मुसलमान निवडून येतो, तिथे काँग्रेसने मुस्लिम लीगशी साटेलोटे करण्यात गैर मानले नाही !

परिणामी ८ व्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी अतिबहुसंख्येने राजीव काँग्रेसची तुफानी लाट निर्माण केली. याचाच अन्वयार्थ राजकीय पंडित असा लावतात की, मतदारांनी यावेळी जातीकडे पाहिले नाही, धर्माकडे पाहिले नाही ! १९ डिसेंबरपर्यंत मला काँग्रेसला ३०० ते ३२० जागा मिळतील असे वाटले होते. २३-२४ तारखेपर्यंत माझा अंदाज ३६०-७० पर्यंत चढत गेला.

आश्चर्य वाटते ते वृत्तपत्रांचे. एखाद दुसरा अपवाद वगळता, बहुतेक वृत्तपत्रे ही काँग्रेसविरोधी आहेत. प्रत्येकाच्या रागाची जात निराळी असली, तरी राजीव गांधींना अपयश देण्यासाठी सर्वांची अहमहमिका होती. विद्वत्तापूर्ण, व्यासंगपूर्ण अग्रलेख येत होते. असे असूनही जे घडले ते पाहिले की, मनात विचार येतो- वृत्तपत्रे ही खरोखर आज शक्ती उरली तरी आहे का ? त्यांचा लोकमतावर परिणाम होतो का ? की सर्व वृत्तपत्रे ही अत्याचारांची आणि बलात्कारांची सचित्र माहिती देऊन, जाहिरातींच्या उत्पन्नातून झटपट पत्रकार बनलेल्यांना भरपूर प्रसिद्धी देणारी केवळ माध्यमे झाली आहेत ? का दूरदर्शन या एकाच माध्यमाने सर्व वृत्तपत्रांचा संपूर्ण पराभव केला आहे ? इंदिराजींच्या हत्येनंतर मनेका गांधींनी 'संडे ऑब्झर्वर'च्या मुलाखतीत भाबडेपणानं विचारलं, 'दिल्लीत काँग्रेसी गुंड शिखांची हत्या करीत असताना राजीव गांधी, ८-९ तास टी. व्ही. कॅमेन्यापुढे उभे राहून काय करीत होते ?' मनेका तरुण पिढीची असून तिला जे समजले नाही, ते राजीव गांधींना समजले होते. ते तेव्हाही मते गोळा करीत होते.

बदला संस्कृतीचे हे यश दैदिप्यमान आहे यात शंकाच नाही; पण यातच भविष्यातील शोकांतिकांच्या छाया दडलेल्या आहेत. या निवडणुकीत देशासाठी त्याग केलेली, आयुष्य प्रदान केलेली माणसे मातीमोल झाली आहेत. देशातील आदरणीय वृद्ध व्यक्तींचे अशा मंडळींना लाभलेले शुभाशिर्वाद कस्पटासमान ठरले आहेत. एकूण देशभक्ती हा राजकारणाचा वारसाच या निवडणुकीत उखडला गेला आहे. राजकीय पंडित याचाच अर्थ असा लावतात की, आता नवी पिढी पुढे आली आहे, ती स्वातंत्र्याच्या आगमनानंतर जन्मलेली आहे. त्यामुळे असे घडणे अपरिहार्य आहे ! पिढ्या बदलल्या तरी काही समाजमूल्ये चिरंतन तरुणच असावी लागतात, हे कुणी लक्षात घेऊ इच्छित नाही असे दिसते. डॉक्टर जॉन्सनने म्हटले आहे, 'In a civilised society personal merit will not serve you so much as money will. Go into the street and give one man a lecture on morality and another a shilling, See which will respect you most' खरं आहे ! आपण आता खऱ्या अर्थाने 'सिव्हिलाईज्ड' झालो आहोत. लाखो रुपयाचा 'इन्कमटॅक्स' चुकवलेला सिनेनट आता सिनेमाच्या डबक्यातून सरळ राजकारणाच्या गंगेत उतरून निर्मळ होऊ शकेल. निरपराधांची हत्या केलेला खुनी, 'बदला घेणारा तरुण' खासदार म्हणून संसदेत डौलाने प्रवेश करू शकेल. व्यक्तिगत सद्गुण वा देशप्रेम आता कुणाच्या उपयोगी पडणार नाहीत. किमान पंचवीस ते तीस लाख रुपये खर्च करण्याची ऐपत ज्याला नाही, त्याने राजकारणात फक्त पडण्यासाठीच यावे असा इशाराही आता मिळालेला आहे. हे पैसे कसेही निर्माण करा; सिमेंट, साखर, चहा कशाचाही काळाबाजार करा. प्रचंड बहुमत लाभलेले तरुण नेतृत्व आल्याने आता सर्वत्र बोकाळलेला भ्रष्टाचार संपुष्टात येईल अशी आशा भोळे आणि लफंगे तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. म्हणजे भ्रष्टाचार नष्ट करायला काय ३/४ बहुमत लागते ? साध्या बहुमताचे सरकार याबाबत काही करू शकत नव्हते ? जी सर्व निवडणूक हजारो कोटी रुपयांच्या काळ्या पैशावर लढवली गेली, त्याचा फायदा मिळवून निवडून आलेले, ज्या झाडावर ते बसले आहेत तीच फांदी तोडतील ? पैशाला आता 'काळा' व 'गोरा' कसलाच रंग नाही. त्याला रंग आहे तो राजकारणाचा !

भ्रष्टाचाराचा राक्षस मारणे सध्याच्या भारताच्या अवस्थेत परमेश्वरालाही शक्य दिसत नाही. त्यासाठी लाख-दीडलाख लोकांच्या किमान कत्तली कराव्या लागतील आणि त्याची जबाबदारी मंत्र्यांना घ्यावी लागेल. ते शक्य दिसत नाही. निदान पंजाब-आसाम प्रश्नांचे बाटलीत बंद केलेले सैतान पुढच्या ५ वर्षात शांत झाले तरी पुष्कळ झाले. पाच वर्षांनी 'टाय लावलेले' नवे राजकीय पंडित राजीवना भ्रष्टाचार बंद करणे का जमले नाही याचीही साधार चर्चा करून सुसूत्र कारणे सादर करतीलच !

विरोधी पक्षांपैकी भा. ज. प., शिवसेना यांना निराश होणेही जमणार नाही. कारण अतिरेकी हिंदू राष्ट्रवादाचा वापर करून, शिवाय अल्पसंख्याकांना चुचकारून जर राजीवच सर्व करणार असेल तर इतर पक्ष संपले तरी वाईट वाटण्याचे कारण नाही. शेवटी, राज्य करण्यात त्यांना रस नसेल; पण राज्य कसे चालते यातच जर त्यांना रस असेल आणि राजीवच्या नेतृत्वाखाली हिंदूहिताचे राजकारण सुरू झाले तर त्यांच्या दृष्टीने फारसे बिघडणार नाही.

प्रश्न बिकट आहे जनता पक्षाचा-म्हणजे पूर्वाश्रमीच्या समाजवाद्यांचा ! सर्व विरोधी पक्ष एकत्र आले नाही म्हणून पराभव झाला हे त्यांनी मनातून काढून टाकावे. एक तर मतदान बोलके आहे. शिवाय भाजप व समाजवादी मंडळी कधी एकमेकात विलीन होतील हे अशक्य आहे, ही गोष्ट लक्षात घेतलेली बरी. भाजप आणि काँग्रेस या दोन राजकीय संस्कृतीच वेगळ्या आहेत. समाजवादी, स. काँग्रेस, शेकाप, डावे कम्युनिस्ट, उजवे कम्युनिस्ट या सगळ्यांचा भाजपला विरोधच राहणार. भाजपखेरीज बाकीचे सगळे हे एकाच आईची अपत्ये आहेत. काँग्रेसच्या पोटातूनच एक-एक बाहेर पडले आहेत.

भाजप व जनता पक्षाच्या अध्यक्षांनी अजून 'पराभवाची संपूर्ण जबाबदारी' स्वीकारून राजीनामा देण्याचे नाटक केलेले नाही. बहुधा हे नाटक या वेळी होणार नाही. कारण दोन्ही पक्ष निरनिराळ्या कारणांनी पूर्ण राजकारणातून उठलेच आहेत. त्यांच्यावर तूर्त कसलीच जबाबदारी नाही.

अगदी मार्क्सवादी कम्युनिस्ट झाले तरी शेवटी ते भारतातले कम्युनिस्ट आहेत ! डांगे, कन्येसह आज विलय पावले तर काही वर्षात डावे कम्युनिस्ट विलय पावतील. आतापर्यंत भारतात दोन डावी राज्ये होती. आता केरळचा नकाशा पालटला तर बंगालचे राज्य राजीव लाटेने अर्धमेले केले आहे. तेव्हा डोळे अजून मिटले नसतील, तर 'आता डोळे विधानसभा निवडणुकीवर !' शुभास्ते पंथान: ! □

राजधानी दिल्ली

# उत्साहवर्धक ' हेल्दी ' थंडी

तसा हिवाळा दिल्लीकरांचा आवडता ऋतू. उन्हाळ्याच्या भट्टीत जीव हैराण झाल्यावर कडाक्याचा हिवाळासुद्धा परवडेल असे वाटू लागते. सध्या दिल्लीत थंडी 'सेट' होऊ लागली आहे. नोव्हेंबर महिन्यात सुखद गारवा घेऊन आलेला हिवाळा डिसेंबरात तीव्र बनू लागतो. नाताळनंतर तो तीव्रतर रूप धारण करतो. सुमारे पंधरा-वीस दिवस किमान तपमान ४ ते ८ डिग्री सें. ग्रेडच्या दरम्यान असते.

डिसेंबरात दिवसभर दोन स्वेटर्स अंगात पुरतात. त्यावर शाल किंवा कोट नाही याची संध्याकाळी जाणीव होऊ लागते. अशाच एका संध्याकाळी आम्ही युनिव्हर्सिटीत संध्याकाळी ६ वाजेपर्यंत काम करीत बसलो होतो. कामाच्या नादात चहाचेही भान उरले नव्हते. सर्वत्र अंधारून आलेले. युनिव्हर्सिटीच्या आत आणि रस्त्यावर दिवे लागण झाली होती. घरी जाता जाता स्टॉलवरच चहा घ्यावा असा विचार करून निघालो. हवेतला गारठा वाढत चालला होता. स्टॉलभोवती अनेक विद्यार्थी आणि प्राध्यापक गरम गरम पदार्थ खाण्यात आणि चहा-कॉफी पिण्यात मश्गुल झाली होती. इथले खाण्याचे पदार्थ महाराष्ट्रातल्या वड्यांचे किंवा कचोरीचे समाधान देत नाहीत. तरीही वेळेला काही तरी खावे या हेतूने स्टॉलवरच्या ट्रेमध्ये मी उत्सुकतेने पाहिले. वडे, ब्रेड-वडे, पॅटीस, सामोसे हे नेहमीचेच पदार्थ त्या चार ठिकाणी जोड लावलेल्या साध्या पत्र्याच्या ट्रेमध्ये ठेवलेले होते. कुणाची ऑर्डर आली की, स्टॉलचा मालक ते पदार्थ पुन्हा तळून गरम गरम देण्यासाठी तळणाऱ्याकडे पाठवीत असे. ते तळून आलेले गरम पदार्थ तत्परतेने बशांमध्ये भरून सोबत आंबट गोड सॉस दुसऱ्या बशीतून देत असे. कॉफीची ऑर्डर आली की, मशीन सुरू करून गरमागरम एस्प्रेसो कॉफी साध्या मग्जमधून देत असे. लोकही मोठ्या आवडीने खात पीत होते. बाहेरचा वाढता गारठा आणि मोठ्या तत्परतेने गरमागरम पदार्थ लोकांना देणारा स्टॉलचा मालक नि ते मजेत गप्पा मारीत खाणारे लोक पाहून मलाही त्या ट्रेमधले काहीतरी खावे असे वाटले. आता त्या जुन्या पत्र्याच्या ट्रेमधले पदार्थही भूक प्रज्वलित करू लागले. त्याने दोन बशांमधून दिलेले गरम गरम पॅटीस त्यावेळी तरी रुचकर लागले.

असे स्टॉलवर किंवा ढाब्यावर खाण्यापिण्यात कॅंटीन किंवा हॉटेलपेक्षा निम्मे पैसे लागतात. कारण तिथे बसून खायला खुर्च्या-टेबले नसतात. मात्र आपण जवळपास हिरवळीवर कुठेही बसून खाऊ शकतो. 'सर्व्हिस' साधी असते पण पदार्थांची चव काही बदलत नाही.

तशी उत्तरेकडील लोकांना चवीची आस्था कमीच. वेळेला खाणे हे यांचे धोरण. त्यामुळे कसलेही पदार्थ भुकेच्या वेळेला मिळाले की, हे मनसोक्त, पोटभर खातील. यांच्या धिप्पाड शरीरयष्टीचे रहस्य यातच असावे असे मला वाटते.

हिवाळ्यातल्या मनस्वी थंडीत आपल्या हातगाडीवरच अनेक गरम गरम पदार्थ करून देऊन लोकांची क्षुधा आणि शौक भागविणारे छोटे धंदेवाईक तर इथे चांगलाच धंदा करीत असतात. आलू-टिक्की, इमृती-जिलेबी, गुलाबजाम, गाजरहलवा आणि आम्लेट-ब्रेड नि उकडलेली अंडी हे पदार्थ हातगाडीवरच्या स्टोव्हवर गरम गरम तयार केले जातात. लोक तिथेच उभे राहून ते पदार्थ खातात. यात सामान्य मजुरापासून गाडीतून आलेल्या उच्चवर्गीय श्रीमंतांपर्यंत सर्व थरातील लोक असतात.

दिवसभराच्या कामातून बाहेर पडल्यावर एका संध्याकाळी चांदणी-चौकातल्या एका हातगाडीवर आम्लेट-ब्रेड खाण्याचे धाडस मीही करून पाहिले. वेळेला खाणे ह्या येथील लोकांच्या वृत्तीने आम्ही अशाच एका गारठलेल्या संध्याकाळी त्या हातगाडीवाल्यापाशी गेलो. त्या हातगाडीवरच एका कोपऱ्यात त्याने स्टोव्ह ठेवला होता. स्टोव्हवरील पातेलीत दीड-दोन डझन अंडी उकडली जात होती. बाकी सबंध गाडीवर अंड्याचे आणि ब्रिटानिया किंवा मॉडर्न ब्रेडचे मिळून १०-१२ क्रेट्स ठेवलेले होते. जवळच 'अमूल' बटरची पॅकेट्स होती. अंडी ब्राऊन आणि पांढरी दोन्ही प्रकारची होती. सर्व साहित्य उत्तम प्रतीचं होतं. आम्ही आम्लेट-ब्रेडची ऑर्डर दिली. लगेच एका पातेलीत त्याने बारीक चिरून तयार ठेवलेला कांदा आणि मिरचीचे तुकडे टाकले. त्यात प्रत्येकी दोन दोन अंडी फोडून टाकली. 'एग्-बिटर'ने ते मिश्रण एकजीव केले. तव्यात अमूल बटर प्रत्येकी २५-२५ ग्रॅम टाकून आम्लेटस् तयार केली. ब्रेडच्या दोन स्लाईसमध्ये आम्लेट ठेवून बशांमध्ये एक एक काटा दिला. ते खाल्ल्यानंतर भुकेल्या आणि दमलेल्या जीवाला एकदम चैतन्याचा साक्षात्कार झाला. एरवी इतक्या वर्दळीच्या रस्त्याच्या कडेला उभं राहून खाणे ही कल्पनाही मनाला पटली नसती. परंतु इथले लोक कुठेही कसेही पदार्थ कसे दणकून खातात आणि मस्त मजेत राहतात याचे रहस्य त्या दिवशी समजले.

हिवाळ्यात लोकरीचे कपडे आणि रजया यांची मोठी व्यापारी उलाढाल दिल्लीत होत असते. नोव्हेंबर ते मार्चपर्यंत थंडीच्या चढत्या उतरत्या क्रमाने स्वेटर्स अंगात चढत जातात. छोट्या मुलांच्या बाबा-सूटसपासून हाफ स्वेटर्स, फूल स्वेटर्स, पुलओव्हर्स, जर्सी, शाली, ओव्हर कोटस्, नाइट गाऊन्स वगैरे नानाविध प्रकार फुटपाथपासून अलिशान दुकानांपर्यंत सर्वत्र पहायला मिळतात. कॅश्मिलॉनचे हाफ स्वेटर्स किंवा ब्लाऊज हे २० रुपयांपासून मिळू शकतात. स्त्रियांचे कार्डिगन्सही ४० रुपयांपासून १२५ रुपयांपर्यंत आणि मुलांचे किंवा पुरुषांचे फुलओव्हर्सही ३५ रुपयांपासून २५० रुपयांपर्यंत मिळू शकतात. अर्थातच लोकर किंवा ॲक्रिलिकच्या धाग्यावर किंमतीतील फरक अवलंबून असतो.

दिल्लीची थंडी रात्री रजयांशिवाय भागत नाही. ऐन थंडीत दोन चादरी आणि एक ब्लॅंकेट अंगावर घेतले तरी अंगावर काहीच नसल्यासारखे वाटते. आत कापूस भरलेली एखादीच रजई मात्र अशा थंडीत भरपूर ऊब देते. त्यामुळे रजयांची खरेदी, जुन्या रजयांतील कापूस पिंजून त्या नवीन करणे हा उद्योग इथं नोव्हेंबरातच सुरू होतो. दोन रजया नव्याने करून घेण्यासाठी मीही रजईच्या एका दुकानात गेले होते. दुकानाच्या पुढ्यात फुटपाथवर बनवलेल्या रजयांची चवड ठेवलेली होती. दुकानात रजयांच्या

खोळी आणि कव्हर्स विक्रीसाठी ठेवलेले होते. कडेला दुकानाबाहेर कापसाची क्विंटलस्ची अनेक पोती रचून ठेवलेली दिसत होती. एक मोठा तराजू झाडाला टांगलेला होता. शेजारीच कापूस पिंजण्याचा विभाग होता आणि रस्त्यावर पोती टाकून त्यावर रजया शिवत बसलेले १०–१२ कामगार होते. ५ वर्षांपूर्वी ७ रु. किलो दराचा कापूस आता १६ रु. किलो झाला होता. ३० रुपयांच्या खोळीची किंमत आता ५५ ते ६० रुपये झाली होती. अधिक भारी कापडांच्या किंवा मखमलीच्या खोळी १०० ते २०० रुपये किंमतीच्या होत्या. त्यावरून पुन्हा ३०–४० रुपयांचा पांढऱ्या कापडाचा खोळरूप अभ्रा असतोच. त्यामुळे मध्यम प्रतीच्या परंतु मजवूत कापडाच्या खोळींना इथे मागणी जास्त. प्रत्येक रजई ३ किंवा ४ किलोची असते. १०–१५ मिनिटात मशीनवर कापूस पिंजून तो खोळीत भरतात. त्यानंतर कामगार ते आपल्या विविध प्रकारच्या टाक्यांनी आणि दिविध रचनांनी शिवून अर्ध्या तासात तयार करतात. शिवणाच्या ढोबळ रचनेपासून जवळजवळ टाके घातलेल्या सुबक रचनेनुसार प्रत्येक रजईची शिवणावळ कमी जास्त असते. ७ रुपयांपासून १६ रुपयांपर्यंतचे विविध शिवणप्रकार यात दिसून येतात. मधल्या बोटात चामड्याचे अंगुस्तान घालून हे कामगार सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत रजया शिवण्याचे काम करीत असतात. त्या त्या रजईतील शिवणरचनेनुसार असलेली संपूर्ण शिवणावळ त्या कामगारांना दिली जाते.

अंगात नुसतेच गंजिफ्रॉक किंवा एखादे हाफ स्वेटर घालून आनंदी वृत्तीने हे कामगार रजया शिवीत बसले होते. माझ्या रजईच्या खोळीत कापूस भरून ती ज्या कामगाराकडे दिली, तो गाणी गात रजई शिवत होता मधूनच त्या रजईशी संभाषण करीत होता. 'बहुत रूई खायी तूने, अब मैं तेरा मुँहही बंद करता हूँ' असे म्हणत त्या रजईचे तोंड शिवत होता. मला त्याची मोठी गंमत वाटली. सहजच मी त्याला विचारले 'तुम्हे कितने पैसे मिलते हैं?' 'जितने सिलवानेके होते हैं, सब हमकोंही मिलते हैं जी।' म्हणजे अर्ध्या तासाला एक रजई या हिशोबाने हा सीझनमध्ये दिवसाकाठी १००–१५० रुपये सहज कमवतो.

उन्हाळ्यात उसाचा रस किंवा फळांचा रस विकणारी छोटी दुकाने हिवाळ्यात मच्छी, मुर्गी, तंदुरी भाजून देणारी दुकाने बनतात. मसाला लावून टांगलेल्या कोंबड्या आणि मासे भट्टीतल्या गरम तंदुरीबरोवर तळून विकणारे धंदेवाईकही ठिकठिकाणी असतातच. किंबहुना रस्त्याच्या कडेला चार–पाच क्रेट भरून अंडी घेऊन बसलेला आणि स्टोव्हवर पातेलीत ती उकडून मसाला लावून देणारा विक्रेताही इथे जागोजाग आढळतो.

खाणे, पिणे आणि मस्त मजेत राहणे यासाठी दिल्लीकरांना हिवाळा फार आवडतो, लोकही चांगलेच खवैये आणि मस्तीत जीवन जगणारे. भरपूर कष्ट करणे, भरपूर कमवणे आणि मस्तीत जगणे हे दिल्लीतल्या किंबहुना उत्तरेकडील बहुतांशी लोकांमध्ये आढळणारा गुण फार कौतुकास्पद वाटतो. थंडी पडली म्हणून घराच्या चार भिंतीत स्वतःला कोंडून काकडलेली माणसे इथे अभावानेच आढळतात. ऋतूत बदल होत असताना तो इथे थोडा त्रासदायक वाटला तरी एकदा थंडी 'सेट' झाली की ती तब्येतीला चांगलीच मानवते. जानेवारीत हाडाच्या आतपर्यंत शिरत जाणारी थंडी आणि संपूर्ण दिल्लीचेच एक फ्रीज बनवून टाकणारी इथली थंडी तीव्रतर असली तरी 'हेल्दी' असते, उत्साहवर्धक असते.

—ललिता मिरजकर

# एसीसीने बोनस शेअर रद्द का केला?

स्वराज पॉल यांनी निर्माण केलेला फुगा मुंबई हायकोर्टाने नुकताच फोडला व त्यामुळे वित्तीय संस्थांच्या कारभाराचा एक नमुना जनतेपुढे पेश झाला. वित्तीय संस्था, त्यांचा कारभार हा त्यांच्या आर्थिक ताकदीशी समरूप आहे. बहुतेक मोठ्या उद्योगात भांडवलाचा महत्त्वाचा हिस्सा हा वित्तीय संस्थांकडे आहे. त्यामुळे बहुतेक उद्योगसमूहांवर त्यांचे नियंत्रण येऊ शकते. आर्थिक नाड्या हातात असल्याने आर्थिक सत्ता गाजविण्याची खुमखुमीही त्यांच्यात जागी होताना दिसते.

घटना साधी आहे...पण धक्कादायक. एसीसी म्हणजे 'असोसिएटेड सिमेंट कंपनीज् लिमिटेड', ही भारतातील सिमेंट उत्पादन करणाऱ्यांपैकी एक अग्रगण्य नि प्रचंड कंपनी. या उद्योगसंस्थेने आपल्या भागधारकांना बोनस शेअर्स देण्यासंबंधी विचार करण्यासाठी संचालक मंडळाची बैठक बोलावली. २६ सप्टेंबरला ही घोषणा केली व संचालकांची बैठक बोलावली २२ ऑक्टोबरला. त्यामुळे अर्थातच या उद्योग समूहाच्या शेअरचा भाव कडाडला. ११ ऑक्टोबर रोजी १०० रु.च्या शेअरचा भाव ४६७ झाला. शेअरचा एवढा भाव हा गेल्या अनेक वर्षांतील सर्वोच्च ठरला; पण याच सुमारास एक अफवा उठली की, एसीसीने बोनस शेअर्स इश्यू रद्द केला! पण १०० कोटींच्यावर रिझर्वस् असणाऱ्या एसीसीसंबंधी अशी अफवा उठवणं तसं हास्यास्पदच होतं.

पण काय आश्चर्य, ही अफवा २२ ऑक्टोबर रोजी अनेकांच्या दृष्टीनं कटू सत्य ठरली. संचालकांच्या बैठकीच्या आधी एक तास IDBI (इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया) यांच्याकडून बोनस शेअर्स इश्यू पुढे ढकलण्याची सूचना आली. IDBI, UTI (युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया) व तत्सम वित्तीय संस्थांचे ACC मध्ये ४०% भागभांडवल आहे व करारानुसार, उद्योगसमूहाला या वित्तीय संस्थांची परवानगी घेतल्याखेरीज बोनस शेअर देता येत नव्हता व त्यामुळे त्यांनी बोनस शेअर्स इश्यू रद्द केला. मग काय, मुंबई स्टॉक एक्सचेंजच्या तिसऱ्या मजल्यावर एकच हलकल्लोळ उडाला. एकंदरीतच एसीसी संबंधित असणाऱ्या सर्वांनी त्या दिवशी कंपनीचे अध्यक्ष श्री. नानी पालखीवाला व IDBI यांच्या नावानं बोटं मोडली. याच दिवशी शेअरचा भाव ७८ रुपयांनी एकदम घसरला. यात मुंबई स्टॉक एक्सचेंजचे काही दलाल धंदा-

तून कायमचे उठले. सुमारे १० कोटी रुपयांचा फटका स्टॉक ब्रोकरना या निर्णयामुळे बसला.

शेअर बाजारातील चढ-उतार हे नेहमी-चेच असतात; परंतु एखाद्या अवसानघातकी निर्णयामुळे हा फटका बसला व त्यामुळे या निर्णयावर फार कडवट प्रतिक्रिया व्यक्त केल्या गेल्या.

IDBI ने फायद्यात घट झाली म्हणून बोनस शेअर रद्द करण्याची सूचना दिली असे सांगण्यात येते. २६ सप्टेंबर ते २२ ऑक्टोबर या पंचवीस-सव्वीस दिवसात IDBI चे अधिकारी काय करीत होते? त्यांनी लगेचच सूचना पाठवली असती तर ही परिस्थिती निर्माण झालीच नसती आणि एसीसीच्या वरिष्ठांना यासंबंधीची परवानगी आधी मागायला काय झाले होते? परंतु प्रश्न एवढा सोपा असेल असे वाटत नाही. वित्तीय संस्था काय किंवा उद्योजक काय, केवळ हलगर्जीपणापायी असा निर्णय घेण्याची वेळ येऊ देतील असं वाटत नाही. कारण आता या प्रकरणात नवनवीन धागेदोरे सापडू लागले आहेत. त्यामुळे या प्रकरणाला वेगळेच वळण मिळत आहे.

गोपाळ कृष्ण राठी हे एक परदेशस्थ भारतीय व एसीसीच्या उपाध्यक्षांचे चांगले मित्र; परंतु वदूदखान या एसीसीच्या उपाध्यक्षांच्या मते ते त्यांच्या फक्त ओळखीचे आहेत. तर या राठींनी म्हणे, जून ते ऑक्टोबर ८४ या काळात लाखभर शेअर तीनशे ते साडेचारशे रुपयांच्या दरम्यान सतत घेतले. युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया या वित्तीय संस्थेने राठी यांना शेअरची खरेदी स्वस्त व भरपूर करता यावी याकरता मदत केली असा त्यांच्यावर आरोप केला जातोय. कारण राठी यांनी जेव्हा जेव्हा शेअर विकले व खरिदले त्याच सुमारास UTI ने शेअर्स खरिदले व विकले. एवढेच काय UTI ने जुलैमध्ये ४०,००० शेअर्स विकून ACC चा भाव कृत्रिमरीत्या खाली आणला व त्यामुळे राठी यांची खरेदी स्वस्त झाली व राठी यांनी भरपूर वाटा उचलल्यावर UTI ने सप्टेंबरमध्ये अठ्ठावन्न हजार शेअर विकत घेतले व त्यामुळे एसीसीचा भाव वाढून पुन्हा मूळ पदावर पोहोचला. UTI ने केलेल्या या खरेदी-विक्रीची कारणे अज्ञात असल्याने त्यांच्यावर हा आरोप केला जातोय.

एसीसीच्या एकूण ३३ लाख शेअर्सपैकी १० टक्के शेअर्स जमवून कंपनीला गोत्यात आणण्याचा डाव असावा. पलोन्जी मिस्त्री या एका संचालकाकडे बरेच भागभांडवल असल्याने काहीजण त्यांचा या डावाशी संबंध लावत आहेत. गोपाळ कृष्ण राठी यांनी सुरू केलेल्या अथवा त्यांच्यातर्फे सुरू करवण्यात आलेल्या शेअर खरेदीवर नियंत्रण राहावे याकरता बोनस शेअर इश्यू रद्द केला असं काहींचं मत आहे व या परिस्थितीत त्यात सत्याचा अंश असावा असे वाटते.

स्वराज पॉल प्रकरणात LIC ने पक्षपाती भूमिका घेतली व बेकायदा व्यवहारांना प्रोत्साहन दिले, तर UTI सारख्या वित्तीय संस्था म्हणजे त्यांचे अधिकारी आपले हितसंबंध जपण्याकरता आर्थिक सत्ता वापरतात. वित्तीय संस्था काही स्वायत्त राहिल्या नाहीत. राजकीय हस्तक्षेप हे नेहमीच होत असतात. राजकीय स्वार्थाकरता या संस्थांद्वारे आर्थिक ताकदीचा वापर केला जातो. वरील घटना ही त्याची साक्ष नाही होऊ शकत?

तर UTI आणि IDBI यांच्या संघर्षातून ACC चा बोनस रद्द झाला. याला कारणीभूतसुद्धा एक परदेशस्थ भारतीय! का, राजकीय क्षेत्रात ज्याप्रमाणे 'परदेशी' हाताचा उपयोग स्वतःवर पांघरूण घालण्याकरता केला जातो त्याप्रमाणे औद्योगिक क्षेत्रात परदेशस्थ भारतीयांचा बागुलबुवा त्याच परंपरेनुसार उभा केला जातोय?

खुर्ची म्हणजे अनेक शक्तींचा समुच्चय, त्यामुळे राजकारणापासून ते औद्योगिक क्षेत्रापर्यंत कोणासही हिचा लोभ नाही असे नाही. मग ती प्राप्त करण्याकरता कराव्या लागणाऱ्या खटपटी... लटपटी त्यातूनच एसीसीसारखी प्रकरणं उद्भवतात.

एखाद्या 'उद्योगसमूहाचे व्यवस्थापन ताब्यात असण्याकरता इच्छुकांच्या खिशात इतरांपेक्षा जास्त भागभांडवल पाहिजे. व ते मिळवण्याच्या प्रयत्नात अनेकदा शेअरचे भाव आकाशाला भिडतात.


या सर्व सत्तास्पर्धेत टिकण्याकरता, इतर हस्तक्षेप टाळले जाणे आवश्यक ठरते. सध्या वित्तीय संस्थात शिरलेले राजकारण पाहून अनेक उद्योगसमूह त्यांना दोन हात दूर ठेऊ पाहतात. वित्तीय संस्थांकडन घेतलेले कर्ज बहुदा भाग भांडवलात रुपांतरित करून फेडले जाते; परंतु आजकाल असे करण्याचे, अनेक उद्योगसमूह टाळत आहेत.

टिस्कोसारख्या प्रथितयश उद्योगाने IDBI कडून घेतलेले कर्ज भागभांडवलात रुपांतरित करण्याचे नाकारले... तर रिलायन्स टेक्स्टाईलसारखा एखादा उद्योगसमूह वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यापेक्षा 'डिबेंचरच्या' रूपाने लोकांकडून कर्ज जमवण्याचा प्रयत्न करतो. आपल्या शेअरचे मूल्य चढते ठेवून हे कर्ज जमवण्यात पूर्णतः यशस्वीसुद्धा होतो व पुढे याच डिबेंचरचे रूपांतर शेअरमध्ये करून कर्ज सुद्धा फेडतो.

हे सर्व यशस्वी होण्याकरिता, शेअरची किंमत चढती राहणे यासारख्या आवश्यक बाबींची पूर्तता करण्याकरता ब्रिटनमधल्या परदेशी भारतीयांकडे मैत्रीचा हात पुढे करण्यास मागे पुढे पाहात नाही आणि हा परदेशस्थ भारतीय त्याचे तेथील उद्योगाचे भांडवल २०० पौंड आहे, तो रिलायन्समध्ये काही कोटी रुपयांची गुंतवणूक करून भाव चढता ठेवतो. कॅपारोसारखा तोटयातला उद्योगसमूह काय किंवा रिलायन्समध्ये गुंतवणूक करणाऱ्या २०० पौंड भांडवल असणार शहा बंधूचा उद्योगसमूह कोटीकोटीची गुंतवणूक करतात हेच त्यांचे वैशिष्टय!

एखादा डिबेंचर इश्यु अपयशी ठरू नये याकरता 'परदेशस्थ भारतीयांचा' मागितलेला हात किंवा त्याचा डमी म्हणून केलेला वापर जसा फायद्याचा, तसा एखादे व्यवस्थापन... उदा– एसीसीचे ताब्यात घेण्याकरता केला गेलेला वापर... त्याला काटशह देण्याची एक नवीन पद्धत एसीसीने येथील व्यावसायिकांना देऊन या क्षेत्रातील राजकारणाचा नवा टप्पा गाठला, अन् भागधारकांना गाढव बनवले, दुसरे काय?

–विनायक गोखले




**मूळ लेखक : जेफ्री आर्चर**

**रूपांतर : विष्णू जयदेव**

**( २ )**

' फर्स्ट अमंग इक्वल्स्' ही आर्चर यांची १९८४ मध्ये प्रसिद्ध झालेली नवी कोरी कादंबरी.

या कादंबरीतील प्रमुख पात्रे चार. चारही हाऊस ऑफ कॉमन्सच सभासद. चार्ल्स सेमूर आणि सायमन कस्लेक कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे तर अँड्र्यू फ्रासर आणि रेमंड गोल्ड लेबर पार्टीचे सभासद.

चार्ल्स हा अर्ल ऑफ ब्रिजवॉटरचा दुसरा मुलगा. त्याचा विवाह त्याच्या सारख्याच उमराव घराण्यातल्या फिओनाशी झालेला.

सायमनचे वडील तो लहान असतानाच वारले. त्यामुळे स्वतःच्या हिंमतीवर सायमनने त्याचे आयुष्य घडवले. अँड्र्यूचे वडील सर डंकन फ्रासर कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे सभासद पण अँड्र्यू मात्र लेबर पार्टीच्या तिकिटावर निवडणूक लढवतो.

रेमंड गोल्ड लीडस्‌मध्ये एका खाटकाच्या कुटुंबात जन्माला आला. आयुष्यातलं सारं यश त्यानं स्वतःच्या प्रयत्नावर मिळवलेलं.

एकोणिसशे चौसष्टच्या सार्वत्रिक निवडणुकीत हे चौघेही हाऊस ऑफ कॉमन्समध्ये निवडून येतात. चौघांचंही आयुष्य वेगवेगळं पण महत्त्वाकांक्षा एकच— पंतप्रधानपद.

या महत्त्वाकांक्षेतून सुरू होते सत्ताशर्यत.

या शर्यतीची सुरुवात होते चौघेही बॅक बेंचर म्हणून सभागृहात दाखल होतात तेव्हा.

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे नेते सर अलेक्‌नी राजीनामा दिला आणि चार्ल्स आणि सायमन प्रतिस्पर्धी म्हणून समोरासमोर उभे राहिले. हीथचा प्रचार चार्ल्सने तर माउडलिंगचा प्रचार सायमनने सुरू केला.

शेवटी १७ मतांनी हीथ निवडून आले आणि माउडलिंग पार्टीचे डेप्यूटी लीडर झाले.

चार्ल्सला एखाद्या महत्त्वाच्या पदाबद्दल आशा वाटायला लागली आणि हीथ असेपर्यंत आपलं भवितव्य धूसर आहे याची सायमनची खात्री पटली.

कादंबरीच्या पहिल्या भागाचे हे चित्र. . .

आता सत्तास्पर्धेचा पुढील भाग. . .

□

# ज्युनिअर ऑफीस

मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर स्कॉटलंड ह्यूग मॅकेंझी यांची मुलगी ॲलिसन आणि अँड्र्यू यांची ओळख झाल्याला आता सहा महिने उलटून गेले होते. लवकरच ती दोघं एंगेजमेंट जाहीर करतील अशी सर्वांचीच अपेक्षा होती. त्यामुळे ॲलिसन आता तिचा स्वतःचा फ्लॅट सोडून अँड्र्यूच्या लंडनमधल्या घरातच रहायला लागली याचे कुणालाच फारसे आश्चर्य वाटले नाही. ह्यूग मॅकेंझीही आपल्या भावी जावयाला लवकरच प्रायव्हेट पार्लमेंटरी सेक्रेटरीसारखे पद बहाल करतील असे लेबर पार्टीच्या सदस्यांनाही वाटत होते; पण अँड्र्यूचा स्वभाव लक्षात घेता सर्व काही सुरळीत पार पडेल अशी खात्री कुणालाच देता आली नसती.

आणि तसेच झाले. ॲलिसन आपल्याशी विवाह करणार याची खात्री पटत चालली तसतसे अँड्र्यूचे तिच्याबद्दलचे आकर्षणही कमी होत गेले. ह्याच वेळेला अँड्र्यूची लुईस फोरसिथशी भेट झाली. लुईसला त्याने अगदी लहानपणी पाहिले होते. लुईस अँड्र्यूप्रमाणेच स्कॉटिश फोरसिथ कुटुंबाची स्कॉटलंडमध्ये डिपार्टमेंटल स्टोअर्स होती. फ्रासर आणि फोरसिथ कुटुंबाची जुनी ओळख. लहानपणी अँड्र्यू लुईसबरोबर हॉकीसुद्धा खेळलेला होता. ह्या मधल्याच काही वर्षांत त्यांची भेट झालेली नव्हती; पण ह्या एवढ्या काळात लुईसमध्ये कमालीचा बदल घडून आलेला होता. आता तिच्याकडे पाहून लहानपणी ही मुलगी जाडजूड असेल अशी शंकाही कुणाला आली नसती.

ॲलिसनच्या वडिलांनी फ्रासर कुटुंबियांना त्यांच्या बूट हाऊस या सरकारी बंगल्यावर जेवायला बोलाविले होते. ह्या जेवणासाठी दोन्ही बाजूकडच्या दोनचार कुटुंबांनाही आमंत्रण होते. ह्या प्रसंगी अँड्र्यू ॲलिसनची आणि त्याची एंगेजमेंट जाहीर करील अशी अपेक्षा होती. सर डंकन फ्रासरनी फोरसिथ कुटुंबियांना बोलाविले होते त्यामुळे लुईस जेवणाला हजर राहिली होती.

प्रथमदर्शनी प्रेम ह्या प्रकारावर अँड्र्यूचा विश्वास नव्हता; पण लुईसला पहाताच ही पार्टी ॲलिसनची व आपली एंगेजमेंट जाहीर करण्यासाठी आहे याचा त्याला पूर्ण विसर पडला. आजूबाजूला इतर लोक असल्याने त्याला लुईसशी बोलायची संधीही मिळाली नाही; पण त्याचे लक्ष मात्र सर्वकाळ तिच्याकडेच होते. इतके की निघताना त्याच्या वडिलांनी त्याला विचारले, 'सोशॅलिस्ट असूनही तू इतका गप्प कसा काय ?'

त्या दिवशी घरी परतेपर्यंत अँड्र्यूचा निर्णय झाला होता. काही झाले तरी लुईसशीच लग्न करायचे त्याने ठरविले. ॲलिसनला नकार दिल्याने आपल्या राजकीय जीवनावर त्याचा परिणाम होईल त्याची त्याला पर्वा वाटत नव्हती.

सकाळी उठल्या उठल्याच त्याने लुईसला फोन केला आणि दुपारी न्यू क्लबला जेवण्याचे निमंत्रण दिले. रात्री पार्टीतच अँड्र्यूचे काही बिनसले आहे अशी लुईसला शंका आली होती. तिची इच्छा नसतानाही त्याच्या आग्रहामुळे तिने आमंत्रण स्विकारले.

सकाळची मतदार संघातली बारीकसारीक कामे आटोपून अँड्र्यू न्यू क्लबला आला. ठरलेल्या वेळेपेक्षा तब्बल वीस मिनिटे आधी तो पोहोचला. लुईसपुढे आता विषय काढायचा कसा हाच त्याच्यापुढे प्रश्न होता. आपल्याला दुसऱ्या कुणाशीच लग्न करायची इच्छा नाही हे तिला पटवून देणे कठीण होते. लुईसपुढे बोलायचे काय ह्या विचाराने तो अधिकच नर्व्हस झाला. एवढ्यातच वेटरने लुईसला अँड्र्यू बसलेल्या टेबलाशी आणून सोडले.

'इट वॉज काइंड ऑफ यू टू कम ॲट सच शॉर्ट नोटीस' अँड्र्यू म्हणाला.


'नो, इट वॉज व्हेरी स्टुपिड ऑफ मी' लुईस म्हणाली.

अँड्र्यूने थोडक्यात तिला आपला निर्णय सांगितला. त्याने इतक्या तडकाफडकी मागणी घातलेली पाहून लुईसला आश्चर्य वाटलं. तिने त्याला सांगितले की तिचे लग्न आधीच ठरले आहे. कॉलेजमधल्या त्याच्या एका जुन्या मित्राबरोबर वर्षभरात तिचा विवाह होणार होता. त्यामुळे दुसऱ्या कुणाचा तिने विचार करण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता; पण इतक्या सहजपणे धीर सोडला तर अँड्र्यू राजकारणात उतरलाच नसता. जेवणाकडे त्याचे लक्षच नव्हते. जेवण संपण्यापूर्वी त्याने लुईसकडून परत एकदा भेटण्याचे कबूल करवून घेतले. ही निवडणूक आपण जिंकू याची अँड्र्यूला खात्री होती.

संध्याकाळी विमान पकडून अँड्र्यू लंडनला परतला. तो फ्लॅटवर आला तेव्हा ॲलिसन त्याचीच वाट पहात होती. अँड्र्यूने स्पष्टपणे तिला काय घडले ते सांगून टाकले. पहिल्यांदा तिचा विश्वासच बसला नाही. ती रडायला लागली. हातपाय आपटून ॲलिसन घरी निघून गेल्यावर अँड्र्यूने लुईसला फोन लावला आणि ॲलिसनबरोबर ठरलेले लग्न मोडल्याचे सांगितले. आता ह्यूग मॅकेंझी आहेत तोवर लेबर गव्हर्नमेंटमध्ये आपल्याला कोठलीही जागा मिळण्याची शक्यता नाही याची त्याला कल्पना होती.

अँड्र्यूच्या आयुष्यात ही अशी उलथापालथ घडत असताना लेबर पार्टीचा दुसरा सदस्य रेमंड पुस्तक लिहिण्यात गढून गेला होता. रात्रंदिवस रेमंड टाईपरायटरशी बसलेला असायचा. 'फुल एम्प्लॉयमेंट ॲट एनी कॉस्ट' आणि 'रिफ्लेक्शनस् ऑफ अ वर्कर एड्युकेटेड आफ्टर थर्टीज्' ही त्याची दोन पुस्तके थोड्याच महिन्यांच्या फरकाने प्रसिद्ध झाली. रेमंडच्या पुस्तकांनी चांगलेच वादळ उठविले आणि तो एकदम प्रसिद्धीच्या झोतात आला. बऱ्याच कामगार पुढाऱ्यांना रेमंडचे विचार पटले नाहीत. 'डेली मिरर' आणि 'सन'-सारख्या वृत्तपत्रांनी तर त्याच्या पुस्तकावर टीकेची झोड उठविली. पण टाईम्स आणि ऑब्झर्व्हर सारख्या वृत्तपत्रांनी ह्या नव्या विचारांचे स्वागत केले. पुस्तके प्रसिद्ध झाल्याच्या तीनच महिन्यात पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सनच्या सचिवाने पंतप्रधानांचा ट्रेड युनियन काँग्रेस (TUC) मध्ये करावयाच्या भाषणाचा मसुदा पाठविला आणि त्यात आवश्यक ती भर घालण्याची विनंती केली.

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टी आता विरोधी पक्ष असल्याने चार्लस आणि सायमन ह्यांना फारसे काम उरले नव्हते. त्यातल्या त्यात हीथच्या



अँड्रयू – लुईसशी लग्न करण्याचा निर्णय पक्का झाला.

विजयामुळे चार्ल्सचा एनव्हायर्नमेंट टीममध्ये तरी प्रवेश झाला होता. ही नवीन जबाबदारी त्याने इतकी मनावर घेतली होती की, सरकारने मांडलेल्या एका बिलात त्याने सुचविलेल्या एका सुधारणेचा समावेश केला गेला. त्याची बायको फिओना हिने सभासदांना आणि पत्रकारांना पार्टीला बोलाविण्याचे चालूच ठेवले. त्यामुळे वृत्तपत्रांतूनही ह्या ना त्या कारणाने चार्ल्सच्या नावाचा राबता असायचा.

माउडलिंगच्या पराभवामुळे सायमनला कळून चुकले की आता हीथ कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा नेता असेपर्यंत आपल्याला काही शॅडो कॅबिनेटमध्ये जागा नाही. आठवड्यातून दोन दिवस हाऊसमध्ये पंतप्रधानांना प्रश्न विचारण्यासाठी सदस्यांना पंधरा मिनिटे वेळ दिला जातो. ह्या वेळेचा सदुपयोग करण्याचे सायमनने ठरविले. वेगवेगळ्या विषयांचा, घटनांचा काळजीपूर्वक अभ्यास करून तो हे प्रश्न काढीत असे.

ब्रिटिश पार्लमेंटचे प्रत्येक सेशन एक वर्षाचे असते. ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीस इंग्लंडची राणी पार्लमेंटचे उद्घाटन करते. आपल्याकडे सुरुवातीस जसे राष्ट्रपती लोकसभा आणि राज्यसभेच्या सभासदांपुढे भाषण करतात त्याचप्रमाणे इंग्लंडची राणी हाउस ऑफ कॉमन्स आणि हाउस ऑफ लॉर्ड्सच्या सभासदांपुढे सरकारच्या वर्षभरातील कामगिरीचा आढावा घेते. मधल्या काळात ज्या सुट्ट्या येतात तेवढ्या काळापुरते सेशन तहकूब केले जाते. सर्वसाधारणतः वर्षभरात सभागृहाचा पन्नास टक्के वेळ नवे कायदे तरतुदी ह्यासाठी जातो. तीस टक्के वेळ आर्थिक तरतुदींच्या चर्चेत जातो आणि उरलेल्या वीस टक्के वेळात शासकीय यंत्रणेबद्दल चर्चा होते.

एकोणिसशे चौसष्टच्या निवडणुकीत लेबर पार्टीचा विजय झाला तरी त्यांचे बहुमत केवळ चार सभासदाचे होते. त्यामुळे एक वर्ष उलटल्यावर ऑक्टोबरमध्ये राणीने नव्याने पार्लमेंटचे उदघाटन केले तेव्हा हॅरॉल्ड विल्सनना कल्पना होती की इतक्या कमी बहुमतावर सरकार चालविणे कठीण जाईल. अशा थोड्या बहुमतावर कोणतेही बिल पास करून घेणे जिकिरीचे बनले होते.

याच वेळी हलच्या मतदार संघात झालेल्या बायइलेक्शनमध्ये लेबरपार्टीचा उमेदवार पूर्वीपेक्षाही प्रचंड बहुमताने विजयी झाला. जनमत आपल्या पक्षाच्या बाजूचे आहे असे लक्षात येताच हॅरॉल्ड विल्सननी राणीला पार्लमेंटची चार वर्षांची मुदत संपण्यापूर्वीच विसर्जित करण्याचा सल्ला दिला. नव्या निवडणुका एकतीस मार्चला घेण्याचे ठरले.

कोव्हेंट्री सेंट्रल मतदार संघातून सायमन चौसष्टच्या निवडणुकीत अगदीच तुटपुंज्या मतांच्या आधाराने कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या तिकिटावर निवडून आला होता. त्यामुळे आता देशात लेबर पार्टीचे वारे वहात असताना आपल्याला कॉन्झर्व्हेटिव्हच्या तिकिटावर निवडून येणे कठीण जाणार याची त्याला कल्पना होती पार्टीच्या व्हिपने तर त्याला मतदार संघातच मुक्काम ठोकायला सांगितले. 'आता निवडणुकीपर्यंत सभागृहात काहीही महत्त्वाचे निर्णय घेतले जाणार नाहीत. तेव्हा तू जमतील तेवढी मते गोळा करायच्या प्रयत्नाला लाग' त्याने सायमनला सल्ला दिला.

सायमनची बायको एलिझाबेथ हिनेही हॉस्पिटलमधून दोन आठवड्याची सुट्टी काढली आणि ती दोघेही प्रचाराला लागली. सायमनच्या विरुद्ध लेबर पार्टीने आल्फ ॲबट म्हणून उमेदवार उभा केला होता. आपल्याकडे 'गव्हर्नमेंट दॅट वर्क्स' अशी काँग्रेस आयची एकोणिसशे ऐंशीच्या निवडणुकीत घोषणा होती. चौसष्टच्या निवडणुकीनंतर केवळ अठरा महिन्यातच घेतल्या गेलेल्या मुदतपूर्व निवडणुकीत लेबर पार्टीची घोषणा होती 'यू नो, लेबर गव्हर्नमेंट वर्क्स' लिबरल पार्टीने त्यांचा निगेल बेन ब्रिगेड हा उमेदवार उभा केला होता; पण खरी लढत सायमन आणि आल्फ यांच्यातच होती. निगेलचे डिपॉझिट तरी परत मिळेल की नाही याची शाश्वती नव्हती.

निवडणुकीच्या दिवशी सायमन आणि एलिझाबेथ सकाळी पाचला उठले. जवळच्या शाळेत जाऊन त्यांनी प्रथम आपले मतदान केले आणि मग दोघांनीही वेगवेगळ्या मतदान केंद्रांना भेट देण्यास सुरुवात केली. इतके दिवसांच्या परिश्रमानंतर लोकांची सहानुभूती आपल्याकडे राहील अशी सायमनला आशा वाटत होती; पण देशभर जी लेबर पार्टीची लाट आली आहे त्यात आपलाही बळी जाईल अशी शंकाही त्याला वाटत होती. रात्री नऊ वाजता मतदान संपले आणि सायमन व एलिझाबेथ घरी परतले.

तासाभरातच सायमन एलिझाबेथबरोबर टाऊन हॉलवर पोहोचला तेव्हा मतमोजणीला सुरवात झाली होती. मध्यरात्रीपर्यंत इतर मतदार संघातले निर्णय बी. बी. सी. वर यायला सुरवात झाली होती. लेबर पार्टीच सरकार बनविणार याबद्दल कुणालाच शंका उरली नव्हती.

रात्री साडेबाराला टाऊनहॉलच्या क्लार्कने तीनही उमेदवारांना एकत्र बोलाविले आणि निकाल सांगितला. ताबडतोब फेरमोजणीची मागणी करण्यात आली. तासाभरात फेरमोजणी संपली. फक्त तीन मते चुकीची मोजली गेली होती. टाऊन क्लार्कने निर्णय जाहीर केला; पण उमेदवारांचे समाधान झाले नाही. त्यांनी दुसऱ्यांदा

मोजणी करण्याची मागणी केली. एलिझाबेथ एव्हाना नखे कुरतडून कंटाळली होती. लिबरल पार्टीचा उमेदवार निगेल तर केव्हाच झोपी गेला होता. तो जिंकण्याची सुतराम शक्यता नव्हती.

सकाळी पावणे तीनला मोजणी संपली आणि दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी निर्णय मान्य केला.

आल्फ अॅबट (लेबर) १९,७१६

निगेल बेनब्रिगेड ( लिबरल ) ७,००२

सायमन कस्लेक ( कॉन्झर्व्हेटिव्ह ) १९,७३१

साऱ्या देशभर कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा पराभव झाला होता तरी सायमन मात्र केवळ पंधरा मतांनी का होईना पण विजयी झाला होता.

सायमनप्रमाणेच चार्लसही ससेक्स डाऊन मतदार संघातून कॉन्झर्व्हेटिव्हच्या तिकिटावर जिंकला होता; पण मतांची आघाडी मात्र कुणालाच सांगायची त्याची तयारी नव्हती. मुळातच ससेक्स डाऊन कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा बालेकिल्ला असल्याने ती सीट टिकवून धरणे चार्लसला शक्य झाले.

रेमंड गोल्डचा लेबर पार्टीच्या तिकिटावर लीड्समधून १२,४१३ मतांच्या आघाडीने विजय झाला. अॅंड्र्यूलाही लेबरच्या तिकिटावर एडिंबरो कार्लटन मतदारसंघात २,४६८ मतांची आघाडी मिळाली.

ह्या मधल्या काळात अॅंड्र्यूने सतत लुईसची मनधरणी केली आणि तिचे मन वळविण्यात त्याला अखेर यश आले. निवडणुकीचा निकाल जाहीर झाला त्याच दिवशी त्याने लुईस फोरसिथ बरोबरची एंगेजमेंट जाहीर केली.

## अपेक्षित नेमणूक

लुईसची उंची जेमतेम पाच फूट तीन इंच; पण तिच्या सडपातळ शरीरयष्टीमुळे ती उंच वाटत असे. तिचे निळे डोळे, खांद्यापर्यंत आलेले काळे केस, हसरा गोल चेहरा ह्यामुळे कुणाचीही दृष्टी तिच्या वर खिळून रहायची.

लुईसला राजकारणात गम्य नव्हते. पण आता चार महिने अॅंड्र्यूच्या सहवासात राहून तिच्यात इतके क्रांतीकारी बदल झाले होते की, उत्साहाच्या भरात तिने स्कॉटिश लेबरपार्टीची मेंबरशीप देखील भरली. दिवसेंदिवस अॅंड्र्यूला आपला लुईसबरोबर लग्न करण्याचा निर्णय योग्यच होता याची खात्री पटत चालली. लेबर पार्टी सत्तेवर आली तरी ह्यूग-मॅकॅन्झी असेपर्यंत काही आपली मंत्रिमंडळात वर्णी लागत नाही याची अॅंड्र्यूला खात्री होती. नव्या मंत्रिमंडळात ह्यूग मॅकॅन्झींना मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर स्कॉटलंड वरून सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर स्कॉटलंड अशी बढती मिळाली होती आणि आता ते कॅबिनेट मिनिस्टर होते.

पण अॅंड्र्यूचे सगळे लक्ष आता लुईसकडे होते. लुईस प्रेग्नंट होती. अॅंड्र्यूचा उत्साह इतका दांडगा की त्याने संपूर्ण बेडरूमचे नर्सरीमध्ये रुपांतर करून टाकले होते. आपल्याला मुलगा होणार हे तो गृहितच धरून चालला होता. स्कॉटिश लोकांना फुटबॉलचे भयंकर वेड. अॅंड्र्यूचे वडील सर डंकन फ्रासर उत्तम फुटबॉलपटू होते. आपल्या मुलाने आपल्यासारखे आणि त्याच्या आजोबासारखे फुटबॉल टीमचे कॅप्टन बनावे अशी अॅंड्र्यूची इच्छा होती. लुईस बाळंत होण्याच्या आतच त्याने खेळणी आणून टाकली. त्यात फुटबॉलही होता. फक्त लुईस हसेल म्हणून त्याने तो लपवून ठेवला. लुईसला मात्र भीती वाटत होती समजा मुलगी झाली तर ?

निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यावर सर्वसाधारणतः पहिल्या अठ्ठेचाळीस तासात नवे मंत्रिमंडळ जाहीर होते. त्यामुळे निवडणूक झाल्यावर जी पार्टी विजयी होते तिचे सभासद अठ्ठेचाळीस तास फोनजवळ बसून रहातात. पहिल्या बारा तासात पंतप्रधानांचा फोन आला तर तुम्हाला कॅबिनेट मिनिस्टर म्हणून बोलाविले जाईल, पुढच्या बारा तासात फोन आला तर मिनिस्टर स्टेट म्हणून, त्याच्या पुढच्या बारा तासात अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट म्हणून आणि शेवटच्या बारा तासात फोन आला तर कॅबिनेट मिनिस्टरचे प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून तुमची नेमणूक केली जाईल आणि जर दोन दिवसात फोन आला नाही तर बॅक बेंचर्स म्हणून तुमची रवानगी झाली असे समजावे. ह्यूग मॅकॅन्झी मंत्रिमंडळात असेपर्यंत फोनची घंटी वाजणार नाही ह्याची अॅंड्र्यूला खात्री होती. रेमंड मात्र अस्वस्थपणे फोनच्या आसपास घुटमळत होता. अचानक फोन आला तर आपण जवळपास असावे म्हणून त्याने आंघोळीला जायचेही टाळले आणि जेवणही बाहेरच्या खोलीतच घेतले. दुसऱ्या दिवशी दुपारी फोन वाजला.

'रे'

'गुड आफ्टरनुन प्राईम मिनिस्टर.'

'अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर एम्प्लॉयमेंट म्हणून मंत्रिमंडळात यायची तुझी तयारी आहे का ?'

डोक्यावरून मोठे वजन उतरल्याचा रेमंडला भास झाला. नेमक्या याच नेमणुकीची त्याला अपेक्षा होती.

दुसऱ्या दिवशी रेमंड घरून निघाला तेव्हा त्याला हाऊस ऑफ कॉमन्समध्ये घेऊन जायला शोफर असलेली काळी ऑस्टिन गाडी होती. त्याची सेकंडहॅंड सनबीम आता चार वर्षे तरी गॅरेजमधून बाहेर काढायची गरज नव्हती.

गाडीत मागच्या बाजूला लाल रंगाची कातडी ब्रिफकेस होती तिच्यावर सोनेरी अक्षरात कोरलेले होते, 'स्टेट सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर एम्प्लॉयमेंट' रेमंडने बॅग उघडली. एम्प्लॉयमेंटच्या नव्या योजनेबद्दल कॅबिनेटमध्ये चर्चा करण्यासाठी रेमंडकरता मसुदा तयार करण्यात आलेला होता. गाडीत बसल्या बसल्याच रेमंड वाचण्यात गढून गेला.

रेमंडचा कामाचा झपाटा पाहून त्याच्या खात्याचे सरकारी अधिकारीही थक्क झाले. महिनाभरातच रेमंडचा खात्यात जम बसला. त्याच्या बुद्धिमत्तेबद्दल कुणाला शंका नव्हती; पण त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना कित्येकदा त्याचे बोलणे उद्धटपणाचे वाटायचे.

रेमंडने चार्ज घेतल्यापासून चार एक महिने झाले नाहीत तोच त्याच्या खात्याच्या कॅबिनेट मिनिस्टरने त्याला सेंट्रल बोर्ड ऑफ इंडस्ट्रिजच्या वार्षिक समारंभाला सरकारचा प्रतिनिधी म्हणून हजर रहायला सांगितले. अशा प्रसंगांना सरकारतर्फे हजर राहण्याचा मान फक्त पंतप्रधान किंवा कॅबिनेट मिनिस्टरांचा असतो; पण कॅबिनेट मिनिस्टरांना हजर राहणे शक्य नसल्याने त्यांनी रेमंडला ही जबाबदारी स्वीकारण्यास सांगितले.

समारंभासाठी जॉईसने अगदी काळजीपूर्वक रेमंडचे कपडे निवडले.

रेमंडच्या कोटापासून ते बुटापर्यंत सगळ्या गोष्टींची ती काळजी घेत असे- पार्टीला आलेल्या कारखानदारांना आपले लेबर गव्हर्नमेंट पुरते कम्युनिस्ट आहे असे वाटू नये ह्यासाठी रेमंडने परिश्रमपूर्वक भाषण तयार केले होते. भाषणाचे कागद कोटाच्या खिशात ठेवून तो गाडीत बसला. लान्स डाऊन रोडवरच्या त्याच्या घराकडून गाडी ग्रॉसव्हेनॉर हाऊसकडे निघाली. याच ठिकाणी त्याला भाषण करायचे होते. कारखानदारांच्या घोळक्यात मजूर सरकारची बाजू मांडणे हे काही सोपे काम नव्हते; पण रेमंडच्या भाषणाला प्रतिसाद चांगला मिळाला. रेमंडला शाळेतल्या पहिल्या भाषणाची आठवण झाली. आता त्याला वीस पंचवीस वर्षे उलटून गेली होती. लीडस्मधल्या खाटीकाचा मुलगा रेमंड गोल्ड आता सरकारचा प्रतिनिधी म्हणून बोलत होता, पार्टी संपल्यावर कारखानदारांच्या काही शंकांना उत्तरे देण्यासाठी रेमंड बराच काळ थांबून राहिला. निघेपर्यंत जवळ जवळ अकरा वाजले.

रेमंडची गाडी जेमतेम अर्धा किलोमीटर गेली असेल तेव्हा जवळच्या पेट्रोलपंपाशी गाडीकडे पहात कुणी हात करते आहे असे रेमंडला वाटले. पार्टीमधलेच कुणी तरी असेल असे समजून रेमंडनेही हात केला. गाडी जवळ आल्यावर रेमंडने पाहिले की, पांढऱ्या स्कर्टमध्ये एक तरुण मुलगी उभी होती. रेमंडकडे पाहून हसत तिने बोटाने खूण केली. तिचा मिनी स्कर्ट आपल्या हातरुमालाइतका तरी असेल का याची रेमंडला शंका होती. तिच्या पायाच्या पोटऱ्या पाहून रेमंडला दहा वर्षापूर्वीच्या जॉईसची आठवण झाली. तिचे कुरळे केस आणि रेखीव आकृती घरी परतेपर्यंत रेमंडच्या डोळ्यापुढून हलली नाही.

ड्रायव्हरने गाडी गॅरेजमध्ये ठेवली आणि रेमंडला सलाम ठोकून तो घरी निघाला. ड्रायव्हर दृष्टिआड होईपर्यंत रेमंड थांबला. बारा वाजत आले होते. घरात दिवा चालू नव्हता म्हणजे जॉइस एव्हाना झोपलेली असणार. रेमंड पावलांचा आवाज न करता बाहेर आला. त्याची जुनी सनबीम गाडी जॉईसने एका कोपऱ्यात पार्क करून ठेवली होती. रेमंडने गाडी सुरू केली तेव्हा त्याला क्षणभर वाटले की, ह्या आवाजाने साऱ्या रस्त्याला जाग येईल. गाडी पार्कलनकडे निघाली. पार्टी अजून संपलेली नव्हती. ग्रॉसव्हेनॉर हाऊसमधून अजूनही तुरळक पाहुणे बाहेर पडत होते.

पेट्रोल पंपाशी येईपर्यंत रेमंडला त्याच्या हृदयाचे ठोके स्पष्ट ऐकू येत होते. ती मुलगी तेथेच उभी होती. रेमंडने तिच्या जवळून गाडी नेली तशी ती हसली. रेमंडने गाडी तशीच पुढे घेतली. थोडे पुढे गेल्यावर गाडी वळवून त्याने पुन्हा पेट्रोलपंपाच्या दिशेने घेतली. पण पंपाच्या समोर न थांबता थोडे पुढे जाऊन त्याने ब्रेक्स् लावले आणि गाडीतच बसून राहिला.

ती मुलगी चालत गाडीपर्यंत आली आणि दरवाजा उघडून अंडर सेक्रेटरी रेमंड गोल्ड यांच्या शेजारी बसली.

'लुकींग फॉर बिझनेस ?' तिने विचारले.

'तुला काय म्हणायचंय ? रेमंडचा आवाज घोगरा झाला.

'तुला काय वाटतं मी गंमत म्हणून ह्या थंडीत उभी राहिले आहे का ?' तिने हसत विचारले.

रेमंडने तिला जवळून पाहिले. अत्तराचा उग्र दर्प त्याला सहन होत नव्हता; पण आता विचार करायला फारसा वेळ नव्हता.

'दहा पौंड पडतील.'

'जागा कोणती ?'

'हॉटेल पॅडिंग्टन.'

'कसे जायचे ते सांग.' रेमंडने गाडी सुरू करीत विचारले. तिने रेमंडला रस्ता सांगितला.

'अॅम मंडी, वॉटस् युअर नेम ?'

रेमंड क्षणभर गोंधळला, 'माल्कम.'

'कोणता धंदा आहे तुझा ?'

'माझे सेकंडहँड गाड्या विकायचे गॅरेज आहे.' रेमंडने एव्हाना स्वतःला सावरून घेतले होते.

'मग तू इतके चांगले कपडे कसे काय घातलेस ?' मंडीचे प्रश्न थांबायला तयार नव्हते.

'वेस्ट एंड हॉटेलमध्ये एका पार्टीला आलो होतो त्यासाठी घातले होते. हा माझा नेहमीचा ड्रेस नाही.'

मंडीने सिगरेट पेटवली आणि रेमंडला एका छोट्या हॉटेलशी गाडी थांबवायला सांगितली.

'मी पहिल्यांदा पुढे जाते मग माझ्या मागोमाग सरळ वर ये.'

मंडी गाडीतून उतरल्यावर रेमंडला वाटले आता गाडी सुरू करून सरळ घराकडे घ्यावी; पण शरीरावर आता त्याचा ताबा राहिलेला नव्हता.

तिच्या सांगण्याप्रमाणे रेमंड तिच्या पाठोपाठ गेला. मंडीने खोलीचा दरवाजा उघडला. लहानशी खोली. पिवळ्या रंगाचा जुना वॉलपेपर. एका कोपऱ्यात पलंग आणि दुसऱ्या बाजूस वॉश बेसीन.

रेमंड आत शिरल्याबरोबर मंडीने हात पुढे केला. रेमंडने हात खिशात घालून पाकीट बाहेर काढले. फक्त नऊ पौंड.

मंडी किंचित रागावली, 'नॉट गोइंग टू गेट ओव्हरटाईम टुनाईट, डार्लिंग ?' तिने विचारले आणि पैसे पर्समध्ये ठेवले.

मंडीने कपडे काढायला सुरुवात केली. जॉईसखेरीज दुसऱ्या कोणत्याही स्त्रीशी रेमंडचा संबंध आलेला नव्हता. त्याची दृष्टी तिच्यावरून हलेना. आपल्या नेहमीच्या जगाचा रेमंडला विसर पडायला लागला.

'लेटस् गेट ऑन विथ् इट डार्लिंग.'

भानावर येत मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर एम्प्लॉयमेंट रेमंड गोल्डने कपडे काढायला सुरुवात केली.

सकाळी अडीचला रेमंड हॉटेलमधून बाहेर पडला तेव्हा मंडीने विचारले, 'तू मला पेट्रोल पंपाशी सोडशील का ?'

'मी नेमक्या उलट दिशेने चाललो आहे.' रेमंडने गाडी सुरू केली आणि थेट लान्स डाऊन रोडवर आणली. पावलांचा आवाज न करता तो बेडरूममध्ये आला तेव्हा जॉईस गाढ झोपी गेलेली होती. मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर एम्प्लॉयमेंट रेमंड गोल्ड त्यांच्या नेहमीच्या जगात येऊन पोहोचलेले होते.

लेबर पार्टी सत्तेवर होती आणि कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टी विरोधी पक्ष होती. त्यामुळे चार्ल्स आणि सायमन जिंकून आले तरी त्यांना महत्त्वाची पदे मिळणार नव्हती. त्यात हीथ कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा नेता

असेपर्यंत सायमनला शॅडो कॅबिनेटमध्येही जागा मिळायची शक्यता नव्हती. सायमन जरी बॅक बेंचर म्हणून बसत असला तरी प्रश्नोत्तरांच्या वेळेस सायमन फार शोधक प्रश्न विचारायचा आणि त्यामुळे उत्तर देताना सरकार कित्येकदा अडचणीत येत असे. फावल्या वेळात तो स्पेक्टॅटर आणि संडे एक्स्प्रेसमध्ये लेखही लिहीत असे. सभागृहाचा सदस्य म्हणून मिळणाऱ्या ३,४०० पौंड पगारात एलिझाबेथच्या हॉस्पिटलमधल्या नोकरीतून मिळणाऱ्या पैशाची भर पडत होती; पण आता त्याची दोन्ही मुले शाळेच्या वयाची झाली होती. कॉलिजमधले त्याच्या बरोबरीचे मित्र आता मोठ्या पगाराच्या नोकरीवर काम करीत होते.

याच सुमारास, तो जेव्हा सेंट्रल बोर्ड ऑफ इंडस्ट्रीजच्या पार्टीला गेला होता तेव्हा त्याची रॉनी नेदरकोट ह्या उद्योजकाशी ओळख झाली. याच पार्टीत कॅबिनेट मिनिस्टरच्या अनुपस्थितीत रेमंड गोल्डने सरकारतर्फे भाषण केले होते. प्रेक्षकांमध्ये रॉनी सायमनच्या शेजारीच बसला होता.

रॉनी वेगवेगळ्या इमारती, कंपन्या खरेदी-विक्रीचा (Property company) व्यवसाय होता. गेल्या दहा वर्षांत त्याने या व्यवसायात प्रचंड पैसा कमावला होता. सायमन पार्लमेंटचा सदस्य होता. अशा माणसाचा व्यवसायाला फायदा होईल या हेतूने रॉनीने सायमनला वार्षिक २,००० पौंड पगारावर कंपनीच्या डायरेक्टर बोर्डावर यायला सांगितले. डायरेक्टर बोर्डाची महिन्यातून एकदाच मिटींग होती. त्यामुळे सायमनला वाटले आपल्याला हाऊसमधले काम सांभाळून रॉनीच्या कंपनीचे कामही पहाता येईल.

सायमनची बायको एलिझाबेथचा पहिल्यापासूनच ह्या कामाला विरोध होता. तिला रॉनीचा भरवसा वाटत नव्हता. या माणसामुळे सायमन केव्हा तरी गोत्यात येईल असे तिला वाटत होते.

सायमनने तिला पटवून दिले की, ह्या नव्या कामामुळे त्यांची पैशांची वाढती गरज भागू शकेल रॉनीने सायमनला त्याच्या कंपनीचे शेअर्स कमी किंमतीत देऊ केले. हे शेअर्स घेण्यासाठी सायमनने मिडलँड बँकेकडून पन्नास हजार पौंडांचे कर्ज काढले. रॉनीची कंपनी एकदा पब्लिक लिमिटेड कंपनी झाली की, आपल्या शेअर्सची किंमत दुप्पट होईल याची सायमनला खात्री होती. एलिझाबेथ उगाचच चिंता करीत बसेल म्हणून त्याने कर्ज घेतल्याची बातमी मात्र तिच्यापासून लपवून ठेवली.

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या एनव्हायर्नमेंट टीममधल्या एका सदस्याचा सार्वत्रिक निवडणुकीत पराभव झाला होता त्यामुळे त्याची जागा हीथने चार्लसला दिली. चार्लस आधी एनव्हॉयर्नमेंट टीममध्ये ज्युनियर स्पोक्समन म्हणून काम करीत होता. आता त्याला याच टीममध्ये वरची पोस्ट मिळाली होती. दुषितीकरण, पाणीपुरवठा वगैरे खात्यांच्या कार्यपद्धतीवर बोलण्याची जबाबदारी विरोधी पक्षाचा सभासद म्हणून त्याच्यावर होती. चार्लस त्याची सगळी भाषणे काळजीपूर्वक तयार करीत असे. तो विरोधी पक्षात असला तरी फिओनाच्या पार्ट्यांमुळे वृत्तपत्रांमध्ये त्याचे सतत नाव असायचे आणि तरीही एक घोडचूक त्याच्या हातून घडलीच.

चार्लस आणि फिओना बँकेच्या एका चेअरमनच्या पार्टीला गेले होते. लंडनपासून ते ठिकाण जवळजवळ तीसएक मैल दूर होते. शॅंपेन पिता पिता संध्याकाळ केव्हा उलटली ह्याचा चार्लसला पत्ता लागला नाही. आता एवढ्या उशीरा निघायचे म्हणजे वाटेत सगळ्या ट्रॅफिक जॅमला तोंड द्यावे लागेल ह्या विचारानेच तो त्रासला. चार्लसने त्याची डिमलर गाडी बाहेर काढली आणि फिओना काही बोलायच्या आत गाड्यांची रांग तोडून गाडी सुसाट वेगाने धावू लागली.

फिओनाने कानात ओरडून सांगितले तेव्हा पुढून पोलिसांची गाडी येत आहे याची चार्लसला जाणीव झाली. त्याने गाडी बाजूला घेऊन थांबविली.

'पोलिसांशी जरा सांभाळून घे.' फिओनाने सांगितले.

'तू शिकवू नकोस. मला ठाऊक आहे.' चार्लसचा शॅंपेनचा अंमल अजूनही उतरलेला नव्हता. गाडीशी पोलीस येऊन उभा राहिला तेव्हा चार्लसने त्याला विचारले.

'तुला मी कोण आहे ते ठाऊक आहे का ?'

'नाही. पण तुम्हाला माझ्याबरोबर यावे लागेल.'

'मी येणार नाही. मी पार्लमेंटचा...

'चार्लस उगाच मुर्खासारखे बरळू नकोस.' फिओना म्हणाली.

'मी पार्लमेंटचा कॉन्झर्व्हेटिव्ह मेंबर आहे. माझ्याशी कुणी असें वागलेले मला खपायचे नाही.' चार्लस म्हणाला.

'तुम्ही कोणीही असला तरी तुम्हाला पोलीस स्टेशनवर यावे लागेल.'

'मला प्रथम वकिलाशी बोलायचे आहे.'

'मग पोलीस स्टेशनवरच बोला!'

## पार्टीऑफिसमधून चिठ्ठी

चार्लसला धड चालताही येत नव्हते. पोलीस स्टेशनवर पोहोचल्यावर त्याने ब्लड सँपल द्यायलाही नकार दिला. शेवटी फिओनानेच वकीलाला फोन केला. चार्लस कुणाचेच ऐकायला तयार नव्हता. वकिलाने चार्लसला फोनवर त्याच्या वागण्याचे परिणाम सांगितले, तेव्हा कोठे तो भानावर आला आणि पोलिसांना त्याने स्टेटमेंट लिहून दिले. घरी पोहोचेपर्यंत फिओना प्रार्थना करीत होती की, कुणी वार्ताहाराने हा तमाशा पाहिला नसेल तर नशीब.

दोन दिवसांनी चार्लसची केस कोर्टात आली तेव्हा त्याच्या वकिलाने त्याचे नाव सी. जी. सेमूर असे दिले होते. नावापुढे एमपी असा उल्लेख नव्हता. व्यवसाय बँकर म्हणून दिलेला होता. नाही तरी चार्लस सेमूर बँकेत डायरेक्टर म्हणून काम पहात होताच. बोर्डावर चार्लसची केस सहावी होती. चार्लस कोर्टात हजर राहिला नाही. फक्त त्याचा वकील हजर झाला. जज्जने ५० पौंड दंड ठोठावला आणि सहा महिन्यासाठी चार्लसचे लायसन जप्त झाले. चार्लसला हायसे वाटले. बातमी वृत्तपत्रांपर्यंत पोहोचली नाही हे उत्तम झाले.

पण त्याचा अंदाज चुकला. पोलीस अधिकाऱ्याशी केलेले उद्धट वर्तन त्याला भोवले असावे. दुसऱ्या दिवशी 'डेली मिरर' आणि 'सन' ह्या वृत्तपत्रांत पहिल्या पानावर त्याचा फोटो होता. 'सिक्स मंथस् बॅन फॉर ड्रिंक-ड्राईव्ह सन ऑफ अर्ल' आणि 'एमपीज् विज् एंड्स् इन हेवी फाईन' अशा तीन कॉलम हेडलाईनस् होत्या. टाईम्समध्येही आतल्या पानावर बातमी दिलेली होती.

त्या दिवशी चार्लस घराबाहेर पडला नाही. त्याच्याकडे नेहमी पार्टीला येणाऱ्या वार्ताहरांनाही त्याला फोनवर गाठता आले नाही. कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा नेता हीथ यालाही चार्लस कोठे नाहीसा झाला

याचे आश्चर्य वाटले. संध्याकाळी पार्टी ऑफिसमधून चार्ल्सला चिठ्ठी आली. 'ज्युनियर शॅडो मिनिस्टर म्हणून तुम्हाला ह्या वेळेस संधी मिळेल; पण पुढच्या खेपेस मात्र राजिनामा द्यावा लागेल.' चार्ल्सला थंडीतही घाम फुटला.

अँड्र्यू फ्रासरची लुईस प्रेग्नंट होती. अँड्र्यूचे सगळे लक्ष आता होणाऱ्या मुलाकडे लागले होते. त्याचा हाऊस ऑफ कॉमन्समधला पेअर चार्ल्सला दारू पीऊन गाडी चालविल्याबद्दल दंड झाल्याची बातमी सकाळच्या पेपरात वाचली. नेहमीची तयारी करून तो हाऊस ऑफ कॉमन्सकडे निघाला. सभागृहाकडे येता येताच गाडीत त्याने मुलाला काय नाव ठेवायचे याचा विचार केला. 'जिमी रॉबर्टस्, हेक्टर, आमन...' शेवटी त्याने रॉबर्टस् नाव नक्की केले. गाडी त्याने वेस्टमिनिस्टरकडे आणली तेव्हा गेटवरच्या पोलिसाने त्याला थांबविले आणि गाडी ताबडतोब 'सेंटमेरीज्' हॉस्पिटलला घेण्यास सांगितले.

'तुमच्या बायकोला आताच हॉस्पिटलच्या इमर्जन्सी विंगमध्ये नेण्यात आले आहे.'

अँड्र्यूला घरून निघून जेमतेम अर्धातासुद्धा उलटला नसेल. गाडी तशीच वळून सुसाट वेगाने सेंटमेरीज हॉस्पिटलकडे धावू लागली. लुईस अपुऱ्या दिवसांत बाळंत झाली होती. अँड्र्यू हॉस्पिटलमध्ये पोहोचला तेव्हा ड्यटीवरची लेडी डॉक्टर त्याला आत सोडायला तयार नव्हती.

'हाऊ इज लुईस' त्याने पहिला प्रश्न विचारला.

'तुमची बायको ठीक आहे; पण मूल मात्र वाचवता आले नाही.'

अँड्र्यूच्या मनावरचा ताण गेला.

'तिला गोळ्या देऊन झोपविले आहे. तासाभरात तुम्हाला तिला भेटता येईल.' डॉक्टर म्हणाल्या 'या वेळेला असे घडले तरी ह्या पुढेही त्यांना मूल होऊ शकेल.' अँड्र्यूने पुढला प्रश्न विचारायच्या आतच त्यांनी उत्तर दिले.

तासभर व्हरांड्यात येरझाऱ्या घालून डॉक्टरांनी परवानगी दिल्यावर अँड्र्यू लुईसच्या खोलीत शिरला.

'तुझी अगदी निराशा झाली का?' त्याला पाहिल्याबरोबर लुईसने विचारले.

'डोंट बी सिली. आपल्याला चांगली डझनभर पोरं होतील' अँड्र्यू तिचा हात हातात घेत म्हणाला.

लुईसच्या तोंडावर हसू फुटले. 'माझ्या डॉक्टरचा नवरा कोण आहे ठाऊक आहे का तुला?' तिने विचारले.

'कोण?'

'सायमन कस्लेक'

लुईस बरी होऊन हॉस्पिटलमधून बाहेर पडल्यावर अँड्र्यूने तीन–चार दिवस सुट्टीसाठी फ्रान्सला जायचे ठरविले.

लुईसची प्रकृती सुधारायला जवळजवळ दोन आठवडे लागले होते. अँड्र्यूने आधीच विमानाचे तिकीट काढून ठेवले होते आणि दक्षिण फ्रान्समधल्या हिल्टन हॉटेलमध्ये बुकींगही केले होते. सामानाची बांधाबांध करून ती दोघं घराबाहेर पडत होती तोच फोनची घंटा वाजली. विमान सुटायला फक्त अर्धा तास अवकाश होता.



अँड्र्यूने तसाच दरवाजा लावला आणि ती दोघं विमानतळाकडे निघाली. फ्रान्समध्ये तीनही दिवस दोघं भरपूर फिरली. तीन दिवस अँड्र्यूचा रेडिओ, टेलिफोन, टीव्ही, पेपर कशाशीच संबंध नव्हता. त्यामुळे त्याचा वेळ मजेत गेला. चौथ्या दिवशी ते परत निघाले तेव्हा त्यांनी हिल्टन हॉटेलला पुन्हा येण्याचे निश्चित केले.

विमान लंडनच्या हिथ्रो विमानतळावर उतरले तेव्हा त्यांना सुट्टी संपल्याची जाणीव झाली. विमानतळावरून टॅक्सी करून ते अँड्र्यूच्या चेन वॉक येथील घराशी आले. अँड्र्यूने किल्ली घालून दरवाजा उघडला तोच फोन वाजायला लागला.

'बापरे हा माणूस संपूर्ण आठवडा फोन करीत होता की काय ?' लुईस म्हणाली.

अँड्र्यू उचलेपर्यंत फोन डेड झाला होता. फोन ठेवून अँड्र्यूने जमिनीवर पडलेली पत्रे चाळायला सुरुवात केली होती. पत्रे पाहून तो आंघोळीला गेला तोवर फोन पुन्हा वाजायला लागला. लुईसने फोन उचलला.

'अँड्र्यू पंतप्रधानांच्या ऑफिसमधून फोन आहे' तिने ओरडून सांगितले.

अँड्र्यू तसाच धडपडत बाथरूममधून बाहेर पडला.

'अँड्र्यू फ्रासर' तो म्हणाला.

'दिस इज नंबर टेन. पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सनना तुमच्याशी बोलावयाचे आहे. शुक्रवारपासून ते तुमच्याशी बोलायचा प्रयत्न करताहेत.' अँड्र्यूच्या तोंडून शब्दच फुटेना. पंतप्रधान फोनवर आले.

'अँड्र्यू.'

'गुड मॉर्निंग, प्राईम मिनिस्टर.'

'तुला ह्यूग् मॅकेंझी गेल्याचे कळले असेल.'

'होय' अँड्र्यू चटकन म्हणाला. खरं तर आता पंतप्रधानांकडूनच पहिल्यांदा ॲलिसनचे वडील ह्यूग मॅकेंझी गेल्याची बातमी त्याने ऐकली. गेले तीन-चार दिवस बाहेरच्या जगाशी त्याचा संबंध पार तुटला होता. ह्यूग मॅकेंझींचा शुक्रवारी हार्टॲटॅक येऊन मृत्यू झाला होता.

पंतप्रधान म्हणाले की, ब्रूस नावाच्या त्यांच्या सहकाऱ्याला त्यांनी सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर स्कॉटलंड ही मॅकेंझीची जागा घेण्यास सांगितले होते आणि सध्याचे अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर स्कॉटलंड अँगस ह्यांना मिनिस्टर ऑफ स्टेट म्हणून बढती देण्यात आली होती. त्यामुळे अंडर सेक्रेटरीची रिकामी झालेली जागा अँड्र्यूने घ्यावी अशी पंतप्रधानांची इच्छा होती.

अँड्र्यूने तात्काळ होकार दिला.

'आणि ह्यापुढे फ्रान्सला जाताना पार्टी ऑफिसला कळवून जात जा' असे म्हणून हसत पंतप्रधानांनी फोन खाली ठेवला. अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर स्कॉटलंड म्हणून अँड्र्यूचे पहिले काम होते ह्यूग मॅकेंझींच्या दुखवटा-सभेला हजर रहाणे.

ह्या नव्या कामात अँड्र्यू इतका रमला की, पुढचे चार महिने त्याला श्वास घ्यायलाही वेळ नव्हता. एडिंबरो, ग्लासगो आणि लंडन ह्या तीन ठिकाणी त्याला सतत फिरते रहावे लागत होते. त्याच्या विनोदी स्वभावामुळे अंडर सेक्रेटरी म्हणून खात्यातील अधिकाऱ्यात तो प्रिय झाला होता. तसेच त्याच्या उत्तरे देण्याच्या चलाखीमुळे हाऊस ऑफ कॉमन्समध्येही मंत्री म्हणून त्याचा प्रभाव चांगला पडत होता.

एकदा शनिवारी रात्री थकून तो लुईसबरोबर बागेत गप्पा मारीत बसला होता तेव्हा लुईसने त्याला सांगितले की, ती पुन्हा प्रेगन्ट आहे.

'व्हेन डिड आय फाइंड टाईम' तिचा हात हातात घेत अँड्र्यूने विचारले.

'तुला आठवत नाही का नार्वेच्या शिष्टमंडळाची मिटिंग आणि ॲबरडीनची कॉन्फरन्स ह्यामध्ये अर्धा तास वेळ होता ?' लुईसने हसत उत्तर दिले.

आता काही महिने पाठी जाऊन आपण अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर एम्प्लॉयमेंट रेमंड गोल्ड यांच्या आयुष्यात काय उलथापालथ चालली आहे ते पाहू.

'मंडी'शी संबंध येऊन गेल्याला जवळजवळ दोन आठवडे उलटून गेले होते. रेमंड तो प्रसंगही विसरत चालला होता. घरी सकाळी चहा पिताना तो कार्यालयातील पत्रव्यवहार पहात असे. मंत्री म्हणून 'टॉप सिक्रेट' 'फॉर युवर आईज ओनली' अशा स्वरूपाची पत्रे पहायची आता त्याला सवय झाली होती. त्यामुळे वर 'खाजगी' लिहिलेले पांढऱ्या पाकिटातील पत्र उघडून पहाताना रेमंडला काहीच विशेष वाटले नाही. रेमंडने पत्र वाचले आणि त्याचा चेहरा पांढरा पडला. जॉईस ब्रेकफास्ट घेऊन टेबलाशी आली तेव्हा तिने रेमंडचा चेहरा पाहिला.

'बरे वाटत नाही का ? तिने चौकशी केली. रेमंडने चटकन् पत्र खिशात घातले.

'कॅबिनेट कमिटीची मिटींग आहे, मला निघालेच पाहिजे.' असे म्हणून तो घाईघाईने घराबाहेर पडला.

गाडीत बसल्या बसल्या रेमंडने पुन्हा एकदा पत्र वाचले.

डिअर माल्कम,

तुझ्या सहवासात वेळ चांगला गेला; पण ते सगळं विसरायला मला पाचशे पौंड लागतील. मी या आठवड्यातच तुला भेटण्याचा प्रयत्न करते.

मंडी

## ब्लॅकमेलींग

पत्रावरती पत्ता नव्हता, त्यामुळे ते कोठून आले ते कळायला मार्गही नव्हता. डिपार्टमेंट ऑफ एम्प्लॉयमेंटपर्यंत गाडी आली तरी रेमंडला बाहेर पडायचे भान राहिले नाही.

ऑफिसमध्ये बसल्यावर रेमंडने शांतपणे सर्व गोष्टींचा विचार करून पाहिला. तो स्वतः उत्तम वकील होता. इंग्लंडमधले दोनच वकील त्याच्या मते उत्तम होते. एक ॲर्नोल्ड गुडमॅन आणि दुसरे सर रॉजर पेलहॅम. सर रॉजरशी त्याची पूर्वीपासून ओळख होती. त्याने त्याच्या ऑफिसला फोन करून दुपारची अपॉईंटमेंट मागून घेतली.

कॅबिनेट कमिटीच्या मिटींगमध्ये रेमंडचे लक्षच नव्हते. मिटींग संपताक्षणीच तो टॅक्सी करून सर रॉजरच्या ऑफिसमध्ये पोहोचला.

बरेच वर्षांनी त्यांची भेट झाली होती. सर रॉजरनी रेमंडचे स्वागत केले.

त्यांचा फारसा वेळ न घेता रेमंडने मंडीचे पत्र त्यांच्या हातात दिले.

त्यांनी ते पत्र काळजीपूर्वक वाचले.

'ब्लॅकमेल' ते म्हणाले. रेमंडला त्यांनी पहिल्यापासून सगळी हकिगत सांगायला सांगितले. 'काही लपवून ठेवू नकोस. त्याच्याशिवाय मला तुला नेमका सल्ला देता येणार नाही.'

रेमंडने जे घडले ते सांगितले.

सर रॉजरनी पुन्हा एकदा पत्र वाचले.

'मी सल्ला देतो. तुला तो पसंत पडणार नाही. तू काहीच करायची गरज नाही.'

'पण ती वृत्तपत्रांकडे गेली तर?'

'तुला काय वाटतं तू ५०० पौंड दिल्यावर ती गप्प बसेल. असे किती वेळा तू तिला पैसे देत रहाणार. कधीतरी ती वृत्तपत्रांकडे जाईलच. तू माझ्यावर सोपव सगळे. परत तिने पत्र पाठविले तर मला ताबडतोब फोन कर.'

सर रॉजरना सगळे सांगून टाकल्यामुळे रेमंडला थोडे हलके वाटू लागले होते; पण ऑफिसमध्ये कामात त्याचे लक्ष लागेना. त्याच्या झोपेवरही त्याचा परिणाम झाला. चार्ल्सला दारू पिऊन दंड झाल्याची बातमी त्याने पेपरमध्ये पहिल्या पानावर आलेली पाहिली होती. मंडीने जर पेपरमध्ये बातमी दिली तर आपली काय गत होईल याची त्याला कल्पना करवेना. चार दिवसांनी टपाल पहात असताना दुसरे पत्र त्याच्या हाती लागले. तेच हस्ताक्षर. मंडीने पुन्हा ५०० पौंडाची मागणी केली होती. रेमंडने ताबडतोब सर रॉजरना फोन केला. त्यांच्या सल्ल्यात बदल नव्हता.

प्रत्येक वेळेला ऑफिसचा फोन वाजायचा तेव्हा रेमंडला वाटायचे आता कुणीतरी वार्ताहार त्याला मंडीबद्दल विचारणार; पण पत्रकारांनी फोन केलाच तर ते बेकारांची संख्या नाहीतर पौंडाच्या अवमूल्यनाबद्दल विचारायचे.

'डेलीमिरर' च्या माइक मोले या वार्ताहराने त्याला पहिला प्रश्न विचारला. रेमंडच्या माहितीत मंडी पेग म्हणून कुणी मुलगी आहे का याची त्याने चौकशी केली.

'मला काहीच सांगायचे नाही. तुम्ही माझ्या वकिलाशी बोला. सर रॉजर पेलहॅम.' एवढे बोलून रेमंडने फोन ठेवला; पण त्याला घाम फुटला होता.

पाच-सहा मिनिटात परत फोन वाजला. रेमंडने रिसीव्हर उचलला. त्याचा हात अजूनही थरथरत होता. सर रॉजरने त्याला सांगितले की, डेलीमिररच्या मोलेने त्यांना फोन केला होता.

'तुम्ही काही बोललात का त्याला?'

'सगळं'

रेमंड जागच्याजागी उडालाच.

'तुझे नशीब समज. की मंडीला नेमका माईक मोलेच भेटला. तुम्हा राजकारणी लोकांना वाटते तितके पत्रकार मूर्ख नसतात. त्यानाही ब्लॅकमेल करणाऱ्यांविषयी प्रेम नसते. मला नाही वाटत डेलीमिरर उद्या तुझ्याविषयी काही छापेल.'

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेपाचला रेमंड पेपरवाल्याच्या स्टॉलशी उभा होता. त्याने डेलीमिरर घेऊन उघडला. पाचव्या पानावर रेमंडचा फोटो होता आणि बाजूला पौंडाच्या अवमूल्यनाला असलेला त्याचा विरोध आणि बेकारी कमी करण्यासाठी त्याने केलेले प्रयत्न याबद्दल माईक मोलेचा लेख होता; पण मंडीचा कुठेच उल्लेख नव्हता.

रेमंडला हायसे वाटले.

पौंडाच्या अवमूल्यनाला जाहीरपणे केलेला विरोध रेमंडला महागात पडणार होता. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये प्रश्नोत्तराच्या वेळेस कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या सायमन कर्स्लेकने त्याला अगदी पेचात पकडले.

'तुमच्या म्हणण्याला न जुमानता सरकारने जर पौंडाचे अवमूल्यन केले तर तुम्ही राजिनामा द्याल काय?'

रेमंडचा चेहरा उतरला. सायमनचा प्रश्न विचारण्याचा उद्देश स्पष्ट होता. एकदा जाहिरपणे अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर एम्प्लॉयमेंटने अवमूल्यनाविरुद्ध मत प्रगट केले की, मग पंतप्रधानांनी अवमूल्यनाचा निर्णय घेतला तर रेमंडला राजिनामा देण्यावाचून गत्यंतर नव्हते.

'फुल एम्प्लॉयमेंट ॲट एनी कास्ट' ह्या त्याने लिहिलेल्या पुस्तकातही रेमंडने अवमूल्यनाबद्दल अशीच भूमिका घेतली होती.

रेमंडने विचारपूर्वक उत्तर दिले,

'सरकारचा अवमूल्यनाला विरोध आहे. पौंड मजबूत राखण्यावर आमचा भर आहे. त्यामुळे असे काही घडण्याची शक्यताच नाही.

'वेट ॲंड सी' सायमन म्हणाला.

दुसऱ्या दिवशी सायमनचा प्रश्न आणि रेमंडचे उत्तर टाइम्समध्ये छापून आले.

दिवसेंदिवस अमेरिकन डालर मजबूत होत चालला होता. यात भर म्हणून ब्रिटनमध्ये संपही सुरू झाले होते. लवकरच पौंडाचे अवमूल्यन करण्यावाचून गत्यंतर उरणार नाही याची रेमंडला खात्री पटत चालली होती.

बाकी इतर कोणत्याही मंत्र्याने अवमूल्यनाबद्दल जाहीर वक्तव्य केले नव्हते. त्यामुळे पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सननी अवमूल्यन केले तर आपल्यालाच राजिनामा द्यावा लागेल याची रेमंडला कल्पना होती.

ॲंड्र्यू फ्रासरने रेमंडचे 'फुल एम्प्लॉयमेंट ॲट एनी कॉस्ट' वाचले होते. अवमूल्यनाला रेमंडने केलेला विरोध त्याला पटत होता. त्याचे म्हणणे एवढेच होते की हॅरॉल्ड विल्सननी निवडणूक जिंकल्याबरोबर ताबडतोब अवमूल्यनाचा निर्णय घ्यायला हवा होता. म्हणजे अवमूल्यनाची जबाबदारी आधीच्या कॉन्झर्व्हेटिव्ह सरकारवर टाकता आली असती. आता साडेतीन वर्षे लेबर पार्टीचे सरकार सत्तेवर राहिल्यानंतर जर पौंडाचे अवमूल्यन केले तर, आपल्या पार्टीला निवडणूक जिंकणे कठीण जाईल असे त्याचे मत होते; पण त्याने जाहीरपणे त्याची वाच्यता केली नाही.

त्याच्या पत्नीचा लुइसचा आता नववा महिना भरत आला होता. मागच्या वेळेसारखा आपल्या उत्साहामुळे तिला मानसिक ताण पडू नये म्हणून ॲंड्र्यू तिच्या भोवती सतत घोटाळत रहात नसे, वेस्ट-

मिनिस्टरमधून घरी परतेपर्यंत त्याला रात्रीचे अकरा–साडे अकरा होत असत.

लुईस एक आठवडा आधीच हॉस्पिटलमध्ये दाखल झाली. डॉक्टर एलिझाबेथ कस्लेकनी तिला सांगितले की ह्या वेळी तिला कसलीच चिंता करायचे कारण नव्हते. दोन दिवसांनी लुईसने तिच्यासारख्याच निळ्या डोळ्यांच्या मुलीला जन्म दिला.

अँड्र्यू त्यावेळी स्कॉटिश ऑफिसमध्ये ग्लॅसगोच्या घरे बांधणीच्या प्रश्नावर खात्यातील अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करीत होता. 'सेंट मेरीज' हॉस्पिटलच्या नर्सने फोन करून त्याचे अभिनंदन केले. अँड्र्यूने ऑफिसच्या फ्रिजमधून शँपेनची बाटली काढली आणि बसलेल्या सर्व अधिकाऱ्यांसाठी प्लॅस्टिकच्या मगमधून शँपेन ओतली.

अँड्र्यू हॉस्पिटलमध्ये पोहोचला तेव्हा सायमनच्या बायकोला—डॉक्टर एलिझाबेथ कस्लेकला ड्यूटीवर पाहून त्याला हायसे वाटले. एलिझाबेथने त्याला सांगितले की, सिझेरियन करावे लागले पण लुईस आणि त्याची मुलगी दोघेही सुखरूप आहेत.

एलिझाबेथ त्याला मुलगी दाखवायला घेऊन गेली. दक्षता म्हणून मुलीची वेगळ्या वॉर्डमध्ये वैद्यकीय तपासणी चालली होती. अँड्र्यू ऑफिसला परत आला आणि त्याने शँपेनची दुसरी बाटली उघडली !

रात्री साडे अकराच्या सुमारास तो घरी परतला. तो बिछान्यात पडल्या पडल्याच त्याला गाढ झोप लागली. झोपताना फक्त लुईसने म्हटल्याप्रमाणे मुलीचे नाव क्लेअर म्हणून ठेवण्याचे त्याने नक्की केले.

सकाळी बराच वेळ फोनची घंटा वाजत राहिली. अँड्र्यूने बिछान्यावरूनच फोन घेतला. डॉक्टर एलिझाबेथचा आवाज ऐकताच तो बिछान्यात उठून बसला.

पाच मिनिटात गाडी काढून तो 'सेंट मेरीज' हॉस्पिटलमध्ये आला. लुईसचा वॉर्ड आता त्याला पाठ झाला होता. दारातच डॉक्टर एलिझाबेथ उभी होती. तिचा चेहरा उतरलेला होता. जे घडले ते अँड्र्यूला कसे स्पष्ट करायचे याचा तिला प्रश्न पडला होता.

'चाळीस मिनिटापूर्वी तुमची मुलगी मरण पावली. तिची हृदयक्रियाच बंद पडली. आम्ही सगळे प्रयत्न करून पाहिले.'

अँड्र्यूचे डोके बधीर झाले. बराच वेळ त्याच्या तोंडून शब्दच फुटेना.

'लुईस कशी आहे ?' त्याने धीर करून विचारले.

'लुईसला आम्ही अजून सांगितले नाही. ती शुद्धीवर यायची आहे तिने मुलीला पाहिलेही नाही.'

अँड्र्यू बराच वेळ हाताची मूठ मांडीवर आपटत राहिला. मग अचानक उठून उभे राहात म्हणाला, 'मीच सांगतो तिला' आज बरेच वर्षांनी त्याला रडायला यायला लागले.

अँड्र्यू आत आल्याचे लुईसला लगेच कळले पण तिच्या तोंडून शब्द फुटेपर्यंत एक तास गेला.

'मला ठाऊक आहे अॅलिसन मॅकेंझीपासून तुला खूप मुले झाली असती.' त्याचा हात हातात घेत लुईस म्हणाली.

'खरं आहे; पण ती सगळी पोरं विद्रुप आणि मूर्ख निघाली असती.' अँड्र्यू म्हणाला.

'पण ती अॅलिसनमुळे नाही त्यांच्या बापामुळे.'

ती दोघंही परत हसायला लागली.

## राजिनाम्याची घोषणा

रेमंडला ज्याची भीती वाटत होती तेच घडले. गुरूवार, १६ नोव्हेंबर, १९६७ ला हॅरॉल्ड विल्सन आणि त्यांच्या कॅबिनेट कमिटीने पौंडाच्या अवमूल्यनाचा निर्णय घेतला. शनिवारी दुपारपर्यंत सरकारने निर्णय जाहीर केला. तीव्र पौंडाच्या घसरगुंडीमुळे बँक ऑफ इंग्लंडला साठ कोटी पौंडाचे नुकसान सोसावे लागले.

पंतप्रधानांचे स्टेटमेंट बीबीसीवर आले तेव्हा रेमंड त्याच्या लीडस् मतदार संघात लेबर पार्टीच्या कार्यालयात बसून मतदारांच्या अडचणी ऐकत होता. शनिवार आणि रविवार हाऊस ऑफ कॉमन्सला सुट्टी असल्याने सर्वसाधारणतः सर्वच सभासद ह्या वेळात त्यांची मतदार संघातली कामे आटोपतात. आपल्याकडे दर पाच वर्षांनी मतदारांना भेटण्याची पद्धत आहे. ब्रिटिश एम्.पीज् दर आठवड्याला मतदारसंघाला भेटी देतात. रेमंड त्याला भेटायला आलेल्या एका जोडप्याशी त्यांच्या घराच्या प्रश्नाबद्दल बोलत असतानाच लेबर पार्टीचा एक कार्यकर्ता धावतपळत कार्यालयात आला.

रेमंडला बाजूला घेऊन त्याने बातमी दिली. पौंडाची किंमत २.८० डॉलरवरून २.४० डॉलरपर्यंत घसरली होती. रेमंडला क्षणभर अंगातले त्राणच गेल्याचा भास झाला. भेटीला आलेल्या लोकांना थांबायला सांगून त्याने लंडनच्या ऑफिसला फोन लावला. बातमी खरी होती. हॅरॉल्ड विल्सन आणि कॅबिनेट कमिटीच्या फक्त बारा मंत्र्यांना हा निर्णय गुरूवारपासून ठाऊक होता.

रेमंडने त्याच्या पत्नीला—जॉईसला बोलावून बातमी दिली आणि सांगितले जर कुणाचा फोन आला तर तो बाहेर गेला आहे म्हणून सांगावे. रेमंडने त्याला भेटायला आलेल्या लोकांच्या अडचणी ऐकून घेतल्या. त्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या मनात काय खळबळ चालली आहे याचा कुणालाच थांगपत्ता लागला नसता. काम आटोपल्यावर तो तडक आईवडिलांच्या घरी आला. जॉईसने त्याला सांगितले की, जवळ जवळ पन्नास वेळा तरी फोन वाजला असेल. शेवटी तिने रिसिव्हरच बाजूला काढून ठेवला.

'तू काय ठरविले आहेस ?' जॉईसने विचारले.

'राजिनामा द्यायचा.'

'पण तुझी करिअर ?'

'त्याला इलाज नाही. माझे बोलणे तुला मुर्खासारखे वाटेल पण जॉईस आता प्रश्न तत्त्वाचा आहे.

जॉईसला त्याचा स्वभाव माहीत होता. ती गप्प बसली. रेमंडने त्याच्या खोलीत बसून एक पत्र खरडले.

शनिवार, नोव्हेम्बर १८, १९६७

डिअर प्राइम मिनिस्टर,

अवमूल्यनाबद्दलची तुमची घोषणा आज दुपारी माझ्या कानी आली. गेले दोन महिने मी जाहिरपणे बाहेर आणि हाऊस ऑफ कॉमन्समध्ये अवमूल्यनाला विरोध केलेला आहे. अशा परिस्थितीत अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर एम्प्लॉयमेंट म्हणून सरकारात रहाणे मला उचित वाटत नाही.



**रेमंड – कसोटीचा क्षण जवळ आला**

¤

माझ्या पदाचा राजिनामा पाठवून देत आहे. या पुढे साधा सभासद म्हणून मी लेबर पार्टीच्या सरकारला सभागृहात पाठिंबा देईल.

रेमंड गोल्ड

रेमंडने पत्र ताबडतोब पंतप्रधानांच्या निवासस्थानी पाठवून दिले.

कामाच्या गडबडीत रविवारी सकाळपर्यंत हॅरॉल्ड विल्सनला रेमंडचे पत्र पहायला वेळ झाला नाही. सकाळी पत्र वाचताच त्यांनी रेमंडला फोन लावला.

'रे'

'गुड मॉर्निंग प्राइम मिनिस्टर'

'तू अजून वार्ताहरांशी बोलला नाहीस ना ?'

'नाही. तुम्हाला पत्र मिळेपर्यंत राजिनामा वृत्तपत्रात जाहिर करायचा नाही असे ठरविले होते मी.'

'उत्तम. मला भेटेपर्यंत कुणाशीच काही बोलू नकोस. तुला ताबडतोब येथे येता येईल का ?'

'येस. प्राइम मिनिस्टर.'

'पण वार्ताहरांना टाळून ये.'

रेमंड ताबडतोब लंडनला निघाला. तो लंडनच्या त्याच्या लान्स डाउन रोडवरच्या घरी पोहोचला तेव्हा तेथेही फोन वाजतच होता. रेमंडने फोन उचलला.

'हॅलो,

'इज दॅट रेमंड गोल्ड'

'कोण बोलत आहे ?'

'जर्नॅलिस्ट वॉल्टर टेरी, डेली मेल.'

'मला काहीच बोलायचे नाही.'

'हॅरॉल्ड विल्सननी अवमूल्यन केले ते योग्य आहे असे म्हणावयाचे आहे का तुम्हाला ?'

'वॉल्टर, मला काहीही बोलायची इच्छा नाही.'

'याचा अर्थ तुम्ही राजिनामा देणार असा करायचा का ?'

'मला कोणतेही स्टेटमेंट द्यायचे नाही.'

'तुम्ही आधीच राजिनामा पाठवून दिला आहे हे खरे का ?'

रेमंड गप्प बसला.

'माझा अंदाज खरा होता म्हणायचे तर.'

'मला काहीही सांगायचे नाही.' असे म्हणून रेमंडने फोन खाली ठेवला.

रेमंडला पंतप्रधानांच्या सचिवाने पाठविलेले पत्र दारात पडलेले दिसले. रेमंडने ते घाईघाईने उघडले. पंतप्रधानांच्या निवासस्थानात मागच्या दाराने शिरण्यासंबंधी सूचना होत्या आणि पत्रासोबत घराचा नकाशा जोडलेला होता. पुढच्या दारात वृत्तपत्रांचे फोटोग्राफर उभे असणार म्हणून ही काळजी.

रेमंड घराबाहेर पडला तो कंपाऊंडबाहेर दोन वार्ताहर त्याचीच वाट पहात उभे.

'तुम्ही राजिनामा दिलात ?'

'नो कॉमेंट'

'तुम्ही पंतप्रधानांना भेटायला चालला आहात काय ?'

काही एक उत्तर न देता रेमंड गाडीत बसला आणि ड्रायव्हरला गाडी टेन डाउनिंग स्ट्रीटवर घेण्यास सांगितले.

मागच्या दाराने रेमंड आत शिरला तेव्हा पंतप्रधानांचा सचिव त्याला हॅरॉल्ड विल्सनच्या अभ्यासिकेत घेऊन गेला. पंतप्रधानांबरोबर एम्प्लॉयमेंट खात्याचे कॅबिनेट मिनिस्टरही बसलेले होते.

वेळ वाया न घालवता हॅरॉल्ड विल्सननी त्यांना त्याचे पत्र मिळाल्याचे सांगितले; पण त्यांचे म्हणणे होते की, यातूनही मार्ग काढता येईल. रेमंडच्या राजिनाम्याने सरकारही अडचणीत आले असते.

रेमंडला दुसरा कोणताच मार्ग दिसत नव्हता.

हॅरॉल्ड विल्सन म्हणाले की, त्यांनीही रेमंडचे 'फुल एम्प्लॉयमेंट अॅट एनीकास्ट' हे पुस्तक वाचले होते. रेमंडचा अवमूल्यनाला असलेला विरोध त्यांना समजत होता; पण त्यांच्या पुढे अवमूल्यनाखेरीज दुसरा पर्याय नव्हता.

'तू राजिनामा देऊ नकोस. तुझी फॉरेन ऑफिसमध्ये मिनिस्टर ऑफ स्टेट म्हणून बदली करता येईल.'

रेमंड क्षणभर गोंधळला.

'फायनान्स मिनिस्टरांनीसुद्धा राजिनामा दिला आहे; पण मी तो स्वीकारणार नाही. त्यांची बदली होम डिपार्टमेंटला करता येईल. तुझ्यासारखा सहकारी गमावून आम्हाला चालणार नाही.

कसोटीचा क्षण जवळ आलेला होता. आता निर्णय घेणे कठीण होते. रेमंडने त्याचा निर्णय पंतप्रधानांना सांगितला.

सोमवारी दुपारी अडीचपर्यंत सभागृह पूर्णपणे भरले होते. सगळे सभासद दाटीवाटीने बसलेले होते. प्रेक्षकांच्या गॅलरीतही गर्दी होती.

सुरुवातीस रेमंड त्याच्या खात्याला विचारलेल्या एका प्रश्नाचे उत्तर द्यायला उभा राहिला. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना देण्यात येणाऱ्या सवलतीबद्दलचा प्रश्न होता.

रेमंड उत्तर देण्यासाठी उठून उभा राहिल्याबरोबर कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्यांनी 'रिझाईन' 'रिझाईन' म्हणून घोषणा द्यायला सुरुवात

केली. रेमंडने प्रश्नाला उत्तर दिले; पण ते गदारोळात कुणालाच ऐकू गेले नाही. तो खाली बसला.

दुसरा प्रश्न सायमन कस्लेकने विचारला होता. प्रश्न साधाच होता. 'मिडलॅंडस् भागात बेकारी वाढत आहे याबद्दल डिपार्टमेंट ऑफ एम्प्लॉयमेंटकडे काय माहिती आहे ?'

रेमंड परत उत्तर द्यायला उभा राहिला.

'या भागातले गाड्यांचे सुट्टे भाग बनविणारे दोन कारखाने बंद पडल्याने बेकारीचे प्रमाण गेल्या दोन महिन्यात वाढले आहे. ब्रिटिश लेलॅंड ह्या कंपनीत गेले चार महिने चाललेल्या संपाचा परिणाम ह्या कारखान्यांवर झाल्याने ते कारखाने बंद करणे भाग पडले.'

सायमन उपप्रश्न विचारायला उभा राहिला.

'मागच्या एप्रिलमध्ये झालेल्या तुमच्या भाषणात तुम्ही म्हणाला होतात की, अवमूल्यनामुळे मिडलॅंडस् काय पण साऱ्या देशात बेकारी वाढेल. यासाठीच तुमचा अवमूल्यनाला विरोध होता. आता तुमच्या विरोधाला न जुमानता तुमच्याच सरकारने पौंडाचे अवमूल्यन केले. तुम्ही राजिनामा देणार काय ?'

सायमनने काळजीपूर्वक त्याचा प्रश्न तयार केला होता. कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्यांनी पुन्हा जोरजोराने रेमंडच्या राजिनाम्याची मागणी केली.

रेमंडने उठून सांगितले की, सायमनने चुकीच्या संदर्भात त्याच्या मागच्या भाषणाचा उल्लेख केला आहे. रेमंडला वाटले की, आता कसाबसा साडेतीनपर्यंत वेळ काढला की, आपली यातून सुटका होईल. साडेतीननंतर फायनान्स मिनिस्टरचे अवमूल्यनाबद्दलचे स्टेटमेंट सुरू होणार होते.

पण सायमन पुन्हा उठून उभा राहिला. रेमंडचे 'एम्प्लॉयमेंट ॲट एनी कास्ट' हे पुस्तक हातात उंच धरून सभासदांना दाखवित त्याने विचारले.

'एम्प्लॉयमेंट ॲट एनी कास्ट म्हणजे अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्यांची एम्प्लॉयमेंट का ?' सभागृहात हशा पिकला.

'तुमचे सभागृहातील भाषण, वृत्तपत्रातील मुलाखती आणि तुमचे लिखाण यात काही सुसंगती आहे असे तुम्हाला वाटते का ?' सायमनने पुढे विचारले.

रेमंडचा चेहरा काळा ठिक्कर पडला. कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्य 'रिझाईन' 'रिझाईन' ओरडत असतानाच साडेतीन वाजले आणि रेमंड सभागृहातून बाहेर पडला.

फायनान्स मिनिस्टर अवमूल्यनाबाबत सरकारची बाजू मांडण्यासाठी उभे राहिले. सुरुवातीलाच त्यांनी सांगितले की, अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर एम्प्लॉयमेंट रेमंड गोल्ड यांनी शनिवारी रात्रीच त्यांचा राजिनामा पंतप्रधानांकडे पाठवून दिला होता. केवळ पंतप्रधानांनी त्यांना विनंती केली की, फायनान्स मिनिस्टरचे अवमूल्यनाबद्दलचे स्टेटमेंट पुरे होईपर्यंत त्यांनी राजिनामा जाहीर करू नये म्हणून ते गप्प राहिले. फायनान्स मिनिस्टरांनी पुढे रेमंडने डिपार्टमेंट ऑफ एम्प्लॉयमेंटमध्ये केलेल्या कामाची स्तुती करून अवमूल्यनाबद्दलची सरकारची भूमिका मांडायला सुरुवात केली.

सायमनला एकदम खजील झाल्यासारखे वाटले. फायनान्स मिनिस्टरांच्या भाषणात कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्यांनी जराही अडथळा आणला नाही.

अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर स्कॉटलर ॲंड्र्यू फ्रासरने रेमंडचे त्याच्या कार्यालयात जाऊन अभिनंदन केले.

'फायनान्स मिनिस्टरांच्या भाषणाला तू थांबायला पाहिजे होतेस. एकदम हवा गेलेल्या फुग्यासारखी सगळ्या कॉन्झर्व्हेटिव्ह सदस्यांची परिस्थिती झाली.' ॲंड्र्यू म्हणाला.

त्यानंतर बऱ्याच सदस्यांनी येऊन रेमंडचे अभिनंदन केले. रात्री रेमंड बराच उशिरा घरी परत आला. सकाळी उठून त्याने टपाल पाहिले. देशातल्या वेगवेगळ्या भागातून त्याला पत्रे आली होती. सगळ्याच लोकांनी त्याच्या निर्णयाचे स्वागत केले होते. रेमंडने त्यातले एकच पत्र जपून ठेवले.

सोमवार, नोव्हेंबर २०, १९६७

डिअर गोल्ड,

मला प्रथम तुझी माफी मागितली पाहिजे. राजकारणात आपल्या सगळ्यांच्याच हातून कधीन् कधी चुका होतात आणि आज माझ्या हातून मूर्खपणा झाला. पक्षाने घेतलेल्या अवमूल्यनाच्या निर्णयाविरुद्ध तू ज्या प्रकारे उभा राहिलास त्याबद्दल मी तुझे अभिनंदन करतो. तुझ्या वागण्यामुळे सर्वच सभासदांना तुझ्याबद्दल जो आदर वाटला त्याचा मला खरोखरच हेवा वाटतो.

सायमन कस्लेक

( क्रमशः )


अब्राहम लिंकन

**फाळणी टाळणारा महापुरुष**

• वि. ग. कानिटकर

भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डिलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे: ४००, किं. १५० रु.

**राजहंस ऑगस्ट ८४ योजनेत सहभागी व्हा.**

सविस्तर योजनापत्रक मागवा.

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

# गारांचा पाऊस

शोभा भागवत

# देणाऱ्याचे हात

मुलीच्या शाळेत मी गेल्या वर्षी पालक म्हणून दर गुरुवारी जायची. त्या दिवशी ज्या बाई आल्या नसतील त्यांचा वर्ग सांभाळायचा. मुलांना गोष्टी सांगायला, गाणी म्हणायला, खेळ घ्यायला, गोष्टींची नाटचीकरणं करायला मजा यायची. सुरुवातीला बोलूनबोलून घसा दुखायला लागायचा. बाई कशा काय शिकवत असतील असं वाटायचं. मग हळूहळू खालच्या आवाजात बोलूनही वर्ग शांत ठेवणं जमायला लागलं. कधी वाटायचं वर्गातून आवाज बाहेर जाता कामा नये हे दडपण नसलं तर वर्ग सांभाळणं जास्त सोपं जाईल. काहीही विचारलं की 'बाई मी' 'बाई मी' करत हात वर करून पुढे पुढे येणाऱ्या मुलींना जागेवर बसवता बसवता पुरेवाट व्हायची. बाकावर बसायचा, एका जागी अडकून रहायचा मुलींना कंटाळा येतो. वर्गात जास्त मोकळी जागा हवी असं वाटायला लागलं. मग बाकं जरा मागे सरकवून सगळ्यांनीच मोकळ्या जागेत दाटीवाटीनं बसायचं आणि गोष्ट ऐकायची असं केलं. काहीही वेगळं म्हटलं की, मुली खूष व्हायच्या.

एरवी जे करायला मिळत नाही फारसं ते मुक्तपणे करू दिलं की, मुली मजेत असायच्या. बाकांवर उभं राहून गाणं म्हणणं, प्रत्येकीनी फळ्यावर एक छोटं चित्र काढून जाणं, बाकावर डोकं टेकून झोपून नुकतीच ऐकलेली गोष्ट डोळ्यांसमोर आणणं एखाद्या गोष्टीचं एकेक वाक्य सांगून सवंध वर्गानी त्याचा अभिनय करणं अशा गंमतीच्या गोष्टी असायच्या.

पहिलीच्या वर्गात चल रे भोपळ्या टुणुक टुणुकची गोष्ट सांगत असताना एकेका वाक्याचा अभिनय संवंध वर्ग करत होता. त्यात मग म्हातारी चालली लेकीकडे म्हटल्यावर सगळ्या सत्तरच्या सत्तर मुली काठी टेकत टेकत दुसरा हात कमरेवर ठेवून बाकांच्या मधल्या जागेतून पुढे पुढे यायला लागल्या ते गोड दृश्य मी कधी विसरणार नाही. सगळ्या वाघोबा होत होत्या, सगळ्या कोल्हा होत होत्या. मजा यायची अगदी.

एकदा ड वगैरे वर्गातल्या मुलींना म्हटलं होतं तुम्हाला काय काय करायला आवडतं ते लिहा. मुलींनी दहा–पंधरा मिनिटात पटापट कागद लिहून दिले तर एका मुलीनी सत्तर गोष्टी लिहिल्या होत्या करायला आवडतात अशा. आपल्याला असं लिहायला सांगितलं तर आपण किती गोष्टी लिहू शकू? ह्या ७० गोष्टी १५ मिनिटात लिहू शकणाऱ्या मुलीला शाळेच्या भाषेत 'ड' वर्गात का टाकायची? मुलांना स्वत:ला ओळखायला शिकविण्यासाठी असे खूप प्रकार शोधून काढायला हवेत. शाळेच्या वयात त्यांना हे कळायला लागलं तर घरी–दारी बसणाऱ्या शिक्क्यांपासून मुलांचा बचाव होईल.

ह्या शाळेतल्या कामाच्या काळात वर्गात एका मुलीचा वाढदिवस होता. तिची आई मुलींना वाटण्यासाठी पेन्सिली घेऊन आली होती. त्या पेन्सिली वाटण्याची जबाबदारी माझ्यावर आली तेव्हा मुली 'बाई मला' 'बाई मला' म्हणून जो काही गलका आणि ढकलाढकली करत होत्या ते पाहून मला फार अस्वस्थता आली. काय शिकवतो आहोत ह्या मुलींना आपण? असं मनात आलं.

नंतरच्या एका वाढदिवसाच्या वेळी टेबलावर ओळीनी पेन्सिली मांडल्या आणि मुलींना एकेकीनी येऊन घेऊन जा असं म्हटलं. यावेळी गोंधळ खूपच कमी झाला. मारामारी ढकलाढकली नव्हती. 'बाई मला' नव्हतं.

देणं आणि घेणं यातली माधुरी टिकवून हा प्रकार कसा करता येईल? आपल्या आनंदात सर्वांना सहभागी करून घेणं ही एक कला आहे. त्यात खूप आनंदही मिळतो. दुसऱ्या कोणा एकाच्या आनंदात इतरांनी सहभागी होणं हा त्या इतरांनाही काही शिकवणारा अनुभव असतो. ह्या पेन्सिली वाटण्याच्या प्रकारात हा साध्य होतो का? मला फार शंका आहेत.

मुलांवरचा खर्च म्हणून त्यात कपात करत करत आपल्याला परवडतं एवढंच असं म्हणून चार पेन्सिलींची खोकी शाळेत वाटणं यातून आपण मुलाला काय देतो? स्वत:ला कोणतं समाधान मिळवतो? इतर मुलांना काय देतो? ह्या देण्या-घेण्याच्या प्रकारात माणसं म्हणून मुलांची आपण काय किंमत करतो?

एकदा एका बालवाडीत हे दृश्य पाहिलं होतं ते मला फार लागलं होतं. पोरं खाली जमिनीवर बसलेली. 'सकस आकार' म्हणून शेंगदाण्यांची पाकिटं वाटणं सुरू होतं. बाई हातात पुड्या घेऊन उभ्या आणि जराही न वाकता त्या पोरांच्या घोळक्यात एकेक पुडी फेकत होत्या. एकेक मूल ते धावपळ करत उचलत होतं. कधी इतरांच्या हातून हिसकून घेत होतं. बाई ओरडत होत्या, मधूनच एखादा दणका मारण्यासाठी वाकत होत्या. पुन्हा ताठ उभ्या राहून पुड्या फेकत होत्या.

असं जेव्हा आपण मुलांशी वागतो, तेव्हा मुलांना आपण भिकारी बनवत असतो असं नाही वाटत मोठ्या माणसांना? तुम्ही मोठे आहात, तुम्ही काही देऊ शकता म्हणून, तुम्हाला इतरांना भिकारी करण्याचा मक्ता मिळू शकतो? मुलांच्या आत्मप्रतिष्ठेचे असे लचके तोडायचे आणि पुढे काय ही शेळपट किंवा उद्धट तरुण पिढी म्हणून बोटं मोडायची. हे का करतो आपण?

देण्यामध्ये आनंद आहे निश्चित आहे पण त्याला उपकाराचा, गर्वाचा, दानांचा वास आला तर हा आनंद खरा नाही. घेण्यातही आनंद आहे; पण तो लाचारी, ओशाळेपणा शिकवत असेल तर तो नाही मिळाला तरी चालेल.

आई-वडिलांनी काय, शिक्षकांनी काय किंवा इतर कुणी काय मुलांना काही देताना हा विचार करायलाच हवा. आपण मुलांना काही देतो तेव्हा त्यांच्याकडून काय अपेक्षा करतो? देतो त्या त्यांच्यावरच्या प्रेमानी. ते घेण्याचा त्यांचा हक्कच आहे. आपण हा उपकार करत नाही असं समजून देतो का त्यांना आपले ओशाळे बनवण्यासाठी काही देतो? अगदी आपापल्या घरात आपल्या मुलांना काही देतानाही हा विचार आपण करून पाहू या.

विंदा करंदीकर आठवतात— देणाऱ्याने देत जावे। घेणाऱ्याने घेत जावे। घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे ॥

हे मुलांना शिकवायचंच आपल्याला. देऊन विसरायला शिकवायचंय्. घेऊन लक्षात ठेवायला शिकवायचं.

□

# रंगभूमी १९८४ : एक दृष्टिक्षेप

वि. भा. देशपांडे

नाटक आणि रंगभूमी यांच्या हिशेबात १९८४ या वर्षाचा विचार करायचा (१९८३ तील अखेरची नाटके गृहीत धरावी लागतील.) तर प्रथमदर्शनी ध्यानात येते की, चांगल्या नवीन नाटकांची संख्या अल्प स्वरूपातच आहे. तेंडुलकर वगळता कानेटकर, दळवी आणि मतकरी, सई परांजपे, मधुकर तोरडमल या व्यावसायिक नाटककारांच्या कलाकृती नव्याने आल्या. त्या जोडीला विद्याधर पुंडलिक, कॅ. वेलवलकर, अशोक पाटोळे, मंगेश कुलकर्णी, श्रीनिवास भणगे, राजन मोहाडीकर आदींच्या नाट्यकृतीही आल्या.

यामध्ये जयवंत दळवी यांची दोन्ही नाटके (मुक्ता आणि पर्याय) विशेष प्रभाव पाडू शकली नाहीत. तसेच रत्नाकर मतकरी यांच्या दोन नाटकांपैकी (अग्निदिव्य आणि वटवट सावित्री) अग्निदिव्य प्रभावीत करू शकले नाही. अग्निदिव्य आणि पर्याय ही दोन्ही नाटके हुंडाबळी या विषयावरची आहेत. त्यात अग्निदिव्य हे तर एका प्रसिद्ध खटल्यावर आधारलेले होते. वास्तविक ही दोन्ही नाटके आपापल्या पद्धतीने दोन्ही नाटककारांनी आवश्यक त्या गांभीर्याने लिहिली होती. विषय समाजमनाच्या जिव्हाळ्याचा, जीवनाच्या वास्तवाचे दर्शन घडवणारा! असे वाटले होते की, या वास्तव विषयामुळे ही नाटके मोठ्या प्रमाणात जनमानसापर्यंत जाऊन बहुचर्चित होतील. पण तितक्या प्रमाणात तसे घडले नाही. काही प्रमाणात 'पर्याय' नाटकाची चर्चा झाली, ती चर्चा नाटकाच्या अखेरीबद्दलची होती. दळवींनी त्यामध्ये सोबती या संघटनेद्वारा काढलेला उपाय किंवा पर्याय जो सांगितला आहे त्यावर काहीशी उलटसुलट चर्चा झाली. समस्याप्रधान नाटकाच्या संदर्भात नाटककाराने त्या प्रश्नाचे किंवा समस्येचे उत्तर द्यावे असे कोणीच म्हणणार नाही; पण नाटककार आपल्या लेखनातून उत्तराची दिशा सूचित करू शकतो किंवा त्याच्या मनातले उत्तराचे पर्याय सांगू शकतो. ते सांगताना नाटकाच्या लेखनात कृत्रिमता येणार नाहीना किंवा नाट्यलेखनाचा तोल ढळणार नाहीना याची काळजी घेणे अगत्याचे असते. 'पुरुष' नाटकातही दळवी नाटकाच्या अखेरीस निश्चितपणाने काही सांगू इच्छितात, त्यात काही गैर असे नाही. त्या नाटकाचे लेखन आणि प्रयोग दोन्ही तितकेच समतोलाने गेल्याने त्याला प्रेक्षकांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात मिळत गेला आणि अद्यापही मिळत आहे. पण 'पर्याय' नाटकाला ते यश लाभले नाही. कारण त्यामध्ये दळवींनी विषयाची केलेली मांडणी, त्यासाठी निवडलेले प्रसंग, व्यक्तिरेखन हे खोलवर परिणाम करणारे ठरले नाही. मुळात ज्या घरातल्या माणसांच्या संदर्भात ते नाटक घडते ते कुटुंब अपवादात्मक वाटावे असे आहे. त्यामुळे त्यावरून सार्वजनिक स्तरावरचे निर्णय काढताना अनेक प्रश्न अनुत्तरीत राहतात. नाटक परिणामाला उणावते. मतकरींच्या 'अग्निदिव्य' बाबतही तसेच घडले. घटना-प्रसंगांमध्ये नाटक अधिक अडकून पडल्याने मूळच्या प्रश्नाची दाहकता जाणवली नाही. याउलट अशाच कौटुंबिक प्रश्नावरचे त्यांचे आधीचे नाटक 'माझं काय चुकलं?' हे मोठ्या प्रमाणात प्रयोग करून गेले. अजूनही अधूनमधून प्रयोग चालू आहेत.

या वर्षात विनोदी, फार्सिकल पद्धतीची नाटके विशेष तेजीत होती. त्याही आधीच्या वर्षापासून चालत आलेले 'शांतेचं कार्टं चालू आहे' या नाटकाचे नुकतेच २०० प्रयोग झाले. त्यातले केवळ पुण्यात ७५ प्रयोग झाले. 'प्रेमाच्या गावा जावे'ने २०० प्रयोग केले. सई परांजपेचे 'सख्खे शेजारी' अशोक पाटोळेचे 'तांदूळ निवडता निवडता' आणि रत्नाकर मतकरींचे 'वटवट सावित्री' ही तीन नाटके प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणात दाद दिल्याने जोरदारपणे चाललेली आहेत. 'प्रेमाच्या गावा' जोरात आहेच. यातून एक गोष्ट निदर्शनाला येते की, सर्वसामान्य नाट्यप्रेक्षकाला मनोरंजनाच्या दृष्टीने हलकी-फुलकी नाटके अधिक प्रिय आहेत. या वर्षापुरते बोलायचे तर गंभीर नाटकांना मिळणारा प्रतिसाद हा नगण्य वाटावा इतका आहे. पण विनोदी-फार्सिकल स्वरूपाच्या नाटकांना मिळणारा प्रतिसाद उदंड आहे. तसा तो मिळायला हरकत घ्यायचे काहीच कारण नाही. पण केवळ अशाच नाटकांना मिळणारा प्रतिसाद हे अभिरुचीच्या संदर्भात विचार करायला लावणारी गोष्ट असते. किंबहुना अशा म्हणजे हलक्या-फुलक्या नाटकांना मिळणाऱ्या प्रतिसादामुळे आपणही तसेच लेखन किंवा प्रयोग करावेत अशी प्रवृत्ती वाढण्याचीही शक्यता असते!

अर्थात वसंत कानेटकरांचे 'वादळ माणसाळतंय' विद्याधर पुंडलिकांचे 'श्रद्धा' ही गंभीर प्रकृती नाटके नुकतीच रंगभूमीवर आलेली आहेत. त्यांच्याबद्दल आत्ताच काही भाकिते करता येणार नाहीत. तसेच सईचे 'सोयरीक' हे विनोदप्रधान नाटक नुकतेच आले आहे. त्याचे स्वागत 'शेजारी'सारखे होते किंवा कसे होते ते पाहायचे.

गेल्या मे महिन्यापासून राम गणेश गडकरी यांचे जन्मशताब्दी वर्ष आरंभित झालेले आहे. काही नाटककंपन्या आणि ठेकेदारमंडळी संयुक्त नटसंच घेऊन एकच प्याला आणि भावबंधन नाटकाचे प्रयोग करीत आहेत. या वर्षी ते प्रमाण साहजिकच वाढले आहे; पण यामध्ये लक्षवेधी भाग आहे तो म्हणजे डॉ. श्रीराम लागू यांनी स्वतः एकच-प्याला नाटकाची रंगावृत्ती तयार करून तो प्रयोग दिग्दर्शित केला आहे. ही रंगावृत्ती पूर्णतः गद्य आहे. संगीताचा वापर पार्श्वसंगीताच्या पद्धतीने केलेला आहे नेपथ्यही सूचक रीतीने वापरलेले आहे. संगीतप्रेमी प्रेक्षकांना हा प्रयोग मानवणारा नाही; पण एक वेगळा प्रयोग म्हणून अवश्य पहाण्याजोगा आहे. तसाच दुसरा एक प्रयत्न 'राजसंन्यास' नाटकाच्या संदर्भात झाला आहे. बाळ कोल्हटकरांनी गडकऱ्यांचे नाटक पूर्ण करून प्रयोगित केले आहे. त्यामध्ये संभाजी आहे यशवंत दत्त.

या वर्षात पुण्यात रंगभूमीच्या दृष्टीने महत्त्वाच्या दोन गोष्टी घडल्या. एक म्हणजे पहिले दलितनाट्य सम्मेलन संपन्न झाले. दुसरी गोष्ट म्हणजे पुण्यातल्या ॲक्टिव्ह थिएटर्सने आयोजित केलेला पहिला नाट्यसमीक्षक मेळावा मोठ्या दिमाखाने पार पडला. दलितनाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होते भि. शि. शिंदे. संमेलनाला विविध ठिकाणचे दलितनाट्य कार्यकर्ते, कलावंत उपस्थित होते. मोठ्या प्रमाणात चर्चा, प्रयोग झाले. नाट्यसमीक्षक मेळाव्याचे अध्यक्ष होते माधव मनोहर. उद्घाटन केले विजया मेहता यांनी. प्रमुख पाहुणे होते विजय तेंडुलकर. या मेळाव्यात जाहीर परिसंवाद आणि नाट्यसमीक्षेविषयी मूलभूत गोष्टींची चर्चा अतिशय गांभीर्याने झाली. महाराष्ट्रातल्या अनेक गावांहून समीक्षक प्रतिनिधी आणि रंगभूमीच्या विविध शाखांत कार्य करणारे कलावंत प्रातिनिधिक स्वरूपात आलेले होते.

मा. दत्ताराम, दत्ता भट, अरुण सरनाईक, अनिल बर्वे, आयरे, हिराकांत कलगूटकर आदी नाट्यक्षेत्रातील काही मंडळी आपल्यातून निघून गेली. दत्तारामबापू गेले काही वर्षे आजारी होते; पण एवढ्यात जातील असे वाटले नव्हते. तीच गोष्ट दत्ता भटांची. अरुण सरनाईक ज्या पद्धतीने अपघातात गेला ते वर्णनाच्या पलीकडचे आहे. ही मंडळी गेल्यावर पुन्हा एकदा जाणवले की, यांच्या भूमिकांचे ध्वनिचित्रिकरण सलगपणाने उपलब्ध नाही. शासन या संदर्भात अद्याप तरी नेमके पाऊल उचलत नाही आणि खाजगी स्तरावरच्या प्रयत्नांना सातत्य नाही. नेमकी दिशा नाही परिणामी असे कलावंत गेले की नुसत्या आठवणी, छायाचित्रे, त्यांच्यासंबंधीचे थोडेफार लेखन यावर समाधान मानायचे ! आपण हे रीतसर संग्राह्य कार्य करण्यासाठी कशाची वाट पहातो आहोत तेच समजत नाही !

गोवा हिंदु असोशिएशनचे हयवदन नाटक जर्मनीचा दौरा करून आले. विशेष म्हणजे हयवदनचा जर्मन भाषेतही प्रवेश झाला. दोन्हीच्या दिग्दर्शिका होत्या विजया मेहता. जर्मन शासनाने विजयाबाईंचा सन्मान त्यांच्या सांस्कृतिक आदान–प्रदान कार्याबद्दल केला. ' वऱ्हाड निघालंय लंडनला ' चे प्रयोग अमेरिका आणि खुद्द लंडनमध्ये लक्ष्मण देशपांडे यांनी केले, तर मालवणी नाटकाचा वानोळा घेऊन मच्छिंद्र कांबळी आपल्या सहकाऱ्यांसह लंडनला जाऊन आले. मुंबईच्या आविष्कार संस्थेने लंडनच्या काही हौशी कलाकारांच्या सहाय्याने एक नाट्यशिबीर आयोजित केले होते. औरंगाबादच्या जिगीषा नाट्यसंस्थेच्या अकरा कलाकार मुलींनी प्रशांत दळवी लिखीत 'स्त्री' नावाची सामाजिक आशयाची एकांकिका पुण्यात चौदा ठिकाणी पेश केली. दिग्दर्शक होता चंद्रकांत कुलकर्णी. मुंबईत ' मुलगी झाली हो ! ' या सामाजिक विषयावरचे महत्त्वपूर्ण नाटक मोठ्या प्रमाणात प्रयोगित झाले.

नागपूरला होणाऱ्या आगामी नाट्यसंमेलनासाठी प्रभाकर पणशीकर यांची अविरोध निवड झाली. वसंतराव कानेटकर, शाहीर साबळे, गोंधळी कलाकार राजारामभाऊ कदम ह्यांना दिल्लीच्या संगीत नाटक अकादमीने सन्मानित केले. शिलेदारमंडळींच्या ' मराठी रंगभूमी ' संस्थेला सांगलीचे विष्णुदास भावे सुवर्णपदक देऊन सर्व शिलादारांचा यथोचित गौरव झाला. प्रभाकर पणशीकरांच्या गौरवार्थ मुंबईला १७ ते २३ डिसेंबर या सप्ताहात नाट्यमहोत्सव केला गेला. यामध्ये कानडी, गुजराथी, मराठी नाटके सादर झाली. पणशीकरांना ५१ हजारांची मिळालेली थैली त्यांनी नाट्यपरिषदेला साभार परत दिली. पुण्यातल्या नाट्यपरिषदेला ज्योत्स्नाबाई भोळे यांच्या प्रयत्नाने ५१ हजार रुपयाचे अनुदान मुख्यमंत्र्यांनी दिले.

१९८४ या वर्षाच्या रंगभूमी कामगिरीवर दृष्टिक्षेप टाकल्यानंतर असे जाणवले की, चांगली नाटके हाताशी फारच कमी लागली पण रंगभूमीविषयक महत्त्वाच्या अनेक चांगल्या घटना अर्थपूर्णरीतीने घडल्या आहेत ! ☐

# कै. विठ्ठल सीताराम गुर्जर जन्मशताब्दी निमित्ताने

## ' एकच प्याला 'ची पद्यरचना

कै. राम गणेश गडकरींचे ' एकच प्याला ' नाटक पहाताना त्यांच्या भाषावैभवाकडे प्रेक्षकांचे मन आकर्षित होते. तद्वतच त्यांच्यातील पदाकडे, सुमधूर संगीताकडेही तो आपोआपच आकर्षित होतो. उत्कृष्ट दर्जेदार पद्यरचना व त्याला शास्त्रोक्त, दर्जेदार संगीताची जोड मिळाल्यामुळे 'एकच प्याला'चे संगीत म्हणजे एक दुग्धशर्करा योगच झालेला आहे. त्यांनी इतर पुष्कळ साहित्य निर्मिती केली; पण ' एकच प्याला 'च्या पद्यरचनेमुळे त्यांचे नाव सर्वत्र झाले.

नाटकाच्या प्रस्तावनेत त्यांनी आपली पद्यरचना म्हणजे गद्याच्या भरजरी सुंदर शालीला मळकट घोंगडीचे ठिगळ असे मोठ्या विनयाने म्हटले आहे; पण वस्तुस्थिती मात्र अशी आहे की, गडकऱ्यांच्या उत्कृष्ट दर्जेदार गद्यभागात चपखल बसण्यासारखाच तितक्याच तोलामोलाचा पद्यभागही उतरला आहे. त्यामुळे ही पदे ठिगळ तर वाटतच नाहीत; पण मूळ नाटककाराचीच ती रचना असावी असे वाटते. इतकी दोन्हींची भाषा सारखीच ओघवती, वैभवशाली आहे. सर्व पात्रांचे मनोगत, भावना ज्याप्रमाणे गडकरींच्या भाषेने प्रगट होतात, तद्वतच ते गुर्जरांच्या पद्यांमुळेही होतात. सिंधूचे कारुण्य, रामलालची देशभक्तीची व समाजसुधारणेबाबतची तळमळ, शरदचे वैधव्यातील वैफल्य इत्यादी सर्वच भावनांकुर गुर्जरांनी आपल्या शब्दरचनेद्वारे पद्यात बसवून साकार केले आहेत. पुढील संपूर्ण कथानकात वाट्यास येणारी कारुण्याची भावना 'अजि लागे हृदयी हुरहूर' या पहिल्याच पदाद्वारे त्यांनी सिंधूबाबत व्यक्त केली आहे. तिचे पातिव्रत्य, भावाची व वडिलांची आर्थिक मदत न घेण्यातील

स्वाभिमान आदी सर्वच भावना यथायोग्य स्वरूपात पदांद्वारे प्रकट झाल्या आहेत. 'असे पती देवचि ललनांना', 'सत्य वदे वचनाला', 'कशि या त्यजू पदाला' या गीतांद्वारे त्यांनी सिंधू साकार केली, तिची व्यक्तीरेखा जास्त बलशाली केली. गीतेच्या शाब्दिक फटकाऱ्यांमुळे उपरती होऊन सुधाकर दारू सोडण्याचा निर्णय घेतो. हा एकच क्षण संपूर्ण नाटकात आनंदाचा म्हणून सिंधूच्या वाटयास आला आहे. 'प्रभू अजी गमला, मनी तोषला' या अत्यंत उत्कृष्ट पदाद्वारे सिंधूचा आनंद व्यक्त केला आहे. आपल्या पतीचे व्यसन सुटले तर आपल्या संसाराची विस्कटलेली घडी पुन्हा पूर्ववत होईल या आनंदाने सिंधू सुखाऊन गेली आहे. या गाण्यास भैरवी रागात स्वरबद्ध करून या गाण्याच्या वेळचे दृश्य म्हणजे नाटकातील एक उत्कट प्रसंग लेखक, गीतकार व संगीत दिग्दर्शक या तिघांच्या संयुक्त प्रयत्नांनी निर्माण झाला आहे.

रामलाल या पात्रास सर्व पदे उपदेशात्मक आहेत. नाटकाचा लेखनकाल १९१४ सालचा म्हणजे पहिल्या महायुद्धाचे वेळचा आहे. रामलालची मातृभूमी म्हणजे भारत त्या वेळी पारतंत्र्यात होता. नाटकाच्या सुरुवातीसच रामलाल इंग्लंडला चालला आहे. मातृभूमीकडे त्याचे मन ओढ घेते आहे. गरीब भारतातून श्रीमंत इंग्लंडमध्ये जाताना त्याला हृदयात तीव्र कालवाकालव होत आहे. 'क्षणी दे कर या दीना' या पदातून त्याची ही तळमळ किती प्रभावीपणे व्यक्त झालीय? सुरुवातीस मातृभूमीच्या वियोगाचे व नंतर सुधाकराच्या व्यसनाचे दुःख यामुळे रामलालच्या पदांवरसुद्धा एक प्रकारची कारुण्याची भावना आहेच. संसारी विषारी तीव्र सत्ये 'मृदुलताधाम' इत्यादी पदांमुळे रामलाल हा नाटकातील एक महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरला आहे. सुधाकराचे व्यसन त्याच्या उपदेशामुळे सुटत नाही हे खरे; पण समाजाला त्या व्यसनातील धोके स्पष्ट करून सांगण्यात आणि त्यावेळची हिंदुस्थानची एकूण हलाखीची परिस्थिती प्रेक्षकांपुढे ठेवण्यात गडकरी व गुर्जर हे दोघेही अपेक्षेबाहेर यशस्वी झाले आहेत. एक अतिशय उच्च, लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेला पुढारी व एक अगदी सामान्य नागरिक दोघेही सारख्याच हक्काने म्हणतात, 'ही माझी मातृभूमी' हे गडकरींचे वाक्य म्हणजे देशभक्तीचा अत्युत्कृष्ट नमुना आहे.

गडकऱ्यांच्या बहुतांशी सर्व नाटकात विधवा स्त्रीचे पात्र असते. 'एकच प्याला' मध्ये शरदच्या स्वरूपात त्यांनी विधवा स्त्रीचे पात्र योजिलें आहे. नायक सुधाकराची ही बहीण. तिच्यात व भगीरथात काही नाजूक प्रेमरज्जू निर्माण होतात. १९१४ साली विधवांची परिस्थिती काय भयानक होती? पुनर्विवाहाचा अजिबात विचार न करता सासरच्या मंडळींच्या आधारे संपूर्ण आयुष्य वैधव्यात काढायचे. या सर्व कारणांमुळे शरदची पदे काहीशी नैराश्यपूर्ण आहेत. विधवा महिलांना विशेषतः तारुण्यातच वैधव्याची कुऱ्हाड कोसळलेल्या महिलांना पुरुषांच्या कामवासनेपासून स्वतःचे संरक्षण करणे किती अवघड आहे हे शरदच्या भूमिकेद्वारे गडकरींनी यथार्थपणे दर्शविले आहे.

स्वररचनेच्या दृष्टिकोनातून गुर्जरांची शब्दरचना काहीशी क्लिष्ट वाटते. तरीपण सौ. हिराबाई पेडणेकरांनी या संस्कृतप्रचूर लांबलचक सामासिक शब्दांना संगीतात कौशल्याने गुंफले आहे. अवजड शब्दांचे नमुने पहा :—

सोडी नच मजवरी **वचनखरतरशरां**
**मृदुलताधाम** जगीं ललनाहृदय।
**सकलशुभतिलय** धरित गुण ललित मधुरता

अशा जाडजाडया शब्दांना स्वरबद्ध करायचे म्हणजे संगीत दिग्दर्शकाची सत्वपरीक्षाच.

**वसुधातलरमणीयसुधाकर**
**व्यसनघनतिमिरी** बुडविसी कैसा

हे रामलालचे बिलावल रागातील पद अत्यंत अवघड शब्दांनी युक्त; पण गायक कलाकार रंगभूमीवर आर्गनच्या साथीत हे पद गाऊ लागला की, हेच बोजड शब्द सुटसुटीत होऊन गीत साकार करतात.

सिंधूच्या सुप्रसिद्ध 'कशी या त्यजू पदाला' या पदात '**सुभगशुभपदाला**' हा असाच जाड शब्द आहे; पण गीतात तो तसा अजिबात भासत नाही. शब्दांनी आपले गद्य रूप टाकून संगीतातील गेयता, काव्यातील सहजता स्वीकारली की, त्यांचे मूळरूप कोठच्या कोठे बदलून जाते.

कोकणातील कशेळी या अगदी आडवळणाच्या गावी विजनवासात राहिलेल्या या प्रसिद्धि पराङमुख कवीने गडकरींसारख्या प्रतिभाशाली भाषाकोविदाच्या नाटकाला तितक्याच तोलामोलाची शब्दरचना करून पद्यांची जोड द्यावी हे खरोखरच विस्मयजनकच म्हटले पाहिजे. कोकणातील घरात असलेले हे अमूल्य साहित्य-धन पावसामुळे भिजून वाया गेले हे दूरदर्शनवरील मुलाखतीत ऐकून फार वाईट वाटले. अशा ह्या उपेक्षित काव्यकोविदास विनम्र श्रद्धांजलि.

—नीलकंठ वासुदेव देशपांडे

---

**चित्रपट**

# नव्या चेहऱ्यांची लाट

नुकतंच ८४ साल संपलंय. नेहमीप्रमाणेच गेल्या वर्षात काय मिळवलं, काय घालवलं याचे हिशेब सगळ्यांच्याच मनात सुरू झाले असतील. कोणी वजाबाकीचं दुःखं भोगलं असेल तर कोणी बेरजेची फळं चाखली असतील. अर्थात काहीही असलं तरी भूतकाळाचे हिशेब तपासण्यापेक्षा भविष्यकाळाची गणितं नव्या उमेदीनं सोडवायला घेणं अधिक चांगलं. निदान चित्रपटसृष्टीच्या बाबतीत तरी असंच म्हणायला लागेल. कारण १९८४ साल संपता संपता अमिताभनं राजकारणात प्रवेश करण्याच्या दृष्टीनं उचललेली पावलं आणि पाठोपाठ केलेली चित्रपटनिवृत्तीची घोषणा. त्यामुळं चित्रपटसृष्टीला चांगलाच दणका दिला.

तसं पहायला गेलं तर गेल्या एक-दोन वर्षांपासूनच अमिताभची चित्रपट कारकीर्द झाकोळत चालल्याची चिन्हं दिसायला लागली होती. 'कुली' चित्रपटाच्या वेळेस अमिताभला अपघात झाला आणि पुढं हे रडगाणं चालूच राहयलं. अमिताभला पहिल्यांदा अपघात झाल्यानंतर हवालदिल झालेले अमिताभचे चाहते पुढं अमिताभच्या अपघात-आजारांची मालिका संपेचना तेव्हा मात्र कंटाळले आणि तेव्हापासूनच अमिताभ चित्रपटात काम करतो का निवृत्त होतो--असं तळ्यात-मळ्यातही

सुरू झालं; पण वर्षअखेरीला इंदिरा गांधींचं आकस्मिक निधन झालं आणि सगळाच कायापालट झाला. कारण मित्र-कर्तव्याचं पालन (?) करण्यासाठी अमिताभ निष्ठेनं (??) पुढं सरसावला आणि त्यानं राजकारणात प्रवेश केला. गरीबांसाठी काही करायचं म्हणून (???) तर ते एक असो. त्याच्या चित्रपटनिवृत्ती मागं राजकारणातील प्रवेश हे एक कारण एकवटलेलं असलं (म्हणजे आता आपण आपलं त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन बोलायचं) तरी गेल्या एक-दोन वर्षांपासून अपघात आजारांनी धरलेली पाठ, शरीरानं नाकारलेली साथ, त्यामुळं चित्रीकरणात निर्माण होणारा खोळंबा आणि विलंब, साचेबंद होत गेलेल्या भूमिका आणि त्यामुळं अमिताभ करिश्मा अद्याप संपुष्टात आला नसला तरी या सदाबहार करिश्म्याला हळूहळू लागलेली ओहोटी.. अशी एक ना दोन अनेक कारणंही होतीच; पण चित्रपटाला वेगळ्या क्षेत्राचा पर्याय मिळेपर्यंत चित्रपट-निवृत्ती जाहीर करण्याचं तो टाळत असावा. चालू राजकीय परिस्थितीच्या निमित्तानं त्याला ही संधी मिळाली आणि या संधीचा फायदा घेत त्यानं एका दगडात दोन पक्षी मारले.

अमिताभनं 'जंजीर' पासून चित्रपटसृष्टीत जे स्थान निर्माण केलं, त्याला गेल्या बारा-तेरा वर्षांत तरी कुणी धक्का लावू शकलं नाही. एवढंच नाही तर पहिले एक ते दहा नंबर स्वतःच बळकावून अमिताभनं जी वन मॅन इंडस्ट्री निर्माण केली तिलाही खिंडार पाडण्याचे प्रयत्न असफल झाले. अमिताभ आणि त्याच्या सुपरस्टारपदाला शह देण्याची भाषा बोलत बरेचजण आले; पण किंबहुना प्रत्येक स्टार सनची सुप्त अपेक्षाही तीच असायची; पण अमिताभपेक्षा जुन्या जाणत्यांना किंवा अमिताभच्या समकालिनांना जे जमलं नाही, ते या पोरा–टोरांना काय जमणार? हे काळानंच दाखवून दिलं. एकूण काय बऱ्याच जणांची वाट लागली तर बऱ्याच जणांनी नाद सोडून दिला. तर नसीरूद्दीन शाह, ओम पुरी या कलात्मक चित्रपटाच्या कक्षेतल्या कलाकारांनी किंवा जितेंद्रसारख्या व्यावसायिक चित्रपटाच्या कक्षेतल्या कलाकारानं सुपरस्टारपदाच्या फारसं नादी न लागता वेगळाच मार्ग निवडला आणि या मार्गावरून ते यशस्वीपणं अमिताभच्या स्पर्धेत उभे राहिलेही. अर्थात अमिताभ आणि वेगळ्या वाटेनं जाणारे या कलाकारांचे मार्ग समांतर असले तरी जनमताच्या तुलनेत मात्र या कलाकारांना अजून बराच पल्ला गाठायचा असल्यानं चित्रपटसृष्टीत प्रवेश करणाऱ्या बहुतांशी नवोदित नटांना नसीरूद्दीन शाह किंवा ओम पुरी यांच्या ऐवजी अमिताभ बच्चन व्हायची ईर्षा असते आणि त्यासाठी ते अमिताभ बच्चनच्याच मार्गानं जाऊ लागतात; पण अमिताभ चित्रपटसृष्टीत असेपर्यंत तरी या नवोदितांची स्वप्नं साकार होणं अवघडच. कारण आतापर्यंत चित्रपटसृष्टीत सुपरस्टार चिक्कार आले आणि गेले; पण या सुपरस्टारांच्या काळात इतरही कलाकार पुढं येऊ शकत होते, इतरही कलाकारांना वाव मिळू शकत होता, साहजिकच सुपरस्टार एक असला तरी चित्रपटसृष्टीत चार निरनिराळे प्रवाहही एकाच वेळेस नांदत होते आणि त्यामुळंच वैविध्यही टिकून होतं. पण अमिताभ सुपरस्टार झाला आणि त्यानं चित्रपटसृष्टीचा सारा चेहरामोहराच बदलून टाकला. कारण त्याच्या कारकीर्दीत अमिताभच सर्वेसर्वा झाला. सुपरस्टार आणि क्रमांक दोनचा कलाकार यांच्यात जवळजवळ नऊ नंबरांइतकं मोठं अंतर पडलं; पण अभिनयाची ताकद सामान्य असूनही शहाला काटशह पद्धतीनं अमिताभच्या स्पर्धेत ताकदीनं उभ राहणाऱ्या जितेंद्रचा एकमेव अपवाद वगळता बाकी सगळे अमिताभचं सावट घेऊनच वावरत राहघले. साहजिकच अमिताभनं निवृत्ती जाहीर केल्यानंतर अमिताभनंतर कोण?– असा प्रश्न उभा राहतो.

## सनी–जॅकी–अनिलकपूर

सुपरस्टारपदासाठी उमेदवार बरेच असले तरी राजेश खन्ना, जितेंद्र, शशीकपूर, धर्मेंद्र वगैरे मंडळी नायकाच्या भूमिकेत बघणं ही शिक्षाच होत असल्यानं प्रश्नच नाही. ऋषीकपूर, कमलहसन या कलाकारांची अवस्था धड ना अल्याड, धड ना पल्याड अशी. कुमार गौरव, संजय दत्त, मोहनीश बहेल, यांना काळानंच आणि प्रेक्षकांनीच बाद ठरवलंय. साहजिकच सध्या तरी सुपरस्टारपदासाठी तीनच नावे प्रामुख्यानं डोळ्यासमोर येतात. जॅकी श्रॉफ, अनिलकपूर, सनी दयोल. पैकी सनी दयोल हा धर्मेंद्रचा मुलगा, अनिलकपूर हा निर्माता सुरेंद्रकपूर यांचा मुलगा, तर जॅकी श्रॉफ हा कोणतीच चित्रपटाची पार्श्वभूमी नसलेला. देखणा चेहरा आणि तगडी शरीरयष्टी लाभलेल्या जॅकीचा चित्रपटापर्यंतचा प्रवास मॉडेलिंगद्वारा झाला असला तरी चित्रपटात यायचं, मॉडेल व्हायचं ही त्याची मनोकामना मात्र कधीच नव्हती. जॅकीला जशी अचानक मॉडेलिंगची ऑफर मिळाली तशीच सुभाष घईकडून 'हीरो' चित्रपटाच्या नायकासाठी. 'हीरो'चं यश मात्र जॅकीच्या मनात भविष्याची नवी स्वप्नं रंगवून गेलं आणि प्रेक्षकांनीही या ताज्या दमाच्या 'अँग्री यंग मॅन'चं उत्साहानं स्वागत झालं. जॅकीच्या मागं सुभाष घई असले आणि त्यांनी 'हीरो'च्या वेळेस जॅकीची पद्धतशीर प्रसिद्धी केली असली तरीही त्या प्रसिद्धीचं प्रमाण इतर स्टार बापांनी आपल्या मुलांना पुढं आणण्यासाठी रचलेल्या प्रसिद्धीच्या तुलनेत निश्चितच कमी होतं. साहजिकच जॅकी पुढं आला तो सर्वस्वी गुणांवरच आणि म्हणूनच त्याचं कौतुकही झालं.

अनिलकपूर हा निर्माता सुरेंद्रकपूर यांचा मुलगा तर निर्माता बोनीकपूर याचा भाऊ असला तरी चित्रपटातला त्याचा प्रवेश मात्र उमेदवारी करत करतच झाला. वास्तविक अनिलकपूर चित्रपटसृष्टीत आला तो बालकलाकार म्हणून आणि छापही पाडून गेला पण बालनट म्हणून काम करण्याचं वय निघून गेल्यावर मात्र पुन्हा नायक म्हणून चित्रपटसृष्टीत स्थिरस्थावर होण्यास त्याला बरीच धडपड करावी लागली. पण बहुतेक बालकलाकार पुढं जसं काळाच्या उदरात गडप होतात, तसं अनिलकपूरचं मात्र झालं नाही. प्रयत्नांनी, धडपड करून का होईना पण स्टारसन्सच्या लाटेच्या तडाख्यातूनही तो बचावला आणि अशा रीतीनं तावून सुलाखून निघालेला अनिलकपूर प्रेक्षकांना भावला. 'हमारे तुम्हारे'त किरकोळ भूमिका केलेला अनिलकपूर 'वो सात दिन'मध्ये नसीरुद्दीन शाहसारख्या कसलेल्या नटाबरोबर तर 'दुनिया' मध्ये दिलीपकुमारसारख्या अभिनय राजाबरोबर उभा राहिला. तितक्याच दमदारपणे. इतर नवोदित नटांच्या तुलनेत

अनिलकपूरच्या करियरला सुरुवात व्हायला उशीर झाला असला तरी त्याच्या करियरला आकार मात्र लवकर आला. कारण एक तर नामवंत कलाकारांच्या कसोटीवर त्याचा अभिनय घासून निघाला. 'वो सात दिन' मधला भोलाभाला गायक, 'दुनिया' तला अँग्री यंग मॅन, 'अंदर बाहर' मध्ये जॅकी-बरोबरचा हलकाफुलका नायक किंवा 'लव मॅरेज' मधला रोमँटिक नायक असं भूमिकांचं वैविध्यही त्यानं कायम राखलं.

जॅकी आणि अनिलकपूरच्या मानानं सनीची पार्श्वभूमी वेगळी. धर्मेंद्रचा मुलगा ही बिरुदावली घेऊन वावरणारा सनी परदेशातून अभिनयाचं शिक्षण घेऊन आलेला. सध्या चित्रपटसृष्टीत पडलेल्या पायंड्यानुसार धर्मेंद्रनं सनीला ब्रेक देण्यासाठी 'बेताब' ची निर्मिती केली आणि वडिलांचा भरपूर पाठिंबा घेऊनच वाजत गाजत सनीनं चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. 'बेताब' तर यशस्वी झालाच. पण धर्मेंद्रचीच प्रतिकृती असलेल्या सनीलाही सगळ्यांनी डोक्यावर घेतला. 'बेताब' नंतर आलेला 'सोहनी महिवाल' ही गाजला. नंतरचे 'सनी' आणि 'मंजिल मंजिल' मात्र पहिल्या दोन चित्रपटांइतके यश मिळवू शकले नसले तरी त्यातल्या सनीच्या भूमिकांबद्दल कोणाचीच फारशी तक्रार नव्हती.

या तिघांजवळ इतर नवोदित नटांपेक्षा खूप काही वेगळं किंवा एखादा जास्तीचा गुण आहे, अशातला भाग नाहीय. सर्वसाधारणपणे नायक म्हणून स्थिर होण्यासाठी आवश्यक छानसं, स्मार्ट व्यक्तिमत्व, बऱ्यापैकी अभिनय आणि चटपटीतपणा आहे. पण हे सगळं असणारे नवोदित नट काही कमी नाहीत. 'एक दूजे के लिए' चा कमल हसन, 'लव स्टोरी' चा कुमार गौरव, 'इन्साफ का तराजू' चा राज बब्बर,... अशी नावांची यादी किती तरी वाढवता येईल. पण पहिल्या चित्रपटाचं यश मात्र या कलाकारांच्या बाबतीत कायम राहिलं नाही. कुमार गौरव, संजय दत्त वगैरे स्टारसन्सना दिली गेलेली प्रदर्शनपूर्व प्रसिद्धी या कलाकारांच्या बाबतीत बेफाम अपेक्षा निर्माण करून गेली आणि त्या अपेक्षा पुऱ्या करण्याची या कलाकारांची ताकदच नव्हती. त्यामुळे त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. जॅकी, अनिलकपूर आणि सनीला अवाजवी प्रसिद्धी कधीच दिली गेली नाही आणि त्यांचा स्वीकार करायचा का धिक्कार करायचा हा निर्णय प्रेक्षकांच्यावर लादला न जाता हा निर्णय आपला आपणच घेण्याची प्रेक्षकांना मुभा दिली गेली. तसंच सनीचा अपवाद वगळता जॅकी आणि अनिलने उमेदवारीची फळं चाखली आहेत. साहजिकच पहिल्या यशाची हवा डोक्यात गेली नाही आणि भलत्यासलत्या कॉमेन्टस् करण्याचं टाळल्यानं या तिघांनीही नाही म्हटलं तरी प्रेक्षकांची सहानुभूतीही मिळवलीच. याशिवाय चित्रीकरणाला नसते नखरेही कधी दाखवले नाहीत. चित्रीकरणाला वेळेवर येणं, सेटवर व्यवस्थित वागणं, यामुळं निर्माता–दिग्दर्शकांची मनही जिंकून घेतली. पहिला चित्रपट यशस्वी झाल्यानंतर फटाफटा रकमा वाढवल्या नाहीत की, भारंभार चित्रपटही स्वीकारले नाहीत. या सगळ्या गोष्टींचा त्यांना निश्चितच फायदा झाला. साहजिकच कमल हसनच्या विदूषकी चाळ्यांना, कुमार गौरवच्या त्याच त्याच रोमँटिक नायकाला, संजय दत्तच्या निरनिराळ्या घोळांना, राज बब्बरच्या चाचपडण्याला, सुनील आनंदच्या कंटाळवाण्या चेहऱ्याला आणि राजीव-कपूरच्या नक्कल करण्याला अल्पावधीतच कंटाळलेल्या प्रेक्षकांच्या अपेक्षा सध्या तरी जॅकी, अनिलकपूर आणि सनी दयोल यांच्यावर एकवटलेल्या आहेत. यांच्यापैकी कोणी सुपरस्टार अमिताभची जागा घेतो का नवीनच कुणी मुसंडी मारून पुढं जातो हेच बघायचं.

—भद्रा

## स्वातंत्र्याचा आभास

पृष्ठ ४ वरून

शक्ती नष्ट होते. गरजा कशासाठी ते ठाऊक नसते. लोक चैन करताना दिसतात; पण ते सुखी नसतात. गरजा भागल्या नाहीत म्हणून दुःख व भागल्यावर आणखी उत्पन्न होऊन दुःखच पदरात पडते. मोटार मिळाल्यावर सुख मिळते म्हणजे काय? त्याचा कोणी विचारच करत नाही. आपण ज्याला मी म्हणतो तो खरा मी नसतोच हे कळणे फार महत्त्वाचे आहे. हे लक्षात आले तर आपण ज्याला यश म्हणतो ती मृगजळासारखी पोकळ व काल्पनिक गोष्ट आहे हे अगोदरच कळेल. या खोट्या मी ऐवजी उत्स्फूर्त प्रेम आले पाहिजे, प्रेम हा गुण आहे व तो फक्त व्यक्तीच्या किंवा वस्तूच्या ठाई प्रकट होतो. एकावर प्रेम व दुसऱ्याचा द्वेष हे खरे प्रेम नसून ती विकृती असते. लहानपणाचे प्रेम उत्स्फूर्त व खरे असते. असे प्रेम कुत्र्याजवळ असते; पण वयाने मोठ्या माणसात नसते.

### काय हवे?

समाज व व्यक्ती यांचे योग्य नाते जोडणे ही गोष्ट शास्त्रांच्या देणग्या राखण्याइतकीच महत्त्वाची आहे. योग्य प्रमाणात विकेंद्रीकरण केले तर त्यात सत्ता विकेंद्रीत होऊन लोकांची कर्तृत्वशक्ती व कर्तृत्वबुद्धी वाढवण्याचा प्रयत्न करता येईल. अर्थात विचारशक्तीच्या बाबतीत सर्व माणसे सारखी असतात हे विसरून चालणार नाही. तथापी माणसाने विचार न करता नाना गोष्टींच्या मागे धावून त्याला सुख मिळत नाही हे समजून घेतले पाहिजे. शेवटी माणसाच्या शारीरिक गरजा भागल्या तरी कुठे तरी त्यांच्या आध्यात्मिक गोष्टींशी संघर्ष होत रहातो. त्यासाठी नीतीमूल्यांची जरूर असते. त्यांचा आधार असला तरच आधुनिक माणसाला सौख्य मिळेल. नाही तर हा माणूस स्वातंत्र्याच्या आभासात परतंत्रच राहील. तो फक्त वाईट व विध्वंसक गोष्टी करू शकेल. संस्कृती गमावत चाललेल्या आधुनिक युगाची ही एखादेवेळी शोकान्तिका ठरेल. □

**('जगाचे ओझरते दर्शन – काल, आज व उद्या' या पुस्तकावरून साभार उद्धृत)**

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28


**श्रीग्रामायन**

**बलसागर**

या पूर्वीच्या दोन पुस्तकांप्रमाणेच

**निर्माणपर्व**

या प्रस्तुत पुस्तकाचा विषय आहे विकसनशील, स्वावलंबी भारत.

एका खळबळजनक कालखंडातील हे चिंतन. चळवळीतील प्रत्यक्ष सहभागा चीपार्श्वभूमी लाभलेले – शहादे चळवळ, जेपींचे बिहार आंदोलन, आणीबाणी, जनता पक्षप्रयोग, ग्राहकचळवळ, म्हैसाळप्रयोग . . .

★

श्रीग्रामायन या पुस्तकाबद्दल एका तरुण वाचकाने लिहिले होते – ' ग्रामीण भारताच्या वाटांचा शोध घेणाऱ्या कोणाही कार्यकर्त्याला ' श्रीग्रामायन ' मध्ये रेखाटलेली या ग्रामजीवनाची चित्रं आजच्या काळात आणि संदर्भात तितकीच ताजी वाटावीत, अशी आहेत. कदाचित त्यांना वाट पुसतच एखादा पुढली चित्रं चितारू शकेल. '

याच वाचकाने ' बलसागर ' बद्दल लिहिले होते – ' विविध विचारधारांना खुल्या मनाने लेखक येथे सामोरा जात आहे. त्यांचे सुस्पष्ट व तर्कसंगत विश्लेषण येथे आहे आणि आजच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादाची नवी मांडणी करण्याचा प्रयत्नही आहे.'

या पुस्तकात, या ' निर्माणपर्वा ' तही हा प्रयत्न आहे.

एक नवी मांडणी आहे. समन्वयाचे पूर्वसूत्र आणखी पुढे नेले आहे . . .

★

**हा समन्वय कोणत्या शक्तींचा ? कोणते प्रवाह एकत्र यायला हवेत ?**

# ॥ निर्माणपर्व ॥

हे पुस्तक याचा शोध घेणारे आहे.

**लेखक : श्री. ग. माजगावकर**

**राजहंस प्रकाशन**

**मूल्य चाळीस रुपये**

पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.